

काळरात्रीचा
धूमकेतू
The way to Parallel Universe...
शुभम शरद पाटील

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# काळरात्रीचा धूमकेतू

The way to Parallel Universe…

(समांतर विश्वावर आधारित कादंबरी)

लेखक

## शुभम शरद पाटील

# काळरात्रीचा धूमकेतू

लेखक: शुभम शरद पाटील

पत्ता - १. कमलानंद, ३४, डॉ. हेडगेवार नगर,
धरणगांव,(४२५१०५) जिल्हा - जळगांव

२. श्री स्वामी समर्थ नगर भातखंडे बु.।। (४२४२०१)

फोन नंबर - +९१ ९८२३३ ८६३११

ईमेल - shubhampatil111295@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखककाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
Whatsapp: 7710980841

**प्रकाशन :२३ जुलै २०२१ (गुरूपौर्णिमा)**

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य- प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# मनोगत



नमस्कार, मी शुभम शरद पाटील.

ई साहित्यवरील माझे हे सहावे पुस्तक आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे.

सहावे पुस्तक प्रकाशित करायला मिळणे ही पर्वणी आपल्यासारख्या सुज्ञ आणि रसिक वाचकांमुळे आणि अर्थात प्रचंड मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या ई-साहित्य प्रतिष्ठानामुळे मिळाली यात तीळमात्र शंका नाही. त्यामुळे समस्त वाचकांना प्रणाम आणि श्री. सुनीळ सामंत सर आणि टीम यांना मनापासून धन्यवाद...!!!

एक सहज साधा प्रयत्न केला होता लिहिण्याचा. ते लिखाण हजारोंच्या संख्येत वाचलं गेलं. जेव्हा अभिप्राय येण्यास सुरुवात झाली तेव्हा मात्र आपण ‘लेखक’ हा शब्द नावापुढे लावायला हरकत नाही असं वाचकांनी आश्वासन दिल्याचं जाणवलं. वाचक जेव्हा नायकाच्या ठिकाणी स्वतःला प्रज्वलित करून वाचतो आणि ते वाचत असताना अनुभवतो तेव्हा लेखकाचा विजय झालेला असतो.

उच्च विद्याविभूषित, सरस्वतीचा वरदहस्त असणाऱ्या मान्यवरांनी जेव्हा परीक्षण केलं, तेव्हा एक वेगळी ऊर्जा प्राप्त झाली. विविध वयोगटातील, स्तरातील वाचकांना आपलं लिखाण आवडणं ही खरी तारेवरची कसरत असते.

समाजातील तत्कालीन परिस्थितीचे यथायोग्य वर्णन करून सामाजिक परिस्थिती सुज्ञांपुढे (समाजासाठी काम करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे असं मानणारे) आणण्याचे काम लेखक करत असतो या मताचा मी आहे. आज लिहीलेल्या पुस्तकाचे परिणाम अगदी लगेच दिसतील असे नाही. पण लेखक आणि त्याची पुस्तके समाजप्रबोधन करत असतात हे मात्र खरे.

आता थोडं पुस्तकाबद्दल…

अध्यात्म म्हणजे विज्ञानाची अतिप्रगत पायरी किंवा पुढची स्टेप आहे हे तथाकथित पाश्चात्य वैज्ञानिकांना आताकुठे पटायला सुरुवात झाली आहे. विज्ञान आणि अध्यात्म ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि पाश्चत्य संस्कृतीचा अवलंब करणाऱ्या समस्त डोळ्यांनी आणि बुद्धीने आंधळ्या भारतीयांना ही गोष्ट ही गोष्ट समजविणे ही एक लेखक म्हणून माझी नैतिक जबाबदारी आहे असे मी समजतो.

समांतर विश्व आहे की नाही ? या प्रश्नावर जोरात संशोधन सुरू आहे. पण प्राचीन ग्रंथांत अनेक वेळा या बाबीचा

उल्लेख आलेला आहे. खुद्द भागवत पुराणात संगितले आहे की सहस्त्र फणा असलेल्या शेषाने ही पृथ्वी त्याच्या मस्तकावर धरण केलेली आहे आणि अशा असंख्य पृथ्वी आहेत. आपण ज्या पृथ्वीतलावर राहतो तिचा आकार अनंत ब्रह्मांडात मोहरीच्या दाण्याएवढा आहे.

भारतीय तत्वज्ञान आणि आधुनिक (?) विज्ञान यांचा समानवय साधणारी समांतर विश्वावर आधारीत कादंबरी सादर करतो. कादंबरीच्या शेवटी **उपसंहार** दिलेला आहे. त्यात सर्व बाबींचा खुलासा केलेला आहे.

वाचून झाल्यावर अभिप्राय नक्की द्या, कारण अभिप्राय म्हणजे आत्मविश्वासाच्या दरवाज्यापर्यन्त पोहोचण्यासाठीची पायरी असते.

- ***शुभम शरद पाटील.***
***२३ जुलै २०२१***
***(गुरुपौर्णिमा)***

# समांतर विश्व

समांतर विश्व हा खरंतर विज्ञानप्रेमींसाठी आवडीचा आणि जिव्हाळ्याचा विषय. समांतर विश्व अस्तीत्वात आहे की नाही इथून ह्या विषयाची सुरुवात आहे, इतका विश्वासार्ह विषय. आपल्या आकाशगंगेसारख्या अब्जावधी आकाशगंगा या ब्रह्मांडात आहे. जवळपास ९३ अब्ज प्रकाशवर्षं एवढा विस्तार या ब्रह्मांडाचा आहे असे वैज्ञानिक म्हणतात. तसेच हे ब्रह्मांड १३-१४ अब्ज वर्षे जुने आहे असा अंदाज आहे. या ब्रह्मांडच्या पुढे काय आहे हे अजून कोणालाही माहीत नाही म्हणून विविध तर्क शास्त्रज्ञांनी केले आहेत. या सगळ्या फक्त थेअरी आहेत कारण याला कोणताही पुरावा नाही.

जसे आपले ब्रह्मांड आहे तसेच अनेक ब्रह्मांड आहेत असे शास्त्रज्ञ म्हणतात. ते आपल्याला दिसत नाही पण एके दिवशी आपल्याला दिसेल असे त्यांना वाटते. या संकल्पनेत सर्वात आधी येते ते गणित, गणितातील संभाव्यता (probability). जर अनेक ब्रह्मांड असतील तर एखादे ब्रह्मांड

हे आपल्या सारखे असेल आणि त्या मध्ये एखादी पृथ्वी असेल. त्यात देखील माझ्या, तुमच्यासारखे जीव असतील, त्यांची नावे आपल्यासारखी असतीलल, ते मराठी बोलत असतील व त्यांचे आयुष्य देखील आपल्यासारखेच असेल. सगळीकडे गणित चालत नाही म्हणून भौतिकशास्त्र देखील येथे वैज्ञानिक वापरतात. ते क्वांटम फिजिक्स चे नियम अनेक ब्रह्मांडासाठी वापरतात. लहान कण उदा. इलेक्ट्रॉन, फोटॉन हे भौतिकशास्त्राचे पूर्ण नियम पाळत नाही. त्यांच्या अनेक संभावना व स्थिती (स्टेट्स) असतात. त्यांची वागणूक प्रत्येक सारख्या स्थितीत देखील विभिन्न असू शकते. विश्व हे याच लहान कणांनी बनले आहे म्हणून बिग बँगच्या कणांनी आपले विश्व निर्माण झाले तसेच अनेक विश्व बनले असेल हा शास्त्रज्ञांचा अंदाज आहे. हेच अनेक ब्रह्मांड आहे.

अनेक ब्रह्मांडामध्ये एखादे आपल्या सारखे आहे, एवढाच तो संबंध. याचे विविध प्रकार “Parallel Universes,” “Other Universes,” “Alternate Universes,” किंवा “Many Worlds” असे मानले जाते.

Parallel universe मधे जीवन कसे असेल ते पाहु या: वास्तविक जीवनात probability वर घटना आधारित असते. दोन्ही विश्वात तुमचे जीवन समान असते पण संभावनेनुसार त्यात अनेक विकल्प तयार होतात. जसे की तुमच्याकडे तीन रस्ते आहेत यापैकी तुम्ही एक निवडाल आणि आणि तीन पैकी कोणता निवडाल यावर आधारित तुमचे तीन वेगवेगळे विकल्प असतील आणि त्यावर आधारित तुमचे जीवन पद्धती असेल. जीवन तेच पण ज्या त्या विश्वामधील घटनांच्या प्रभावामुळे जीवनात काही बदल घडतात. उदाहरणार्थ, समजा दोन्ही विश्वात तुम्ही पुण्याला चालला आहात, तुमचा एक्सिडेंट झाला, तर एका विश्वात तुम्ही हॉस्पिटलमध्ये असाल, तर दुसऱ्या विश्वात किंचित खरचटले असेल आणि तिसरी शक्यता - जर एक्सीडेंट झाला नसता तर …

असो,

समांतर विश्वाच्या ह्याच संकल्पना आणि हिंदू पौराणिक कथा आणि तत्वज्ञानाच्या आधारावर लिहिलेली ही लघुकादंबरी.

इति लेखनसीमा…!!!

# अर्पणपत्रिका

**जगाच्या उत्पत्ति, स्थिति आणि लयाला कारणीभूत**
**अशा**

**एकमेवाद्वितीय चैतन्यशक्तीस...**

## २९ जून २०६१, बुधवार.

सूर्य सिंह राशीत होता आणि त्याच्याभोवती फिरणारे सर्व ग्रह एकाच रेषेत आले होते. दर बारा वर्षांनी येतात तसे. थोडक्यात काय तर त्या दिवशी सिंहस्थ कुंभमेळा होता. अजून एक मोठी चमत्कारिक गोष्ट त्या दिवशी घडणार होती. हॅलेचा धूमकेतू त्या दिवशी पृथ्वीवरून जाणार होता. ‘कुंभमेळा’ आणि ‘धूमकेतू’ हे एकाच दिवशी आल्याने लोकांमध्ये संभ्रमाचे वातावरण होते. कारण भारतीय संस्कृतीत कुंभमेळ्याला (शाहीस्नानाला) खूप परमपवित्र आणि महत्वाचं मानलं गेलं आहे. याउलट धूमकेतू दिसणं म्हणजे अपशकुनी मानलं गेलं आहे. खगोलशास्त्रीय बाबींचा अभ्यास करणाऱ्या व्यक्तींसमोर मोठा पेच पडला होता. कारण या घटनेचा नेमका परिणाम काय होईल हे कुणीच सांगू शकत नव्हतं. अशी परिस्थिती पहिल्यांदाच उद्भवली होती त्यामुळे ‘नशीब’ या शब्दाला आता जास्त किंमत येणार होती. म्हणजे आगामी दिवसांत घडणाऱ्या घटनांना प्रयत्नांऐवजी नशिबाचा जोर लागणार होता आणि चांगलं किंवा वाईट यांवर नशिबाचा शिक्का मारून लोकं मोकळं होणार होते. “नशीब”, एक सरळ आणि सुटसुटीत कारण.....असो,

हंसीकाने भिंतीवर टांगलेल्या घड्याळाकडे बघितलं. सात वाजले होते. तिने थोड्या नाराजीनेच फोन हातात घेतला आणि शौनकला कॉल लावला. त्याचा फोन स्विच ऑफ येत होता. दहा मिनिटांनंतर तिने परत एकदा कॉल ट्राय केला. शौनकचा फोन अजून बंदच होता.

*"अरे यार, कुठं अडकला हा...? निदान आजतरी वेळेवर निघायला हवं होतं याने."* असं म्हणून तिने हातातला फोन ठेवला आणि तयारी करण्यासाठी म्हणून उठली. तयारी करून झाली तेव्हा साडेसात झाले होते. तिने परत एकदा शौनकला कॉल करण्याचा प्रयत्न केला आणि नाराजीने घड्याळाकडे बघितलं. *"अरे हो, सक्षमला लावते. सोबतच असतात दोघं. इतका वेळ झालं माझ्या लक्षात कसं आलं नाही?"* असं स्वतःशीच बोलत तिने सक्षमला कॉल लावला. त्याचासुद्धा फोन स्विच ऑफ येत होता. तिने परत एकदा आरशात बघितलं आणि हातातला फोन पर्समध्ये टाकला. वेळ बघितला तर आठ वाजण्यात आले होते. स्वतःशीच काहीतरी पुटपुटत तिने दरवाजा लॉक केला आणि निघाली. शेवटचं एकदा शौनक आला का? हे बघण्यासाठी तिने पार्किंगमध्ये शौनकची गाडी बघितली आणि नाराजीनेच गाडीत बसली. सिटबेल्ट लावून गाडी सुरू केली आणि मेन रोडला लागली तेव्हा भल्यामोठ्या ट्राफिकमध्ये अडकली. गाडी ट्राफिकमध्ये

अडकलेली असताना तिचं लक्ष तिच्या उजव्या हाताकडे गेलं. तिच्या उजव्या करंगळीत प्लॅटिनमची रिंग होती. ती तिला शौनकने भेट म्हणून दिली होती. तिने बारकाईने त्या अंगठीकडे बघितलं आणि थोड्या विचारात पडली. मग काहीसा विचार करून तिने अंगठी काढली आणि डेस्कमध्ये ठेऊन दिली. तिच्या कुंडलीनुसार प्लॅटिनम हा तिच्यासाठी चांगला धातू नव्हता, पण शौनकच्या आग्रह आणि प्रेमाखातर ती प्लॅटिनम वापरत होती. त्यात आजचा दिवस ज्योतिषशास्त्रानुसार काहीसा कोड्यात टाकणारा असल्यामुळे कशाला उगाच रिस्क? असं म्हणून ती अंगठी काढून ठेवली होती. नाही म्हटलं तरी ‘ॲस्ट्रोलॉजी’ तिचं प्रोफेशन असल्यामुळे या गोष्टींवर विश्वास ठेवणं तिच्या बुद्धीला पटत होतं.

पुण्याचा रस्त्यांवर माणसांपेक्षा वहानांची जास्त गर्दी होती. चाकरमान्यांची घरी जायची घाई सुरू होती. सकाळी दिवस उजाडण्याआधी घरातून निघलेले ते मॉडर्न मजूर सूर्य बुडाला तरीही अजून घरी पोहोचले नव्हते. हे त्यांच्यासाठी रोजचेच होते. त्यामुळे आता सवय झाली होती. त्यांनासुद्धा आणि पुण्याचा रस्त्यांनासुद्धा...

हंसीका आणि शौनक हे गेल्या दोन वर्षांपासून लीव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहत होते. शौनक एका मोठ्या

मल्टीनॅशनल कंपनीमध्ये सीनियर मॅनेजर होता आणि हंसीका ही एक 'न्यूमरोलॉजिस्ट' आणि 'अॅस्ट्रोलॉजिस्ट' होती. तिच्या कोथरूडमधल्याच घरीच तिचं ऑफिस तयार होतं. त्याच घरात ते दोघं रहात होते. त्यांची दोघांची भेट त्याच घरात झाली होती. साधारणतः तीन वर्षांपूर्वी हंसीकाचा क्लायंट अनिकेत उर्फ आनि त्याच्या मित्रासोबत आला होता, हाच तो शौनक. बघताक्षणीच त्याला हंसीका आवडली होती. मग शौनकनेसुद्धा त्याच्या अडचणींबद्दल सांगितलं, हंसीकाने त्यावर काही उपाय सुचवले. शौनकने तसं करून बघितलं आणि त्याच्या अडचणी हळूहळू कमी झाल्या. आता त्या त्याच्या प्रयत्नांमुळे झाल्या की कशामुळे ते माहिती नाही पण त्याचा हंसीकावर खूप विश्वास बसला. मग तिला 'थॅंक्स' म्हणण्यासाठी तो भेटायला गेला. हळूहळू भेटी वाढत गेल्या, मग मैत्री झाली. त्या मैत्रीचं प्रेमात कधी रूपांतर झालं तेच कळलं नाही. दोघांना अजून जास्त समजून घेण्यासाठी त्यांनी लीव्ह इन मध्ये राहण्याचा निर्णय घेतला आणि मागील दोन वर्षांपासून ते सोबत राहत होते. दोघांत काही भांडण वगैरे काहीच नव्हतं त्यामुळे अजूनतरी सर्व ठीकठाक होते.

मुंगीच्या वेगाने गाडी पुढे सरकत होती. शौनकशी न होणारा संपर्क आणि ट्राफिक यामुळे हंसीका जाम वैतागली होती. इतक्यात तिचा फोन वाजला. तो शौनकचा फोन होता.

एका क्षणासाठी तिला राग आला पण काहीतरी जेन्युयन कारण असेल म्हणून स्विच ऑफ असेल असा विचार करून तिने फोन उचलला आणि त्याने बोलायला सुरुवात करण्याचा आतच तिने सुरुवात केली,

*“हॅलो, मी पोहोचेल पंधरा मिनिटांत. तू कुठे आहेस?”*

*“आम्ही निघालोय, पण केव्हा पोहोचू? ते नाही सांगू शकणार.”* पलीकडून येणाऱ्या आवाजवरून शौनक वैतागलेला वाटत होता.

*“आता कुठे आहात तुम्ही?”* हंसीकाने अतिशय शांत स्वरात विचारलं.

*“आम्ही हिंजवाडी चौकाच्या जस्ट मागे आहोत आणि खूप ट्राफिक आहे. त्यामुळे आमच्यासाठी कुठे थांबू नकोस. तू पोहोच आम्ही आलोच तुझ्या मागे.”* शौनकने सांगितलं.

*“ठीक आहे. पण सारंग आणि रचनाचं काय?”* हंसीकाने विचारलं.

*“हॅलो..., हॅलो...,”* शौनकला काहीच ऐकू येत नव्हते.

*“हॅलो....,”* स्पीकर लावण्यासाठी तिने फोन हातात घेतला तर काय... हंसीकाच्या हातातल्या फोनच्या स्क्रीनवर तडे पडले होते. स्क्रीन अक्षरशः फुटली होती. हातातून फोन

दगडावर पडल्यावर जशी स्थिती होईल तशी त्या फोनची स्थिती झाली होती. हंसीकाला फार आश्चर्य वाटलं. तिने फोनच्या मागे हात लावून फोनचं तापमान बघितलं तर ते नॉर्मल होतं. पण स्क्रीन अचानक कशी फुटली? हा गहन प्रश्न होता.

*"ओह शिट. अचानक काय झालं या फोनला?"* झालेला प्रकार तिच्या लक्षात येत नव्हता. समोर बघितलं तर ट्राफिक कमी झाली होती. तिने फोन बाजूच्या सीटवर ठेवला आणि ड्रायव्हिंगवर लक्ष देऊ लागली. पण स्क्रीनला अचानक काय झालं हे तिला समजत नव्हतं. थोड्या थोड्या वेळाने ती बाजूच्या सीटवर ठेवलेल्या फोनकडे बघत होती. "आताच तर घेतला होता राव, महिनासुद्धा नाही झाला अजून...." हंसीका स्वतःशीच बोलत होती. फोन घेऊन फक्त एक महिना झाला असल्याने तो रिप्लेस होईल हे तिच्या लक्षात आले आणि तिला आनंद झाला. चेहऱ्यावर स्मितहास्य फुलले. थोड्याच वेळात ती सक्षम आणि आर्याच्या "मृगजळ" नावाच्या बंगल्याजवळ पोहोचली. बाहेर आधीच दोन कार पार्क केल्या होत्या. पैकी एक सक्षमची होती आणि दुसरी अनिची. मग नाइलाजाने तिने बाजूच्या बंगल्यासमोर कार पार्क केली. मनगटावरील घड्याळात नऊ वाजण्यात आले होते....

शौनक, हंसीका, सक्षम, आर्या, अनि, नीलिमा, सारंग आणि रचना हे आठ जणं वर्षभरातून दोन दिवस भेटून पार्टी वगैरे करायचे. एका वर्षातून दोन दिवस भेटणं हा त्यांचा कार्यक्रम कॉलेज सुटल्यापासून सुरू होता. शौनक, सक्षम, आनि, रचना आणि सारंग हे कॉलेजपासून सोबत होते. कॉलेजच्या अगदी पहिल्या सेमिस्टरपासून त्यांची मैत्री जुळली होती ती अगदी आज सात वर्षं झाली तरी तशीच टिकून होती, अगदी घनिष्ठ. कॉलेजच्या शेवटच्या दिवशी त्यांनी ठरवलं की आता आपल्या वाटा वेगळया झाल्या तरी आपण वर्षातून दोन दिवस तरी भेटायचं आणि मस्त धमाल करायची, पार्टी करायची आणि गत आठवणींना उजळा द्यायचा. मग त्यांचं गेट टू गेदर सुरूच राहिलं. त्यात पुढे सक्षमची बायको आर्या, आनिची गर्लफ्रेंड नीलिमा आणि शौनकची लीव्ह इन पार्टनर हंसीका ॲड झाले. अल्पावधीतच आर्या, नीलिमा आणि हंसीका सर्वांसोबत इतक्या मिक्स झाल्या की ते सर्वजण आधीपासूनच सोबत आहे असं कुणा नवख्याला वाटलं असतं.

सक्षम आणि शौनक एकाच कंपनीत कामाला होते. सक्षम आणि आर्याचं लव्ह मॅरेज असतं. सक्षमला आर्या त्यांच्या एका नातेवाईकांच्या लग्नात दिसलेली असते आणि तिथून त्यांची लव्हस्टोरी सुरू होते. मग बऱ्याच वेळा घरच्यांना समजवल्यावर यांच्या लग्नाला होकार मिळून ते आता सुखाने नांदत असतात. आर्या एक निष्णात फार्मसीस्ट होती. ती 'वर्ल्ड फार्मा टूडे' नावाच्या मॅगझीन मध्ये लिहायची. त्याचप्रमाणे तिचा ड्रग्जवर सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात अभ्यास होता. सक्षम आणि आर्याचा कोरेगांव पार्कला एक छान बंगला होता. आजची पार्टी तिथेच होती. **"मृगजळ"**मध्ये.

हंसीका येण्याआधी तिथे नीलिमा आणि अनि पोहोचले होते. अनिचा रियल इस्टेटचा बिझनेस होता. त्याचा बिझनेस असल्यामुळे वेळेच्या बाबतीत तो अगदी फ्लेक्सिबल होता. केव्हाही आणि कुठेही बोलावलं तरी हजर असायचा. अनि हा एक बिनधास्त स्वरूपाचा मनुष्य होता. रॉयल स्वभावाचा म्हणतात तसा काहीतरी. त्याची मैत्रीण नीलिमा ही एक मेडिकल स्टुडंट होती. ती आता एम. एस. च्या फायनल इयरला होती. तिचं शिक्षण पूर्ण झाल्यावर अनि आणि नीलिमा लग्न करणार होते. अनि आणि नीलिमा सोबतच आले होते

आणि आर्याला स्वैपकात मदत करत होते. सोबतच त्यांच्या गप्पा सुरू होत्या.

*"नीलिमा, तुला माहितीये का आज हंसीका येणार आहे?"* आर्याने ओव्हनमधला केक काढत विचारलं.

*"हंसीका... अं... कोण गं?"* निलीमाने प्रश्नार्थक नजरेने आर्याला विचारलं.

*"अगं असं काय करतेस, शौनकची लीव्ह इन पार्टनर. तुला गूढ आणि रहस्यमय वाटणारी स्त्री."* बोलताना अचानक आर्याचे डोळे मोठे झाले.

*"अच्छा, ती होय. मी विसरलेच होते. मी तिला हंसीका असं कधी म्हणतच नाही. मी तिला 'आचार्य' म्हणते. मस्त जुन्या काळातले कामं करणारी मॉडर्न स्त्री"* असं म्हणत निलीमाने तिच्या फोनमध्ये आचार्य नवाने सेव्ह केलेला हंसीकाचा नंबर दाखवला आणि हसू लागली.

*"तुला ती गूढ आणि रहस्यमय का वाटते?"* आर्याने विचारलं.

*"ती ॲस्ट्रोलॉजिस्ट वगैरे आहे गं आणि अजून काहीतरी आहे ना..."* नीलिमा बोलताना अडखळली.

*“न्यूमरोलॉजिस्ट. न्यूमरोलॉजिस्ट. आहे ती अंकशस्त्र अवगत आहे तिला.”* अनिने निलीमला मदत केली.

*“हां, तेच न्यूमरोलॉजिस्ट.”* नीलिमा आठवल्यागत चेहरा करून उच्चारली.

त्यांचं बोलणं सुरू असतानाच दारावर बेल वाजली. अनिने दरवाजा उघडला. समोर हंसीका होती. थोडी वैतागलेली दिसत होती. सोबत तिच्या चेहऱ्यावर उशिरा पोहोचल्याने आपराधिपणाची एक छटासुद्धा होती.

*“हे, हाय हंसीका. हाऊ आर यू? आफ्टर लॉन्ग टाइम हां.”* अनिने हसतच स्वागत केले.

*“आय एम फाइन. व्हाट्स अप?”* हंसीका म्हणाली. इतक्यात कोण आहे बघण्यासाठी आर्या आली आणि तिनेपण जुबाबी चौकशी केली.

हंसीका किचनमध्ये आली आणि मदत करू लागली. मग परत गप्पा सुरू झाल्या.

*“मला जास्त उशीर झाला का?”* हंसीका अपारधिपणाच्या स्वरात म्हणाली.

*“नो, नो, नॉट अॅट ऑल... डोन्ट वरी. अगं माहितीये सायंकाळी ट्राफिक असतं. सक्षम आणि शौनक येतीलच इतक्यात. सक्षमचा फोन आला होता.”* आर्या म्हणाली.

*“अच्छा. सारंग आणि रचनाचं काय? म्हणजे काही कॉन्टॅक्ट झाला का? मी करणार होते फोन, पण हे बघा काय झालं अचानक.”* आपला फुटलेला मोबाइल सर्वांना दाखवत हंसीका नाराजीने उच्चारली.

सर्वजण तिच्या हातातल्या फुटलेल्या स्क्रिनच्या फोनकडे बघत होते. *“ओह माय गॉड... कुठं आपटलास? आणि एवढा संताप चांगला नाही आरोग्याला.”* अनि तिची खेचण्याच्या उद्देशाने म्हणाला.

*“शट अप अनि. आय एम सीरियस. मी ट्राफिकमध्ये अडकली होते तेव्हा शौनकशी बोलत होते आणि अचानक आवाज कट झाला. स्पीकरफोन ऑन करण्यासाठी मी फोन हातात घेतला तेव्हा माझा फोन या अवस्थेत आढळला.”* हंसीका तावातावाने बोलत होती.

तिला असं अचानक चिडलेलं पाहून नीलिमा तिला समजावत म्हणाली, *“चिल आचार्य. आम्हाला काहीच कल्पना नव्हती की असं काही झालं असेल. कारण बघताक्षणी*

*कुणीही सांगू शकेल की हा फोन पडल्यामुळे असा झालाय. शांत हो.''*

*''रचना आणि सारंग आतापर्यंत यायला हवे होते.''* नीलिमा म्हणाली.

*''रचनासुद्धा आहे का?''* हंसीका थोड्या हळू स्वरात म्हणाली. रचनाचं नाव ऐकताच हंसीका थोडी नाराज झाली होती. हंसीकाच्या नाराज होण्यालासुद्धा एक कारण होते. कॉलेजला असताना रचना आणि शौनकचं अफेयर होतं. आता त्यांच्यात काही नसलं तरी हंसीका थोडी इनसिक्युयर वाटत होती. तिचं इनसिक्युयर होणं साहजिक होतं.

मग काही वेळ शांततेत गेला. आर्या आणि नीलिमा मिळून पास्ता बनवू लागले. हंसीका वाईन ग्लास स्वच्छ करू लागली आणि अनि केक डेकोरेट करू लागला. परत सर्वांच्या गप्पा सुरू झाल्या. हंसीका थोडी अस्वस्थ वाटत होती. चेहऱ्यावरून ती थोडी नॉर्मल दिसत असली तरी तिच्या मनात असंख्य प्रश्नांनी काहूर मजले होते. एकाएकी फोनचं खराब होणं तिला खटकत होतं आणि रचनाचं येणं. फोनच्या बाबतीत तिच्या मनात शंका होती की हा कदाचित हॅलेच्या धूमकेतूचा परिणाम असावा. पण ती गप्पच राहिली. यथावकाश पास्ता झाला. केक डेकोरेशन पण केव्हाच झालं होतं. अनिने हॉलमध्ये

असलेल्या डायनिंग टेबलवर केक ठेऊन वाईन ग्लास पुसायला सुरुवात केली होती. सौम्य गप्पा सुरू होत्या.

किचनच्या खिडकीत असलेलं छोटंसं बोन्सायचं रोप हातात घेत नीलिमा आर्याला म्हणाली, *“वॉव, धिस इज क्यूट.”*

निलीमाला स्मितहास्यानेच थॅंक्स म्हणत आर्याने फ्रिजर मधून एक इक छोटीशी बाटली काढली. इंजेक्शन देताना डॉक्टर ज्या बाटलीतून औषध काढतात तशी काहीशी होती. बाटली सर्वांना दाखवत ती म्हणाली, *“एनी बडी वॉन्ट धिस? स्पेशली यू हंसीका?”*

*“काय आहे ते?”* अनिने उत्सुकतापूर्वक स्वरात विचारलं.

*“केटामाइन.”* आर्याने एका शब्दात उत्तर दिले.

*“म्हणजे?”* अनिने परत विचारलं. त्याची उत्सुकता आता तणाली जात होती.

*“जस्ट अ हाय ग्रेड फार्मा, नथींग मच दॅन दॅट. हंसीका जर तुला काही वेळ रीलॅक्स व्हायचं असेल तर तू घेऊ शकतेस.”* आर्या सौम्यपणे बोलली.

ते काहीतरी वेगळं असावं असा विचार करत हंसीका त्या बाटलीकडे बघत होती. निलीमच्या चेहऱ्यावर उत्सुकता तणाली जात होती, ती मेडिकल स्टुडंट असल्यामुळे तिला माहिती असण्याची शक्यता होती, त्यामुळे ती उत्साही दिसत होती आणि अनि संभ्रमावस्थेत होता. ते विचार करत होते आणि आर्या आळीपाळीने त्यांच्याकडे आणि बाटलीकडे बघत होती. इतक्यात दारावरची बेल वाजली आणि सर्वांची तंद्री भंग पावली. अनि आणि हंसीका हॉलमध्ये गेले. किचनमध्ये आर्या आणि नीलिमा ह्या दोघंच होत्या. अनिने दार उघडलं. समोर शौनक आणि सक्षम उभे होते. त्या दोघांना बघून अनिला खूप आनंद झाला. त्याने आळीपाळीने दोघांची गळाभेट घेतली आणि गप्पा सुरू झाल्या.

*"यू नो मॅन, धिस कॉर्पोरेट जॉब्स अँड ऑल इज व्हेरी बोरिंग."* सक्षम वैतागून संगत होता.

*"येस, आय नो. दॅट्स व्हाय आय एम डूइंग बिझनेस नो?"* अनि शौनक आणि सक्षमची मजा घेत म्हणाला. परत एकदा गप्पा सुरू झाल्या. नीलिमाला सारंग आणि रचनाची आठवण झाली. तिने सक्षमला याबद्दल विचारलं तेव्हा तो म्हणाला, *"ते पंधरा मिनिटांत पोहोचतील. मला रचनाचा कॉल आला होता."* सर्वजण निश्चिंत झाले आणि मग मागील

आठवणींना उजाळा मिळू लागला. सारंग मुंबईला एका आयटी कंपनीत कामाला होता आणि त्याची मैत्रीण रचना त्याच्यासोबतच कामाला होती. आधी त्याची कॉलेजमधली मैत्रीण नंतर कलीग असलेली रचना आता त्याची प्रेयसी झाली होती. ते दोघं तीन वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये होते.

हंसीका काहीतरी कामासाठी किचनमध्ये गेली तेव्हा तिच्या मागे शौनकसुद्धा तिच्या मागोमाग आला आणि तिला मागून विळखा घालत म्हटला, *“सॉरी हंसीका. मी आजपण उशीर केला. मीटिंग सुरू होती, बॉस सोडतच नव्हता अगं.”*

*“ठीक आहे रे, मला माहितीये. पण मी कुठं काय बोलले.”* हंसीका शौनकचा विळखा सोडत म्हणाली.

*“मग मघाशी फोन कट केलास ते?”* शौनकने विचारलं.

*“ओह, अरे मी तुला सांगायला विसरले. चल.”* असं म्हणत हंसीका शौनकला हॉलमध्ये घेऊन आली आणि तिचा फोन शौनकच्या हातात दिला.

*“ओह शिट, कसं झालं?”* सक्षम म्हणाला.

हंसीका बोलण्यासाठी तोंड उघडणार इतक्यात परत एकदा दारावरील बेल वाजली. नीलिमाने दार उघडलं. सारंग आणि रचना आले होते. ते दोघं घरात आले आणि सर्वांच्या चेहऱ्यावर एक समाधानाची झलक पसरली. निलीमाने भिंतीवरील घड्याळाकडे बघितले आणि म्हणाली, *“साडेदहा, ओह माय गॉड साडेदहा..... सहा वाजता भेटणारे आठ लोकं साडेदहा वाजता भेटताहेत. चला आता लवकर करा.”*

*“येस, चला आता. सर्वजण आले. जेवताना बोलूयात.”* असं म्हणत आर्याने नीलिमाला दुजोरा दिला आणि ती किचनकडे वळली.

हॉलमध्ये असलेल्या डायनिंग टेबलच्या अवतीभोवती सर्वजण बसले. त्या आयतकृती डायनिंग टेबलच्या एका हेडला हंसीका बसली होती. आर्याने सर्वांकडे बघत एक लाघवी हास्य केले आणि रेड वाईनची बॉटल ओपन केली. आठ वाईन ग्लास

एका ओळीत ठेवले होते. त्यात ती लाल रंगाची वाईन ती सावकाशपाणे आणि सांभाळून ओतू लागली. हंसीकाच्या डाव्या बाजूला सक्षम बसला होता आणि उजव्या बाजूला शौनक. सक्षमच्या बाजूला आर्या आणि तिच्या समोर सारंग होता. दुसऱ्या हेडला नीलिमा बसली होती, तिच्या डाव्या बाजूला अनि आणि उजव्या बाजूला रचना बसली होती. वाईन ओतून झाली. एकेक ग्लास पास होत होत सर्वांसमोर ठेवला गेला. आता स्टार्टरची वेळ होती. स्टार्टरमध्ये ऑलिव्ह मॅगझीन आणि ब्राउनी होतं. भरपूर वेळ झाला असल्याने सर्वांना खूप भुका लागल्या होत्या. त्यामुळे आधीची पाच मिनिटं सर्वांनी स्टार्टरवर कॉन्सनट्रेट केलं. मग पोटात पडल्यावर त्यांना बोल फुटू लागले.

*"नाईस मॅगझीन आर्या,"* अनि आर्याकडे बघत म्हणाला.

*"थॅंक्स, पण मॅगझीन नीलिमाने बनवलं आहे."* आर्या निलीमकडे बोट दाखवत म्हणाली. मग बाकीच्यांनी मॅगझीनची स्तुती केली आणि इतर विषयांवर गप्पा वळल्या. हंसीका आळीपाळीने शौनक आणि रचनाकडे कटाक्ष टाकत होती. पण शौनकला प्रचंड प्रमाणात भूक लागली असल्याने तो खाण्यात गर्क होता. सक्षमचीसुद्धा काही वेगळी स्थिती नव्हती.

*“सक्षम तू दाखवलं नाहीस तुला कुठं लागलं होतं ते?”* रचना सक्षमकडे बघत म्हणाली.

*“मला? मला कुठे काय लागलं होतं.”* सक्षम काहीसा डोळे मोठे करत म्हणाला.

*“अरे तूच सांगितलं होतं ना, आठवडाभरपूर्वी तू जिमला गेलेलास तेव्हा काहीतरी लागलं होतं न तुला?”* सारंगने रचनाला पाठिंबा दिला.

*“नाही रे, असं काहीच झालं नाही.”* सक्षम स्पष्टीकरण देत म्हणाला.

सारंग आणि रचना एकमेकांकडे प्रश्नार्थक नजरेने बघू लागले. दोघं गोंधल्यागत वाटत होते. इतक्यात सक्षमने रचनाला विचारलं, *“अगं तूच संगत होतीस ना तू टेनिस कोर्टवर पडलीस ते. तू तर मला फोटोसुद्धा पाठवलेलेस.”*

रचना आणि सारंग सक्षमकडे अतिशय आश्चर्यचकित होऊन बघू लागले.

रचना म्हणाली, *“नाही रे. मी तर कधी टेनिस कोर्टवर गेलीच नाही. मग पडणार कुठून?”*

नेमकं खोटं कोण बोलतंय हे कुणालाच कळत नव्हतं. उरलेले सर्वजण एकमेकांकडे बघत होते. पण तसं पाहायला

गेलं तर सक्षमने रचना पडल्याचं आर्याला सांगितलं होतं. आर्या यांच्यात पडण्याच्या विचारात होती. तिने अनिकडे बघितलं. अनिने वाईनकडे बोट दाखवलं. आर्या समजायचं ते समजली. रचना आणि सारंगला वाईन चढली असावी असं सर्वांना वाटत होतं. पण वास्तविक स्थिती वेगळी होती. नीलिमाने काहीतरी वेगळा विषय काढून त्यांचं सुरू होणारं भांडण थांबवलं आणि गप्पांचा रूळ बदलला. परत एकदा गप्पा आणि डिनर सुरू झालं. थोड्या वेळातच अनिचा फोन व्हायब्रेट झाला. त्याने खिशातून फोन काढेपर्यंत व्हायब्रेशन बंद झालं होतं. त्याने फोनकडे बघितलं आणि त्याला आश्चर्याचा धक्का बसला. हातातला फोन हंसीकाला दाखवत तो जवळपास ओरडलाच, *"हंसीका, बघ..."*

अनिच्या आवाजाने सगळे जण दचकले आणि त्याच्या फोनकडे पाहू लागले. त्यांचा त्यांच्या डोळ्यावर विश्वास बसत नव्हता. अनिच्या फोनची स्क्रीन फुटली होती. अगदी हंसीकाच्या फोनची होती तशीच अनिच्या फोनची स्थिती झाली होती. हंसीकाने तिच्या पर्समधून तिचा फोन काढला आणि टेबलवर ठेवला. अनिच्या हातात त्याचा फोन होता. सर्वजण आश्चर्यचकित होऊन दोघं फोनकडे बघत होते. शेवटी हंसीकाने पुढाकार घेत कोंडी फोडली. ती म्हणाली, *"नाऊ आय कन्फर्म. हे सर्व हॅलेच्या धूमकेतूमुळे होतंय."*

*“व्हॉट? व्हाट यू मीन बाय हॅलेच्या धूमकेतूमुळे होतंय.”* शौनक हंसीकाकडे बघत म्हणाला.

ब्रम्हंडात जी काही गोष्ट घडते तिला काही ना काही कारण असतंच असतं. काहीही न करता आमचा दोघांचा फोन खराब होण्यामागेसुद्धा काहीतरी कारण आहे. असं बोलताना हंसीकाचा चेहरा गूढ वाटत होता.

*“हंसीका, तुला माहिती असेल तर सांग ना यार लवकर. का असं काहीतरी अगम्य बोलून आमची उत्सुकता शिगेला पोहोचवतेयस?”* सक्षम हंसीकला विनवणीच्या सूरात म्हणाला.

*“आज सिंहस्थ कुंभमेळा आहे. म्हणजे ज्योतिष शास्त्रानुसार ही घटना शुभ आहे. कारण सूर्याच्या भोवती फिरणारे सर्व ग्रह आज एका सरळ रेषेत आलेले आहेत. त्याचप्रमाणे आज पृथ्वीच्या जवळून हॅलेचा धूमकेतू जाणार आहे. धूमकेतूचं पृथ्वीजवळून जाणं आमच्या शास्त्रात थोडं निगेटिव्ह मानलं गेलं आहे. हॅलेचा धूमकेतू पृथ्वीजवळून पास होताना काही अदृश्य रेडिएशन्स म्हणजे किरणं प्रसारित करतो. ही रेडिएशन्स बऱ्याच गोष्टींवर परिणाम करत असतात. फिजिकली आणि मेंटलीसुद्धा. त्यातल्या त्यात महत्वाची गोष्ट म्हणजे हॅलेचा धूमकेतू हा दर ७५ वर्षांनी पृथ्वीवरून जात*

*असतो."* एवढं बोलून हंसीका थांबली. सर्वजण तिच्याकडे काहीशा आश्चर्याच्या नजरेने बघत होते.

रचनाला तिचं म्हणणं पटलं नव्हतं बहुतेक. तिने हंसीकाला विचारलं, *"म्हणजे धूमकेतूमुळे तुझा आणि अनिचा मोबाईल खराब झाला असं म्हणायचं आहे का? पण काहीतरी बिघाड होऊन मोबाईलला प्रॉब्लेम आला असेल असं होऊ शकतं ना. हा केवळ योगायोग की आज एकाच दिवशी असं झालं."*

*"नाही, मी खात्रीशीर सांगू शकते की हा धूमकेतूचाच परिणाम आहे. आर्या किंवा सक्षम तुमच्यापैकी एकाने प्लीज तुमच्या बेडरूममध्ये असलेल्या लॅपटॉपवर इंटरनेट कनेक्शन आहे का बघा."* हंसीकाच्या बोलण्यात आत्मविश्वास होता. तिच्या सांगण्यानुसार आर्या उठली आणि बेडरूममध्ये ठेवलेले लॅपटॉप चेक केला, त्यात इंटरनेट कनेक्शन नव्हतं. तिने कनेक्शन नसल्याचं सांगितलं तेव्हा सर्वांना आश्चर्य वाटलं. परत रचनाने शंका उपस्थित केली, *"कदाचित काही प्रॉब्लेम असेल."* तिला शौनक आणि सारंगने दुजोरा दिला.

हंसीकाने परत सांगायला सुरुवात केली, *"मागील वेळी म्हणजे १९८६ ला हॅलेचा धूमकेतू पृथ्वीवरून जात होता, तेव्हा लोकांना विचित्र अनुभव आले होते. काहींनी आपली मानसिक*

*स्थिती गमावली होती तर काहींचे अनुभव हे खरंच विश्वास न बसण्यासारखे होते. मागील वेळी जेव्हा हॅलेचा धूमकेतू पृथ्वीवरून जात होता, तेव्हा त्याचा केंद्रबिंदू हा 'डेन्मार्क' इथं होता. धूमकेतू पास झाल्यानंतरच्या दुसऱ्या दिवशी तिथे राहणाऱ्या एका महिलेने पोलिसांत तक्रार केली की तिच्या घरात असणारा मनुष्य हा तिचा पती नाहीये. पोलिस या गोष्टीवर विश्वास ठेवायला तयार नव्हते कारण त्या मनुष्यकडे त्या महिलेशी लग्न केल्याचा पुरावा म्हणून फोटो होते. ती महिला पोलिसांच अजिबात ऐकून घ्यायला तयार नव्हती. कारण तिच्या म्हणण्याप्रमाणे तिने काल रात्रीच तिच्या पतीचा खून केला होता. तरीही पोलिसांनी त्या महिलेला अटक केली नाही, कारण त्या मनुष्यजवळ लग्न केल्याचा पुरावा होता आणि तिने कुणाचा खून केल्याचे निष्पन्न होत नव्हते. विचित्र आहे नाही का?"*

हंसीकाची ही गोष्ट सर्वजण अगदी तल्लीन होऊन ऐकत होते. त्यांनी जेवण थांबवून अगदी एकटक होऊन तिचं म्हणणं ऐकलं होतं. एकवेळ दुसऱ्या कुणी असं म्हटलं असतं तर त्यावर विश्वास ठेवला नसता पण हंसीका न्यूमरोलॉजिस्ट आणि ॲस्ट्रोलॉजिस्ट असल्यामुळे तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवणं भाग होतं. तिचं बोलणं झालं तरीही सर्वजण तिच्याकडे रोमांचित नजरेने बघत होते. कुणीच काहीच बोलत नव्हते.

तेवढ्यात अनिने बोलायला सुरुवात केली तेव्हा सर्वांच्या नजारा तिकडे वळल्या, *“हंसीकाचं म्हणणं खरं आहे. मागील वेळी म्हणजे १९८६ च्या आधी १९११ ला जेव्हा धूमकेतू पास झाला होता तेव्हा त्याचा केंद्रबिंदू इजिप्तमध्ये होता. तेव्हा तेथील काही लोकांना असेच विचित्र अनुभव आले होते. एकाच घरातल्या तीन व्यक्तींनी एकमेकांना ओळखणे बंद केले होते आणि जोरात भांडण करत होते. पुढे काय झालं काय माहिती पण ते विचित्र वागत होते हे मात्र खरं होतं.”*

*“तुला ही माहिती कुठून मिळाली?”* हंसीकाने अनिला विचारलं.

*“माझ्या भावाने सांगितलं. तो केंब्रिज मधल्या ‘एमआयटी’ मध्ये क्वांटम फिजिक्सचा प्रोफेसर आहे.”* अनिने सांगितलं. आता सर्वांच्या नजरा अनिनकडे वळल्या होत्या. टेबलवर ठेवलेला वाईनचा ग्लास हातात घेत अनि म्हणाला, *“काहीही अकल्पित किंवा विचित्र घडल्यास त्याने मला कॉन्टॅक्ट करायला लावला आहे आणि सर्वांसाठी एक महत्वाची बातमी त्याने सांगितलं आहे, जी हंसीकाने आपल्याला सांगितली नाही, की या वेळी जो धूमकेतू पृथ्वीवरून पास होणार आहे, त्याचा केंद्रबिंदू हा पुणे आणि आजूबाजूचा परिसर आहे. एम आय राइट हंसीका?”*

*“येस, ऑफकोर्स. मला तुमचा मूड खराब नव्हता करायचा. म्हणून मी काही बोलले नाही.”* हंसीका मान डोलवत बोलली.

*“सो, चीयर्स ऑन हॅलेज कोमेट.”* असं म्हणत सक्षमने हातातला वाईनचा ग्लास उंचावला सर्वांनी त्याला दुजोरा दिला. रेड वाईनने भरलेले ग्लास एकमेकांना खणखणू लागले आणि मंडळी चीयर्स करू लागली. तणावपूर्ण वातावरणात

आता थोडी मजा सुरू झाली होती. गप्प परत दुसऱ्या विषयकडे वळू लागल्या. थोड्याच वेळात वातावरण आधीसारखे नॉर्मल झाले. स्टार्टर संपवून मंडळी आता मेन कोर्स वर आली होती. एकमेकांना आग्रह होत होता. जुन्या आठवणी ताज्या होत होत्या.

इतक्यात वीज गेली. अचानक अंधार पडला. गडद काळोख. सर्वांची गडबड सुरू झाली. आर्या आणि सक्षमने सर्वांना आहे त्याच जागेवर बसायला सांगितलं आणि ते कॅन्डल्स घ्यायला घरात गेले. अचानक झालेल्या अंधारमुळे सर्वजण एका क्षणासाठी घाबरून गेले होते. पण काहीतरी प्रॉब्लेम असेल आता हे काही धुमकेतूमुळे झालं नसेल असं सांगून शौनकने सर्वांना शांत बसवलं. मग परत काहीतरी बोलायचं म्हणून सारंग म्हणाला, *"अरे या सक्षमने बिल भरलं नसेल. बिल भरलं असतं तर अशी अचानक पॉवर ऑफ झाली नसती."*

*"बिल भरलं आहे सारंग्या. थांब तुला रिसीप्ट दाखवतो आणि इन्व्हर्टरपण आहे आमच्याकडे. सुरू करावं लागेल फक्त."* सक्षम रूममधूनच ओरडला. नाही म्हटलं तरी हा घाव त्याच्या वर्मी बसला होता कारण त्याच्या आवाजात राग होता.

अनिने सारंगला शांत बसायला लावलं आणि तो अंधारातच वाईनची बॉटल शोधू लागला.

सुमारे दहा मिनिटांनंतर आर्या आणि सक्षम कॅन्डल्स घेऊन आले. सक्षमच्या हातात कॅन्डल्स होत्या आणि आर्याच्या हातात तीन बॉक्स होते. त्यात ग्लोस्टिक्स होत्या.

*"अच्छा, म्हणजे कॅन्डल लाईट डिनर वीथ ग्लोस्टिक्स असा प्लॅन होता तर."* रचना म्हणाली.

*"अगं बाई, प्लॅन वगैरे काही नाही. कॅन्डल्सच्या बाजूला हे ग्लोस्टिक्सचे बॉक्स पडले होते ते आणले. खरं म्हणजे ते मागच्या वर्षीच्या पार्टीसाठी आणले होते. पण नेमका ऐनवेळी पाऊस पडल्यामुळे आपलं लोणावळा जाणं कॅन्सल झालं ना. मग तसेच पडून होते."* आर्याने संदर्भासहित स्पष्टीकरण दिलं. सर्वांना एक एक कॅन्डल दिली गेली. सारंगने खिशतून सिगरेट लायटर काढले आणि मग एकेक कॅन्डल पेटवत ते लायटर प्रत्येकाच्या हातातून फिरू लागले. आर्याने आणलेल्या तीन बॉक्स मधून सर्वांत वर असलेला **निळ्या** ग्लोस्टिक्सचा बॉक्स ओपन केला आणि प्रत्येकाला एकेक ग्लोस्टिक देण्यात आली.

*“सो, लेट्स स्टार्ट द सेकंड पार्ट ऑफ अवर डिनर,”* आर्या असं म्हणते न म्हणते तोच वीज आली आणि सर्वांना हायसं वाटलं.

सर्वांनी कॅन्डल्स फुंकल्या आणि सुरुवात करणार तोच परत एकदा वीज गेली. परत काहीसा मूड ऑफ झाला. मग पुन्हा एकदा पाच मिंनिटांपूर्वी केलेल्या कार्यक्रमाची उजळणी केली आणि जेवणाला सुरुवात करण्याआधी सक्षम म्हणाला, *“मी इन्व्हर्टर सुरू करून येतो. तुम्ही बसा.”* त्याला मानेनेच होकार देत सर्वांनी जेवण सुरू केले. पाच मिनिटांनी सक्षम आला तेव्हा त्याने सांगितलं की, *“इन्व्हर्टर सुरू होत नाहीये.”*

*“ठीक आहे, असंही सर्वांच जेवण जवळपास झालंय. त्यामुळे आपण वाट बघूयात.”* नीलिमा म्हणाली. तिला सर्वांनी होकार दिला आणि परत एकमेकांची मजा घेणं सुरू झालं. अनि जास्त बोलत नव्हता. काहीतरी गहन विचारात हरवून गेल्यासारखा बसला होता.

*“जर कुणाला प्रॉब्लेम नसेल तर आपण दोन मिनिटांसाठी बाहेर जाऊयात का? धूमकेतू दिसेल आपल्याला.”* हंसीकाने विचारलं.

*“ओह, दॅट्स ग्रेट. लेट्स गो.”* असं म्हणत सक्षम खुर्चीवरून उठलासुद्धा. सर्वांनी आपआपल्या ग्लोस्टिक्स

हातात घेतल्या आणि बाहेर आले. सर्वदूर काळोख होता. शिवाय एका घरच्या. सक्षमचं घर सोडून दोन घर अंतरावर जे घर होतं तिथे मात्र प्रकाश होता. त्या घराची वीज गेली नव्हती. इतक्यात हंसीकाने तिची ग्लोस्टिक वर करून सर्वांचे लक्ष वर वेधले.

आकाशातून हॅलेचा धूमकेतू जात होता. पण येत्या काही तासांतच हाच धूमकेतू यांचं "विश्व"च बदलून टाकणार होता याची त्यांना तसूभरही कल्पना नव्हती. सर्वजण एकाग्र होऊन एकटकपणे ते दृश्य पाहू लागले. धूमकेतू हळूहळू मार्गक्रमण करत होता. सर्वजण पहिल्यांदाच असं दृश्य बघत असल्याने कमालीचे रोमांचित झाले होते. टॉर्चसारखा प्रकाश फेकत धूमकेतू पुढे जात होता. तो परावर्तीत करत असलेली किरणे फार प्रखर होती. धूमकेतू बघून सर्वजण घरात आले तेव्हा समोरच्या दृश्याने आश्चर्यचकित झाले, टेबलवर ठेवलेले वाइनचे सर्व ग्लास विचित्र पद्धतीने फुटले होते. ते सुरीने कापल्यासारखे वाटत होते. ते दृश्य पाहून सर्वजण गोंधळात पडले. कुणीही काहीच बोलत नव्हतं. तेव्हढ्यात शौनक म्हणाला, *"मी इन्व्हर्टर सुरू करून येतो."*

*"सांभाळून जा."* हंसीका म्हणली.

तो निघणार इतक्यात आर्या म्हणाली, *“तू किचनच्या दराने जा. तिथून सोईचं पडेल.”*

आर्याला *“थॅंक्स”* म्हणून शौनक निघाला.

सर्वजण त्या विचित्र पद्धतीने फुटलेल्या ग्लासेस कडे बघत होते. इतक्यात नीलिमा म्हणाली, *“इफ यू डोन्ट माइंड, कॅन आय टेक अ पॉवर नॅप?”*

*“आर यू ओके? काय होतंय नीलिमा तुला?”* अनिने काळजीपोटी विचारलं.

*“नथिंग, जस्ट थकलीये.”* नीलिमा जांभई देत म्हणाली आणि सर्वांनी होकरच्या माना डोलवल्यावर आर्याच्या बेडरूममध्ये निघून गेली.

*“आय थिंक मला त्या घरी जावं लागेल.”* अनिने फुटलेल्या ग्लासवरील नजर न हटवत गंभीरपणे शब्द फेकले.

*“कोणत्या घरी? आणि कुठे?”* हंसीकाने विचारलं.

*“त्याच, ज्या घरात लाइट होती. ज्या पद्धतीने आपले दोघांचे फोन डॅमेज झाले आणि आता हे ग्लास विचित्र पद्धतीने फुटले, मला हे माझ्या भावाला सांगावं लागेल. आता कुणाचाच फोन काम करत नाहीये आणि इंटरनेटसुद्धा बंद आहे.*

*सो मला तिकडे जावं लागेल. मी आलोच एक फोन करून पाच मिनिटांत.''* अनिच्या बोलण्यात गंभीरपणा होता.

*''ठीक आहे. पण कुणाला तरी सोबत घेऊन जा. प्लीज.''* आर्या म्हणाली.

*''मी येतो तुझ्यासोबत,''* असं म्हणत सक्षम उभा राहिला.

सक्षम आणि अनि घराबाहेर निघाले. सर्वांच्या चेहऱ्यावर थोडी काळजी दिसत होती. इतक्यात लाइट आली आणि मंडळीच्या जीवात जीव आला. वास्तविक बघता वीज आली नव्हती. शौनक इन्व्हर्टर सुरू करून आला होता. त्याने सक्षम आणि अनिची चौकशी केली आणि हंसीका जवळ बसला. पंधरा मिनिटं झाली तरी अजून दोघांचा पत्ता नव्हता. हळूहळू सर्वांची चिंता वाढत होती. धूमकेतू बद्दल सांगितलेल्या गोष्टींमुळे नाही म्हटलं तरी सर्वांच्या मनात थोडी धाकधूक होतीच. वीस मिनिटं झाली तरी सक्षम आणि अनि आले नव्हते. सर्वजण एकमेकांचे काळजीयुक्त चेहरे बघत होते. इतक्यात आर्या उठली आणि दरवाज्याच्या दिशेने जाऊ लागली. तिला हंसीकाने जरा चढया आवाजात दरडावलं, *''आर्या जागेवर बस. तू कुठेही जात नाहीयेस. त्यांना काहीही होणार नाही.*

*कदाचित त्यांचा अनिच्या भावाशी कॉन्टॅक्ट झाला असेल. तो काहीतरी संगत असेल त्यमुळे उशीर होत असेल.''*

हंसीकाचं बोलणं ऐकून सर्वांना थोडा धीर आला. काही क्षण असेच स्मशान शांततेत गेले आणि दरवाज्यावर मोठा आवाज झाला. सर्वजण घाबरून गेले. शौनक खुर्चीवरून उठला आणि दरवाज्याच्या दिशेने जाऊ लागला. तोच सारंगने त्याला हॉकी स्टिक दिली. त्याने डोळ्यानेच थॅंक्स म्हटलं आणि दरवाजा जवळ केला. दरवाज्याच्या काचेतून बघितलं तर बाहेर सक्षम आणि अनि उभे होते. शौनकने दरवाजा उघडून त्यांना आत घेतलं. ते घरात येताच आर्या सक्षमला बिलगली. तेव्हा तिच्या केसांवरून हात फिरवत सक्षम म्हणाला, *''डोन्ट वरी आर्या, आय एम फाइन.''*

सक्षमच्या हातात एक बॉक्स होता. चावीने बंद केलेला बॉक्स होता तो. अनि खूप संतापलेला वाटत होता. त्याच्या कपाळावर जखम झाली होती आणि त्यातून रक्त येत होतं. सक्षमच्या हातातला बॉक्स बघून तो त्याच्या अंगावर धावून गेला आणि संतापात ओरडला, *"तुला कुणी शहाणपणा करायला सांगितला होता? का उचललास तो बॉक्स?"*

सारंग आणि शौनक त्याला मागे ओढत शांत बसवू लागले. अनि असा अचानक अंगावर धावून आल्यामुळे सक्षम घाबरुन अक्षरशः खाली कोसळला होता. रचनाने त्याला उठवण्यात मदत केली. अनिचा असा रुद्रवतार बघून सर्वजण घाबरून गेले होते. शौनक अनिला एका बाजूला घेऊन गेला आणि तिकडे काय पहिलं? असं विचारलं. अनि काहीच बोलायला तयार नव्हता. तो थोडा घाबरलेला वाटत होता. शौनककडून तो शांत होत नाही असं बघून आर्या अनिजवळ गेली. त्याचा हात हातात घेत ती काळजीयुक्त स्वरात म्हणाली, *"अनि, काय झालं सांगशील का प्लीज? आणि तुझ्या कपाळाला काय झालं? काय लागलं दाखव बघू."*

अनि शांत झाला. त्याने मागे वळून बघितलं आणि सक्षमला *"सॉरी"* म्हटला. सक्षमने 'इट्स ओके' म्हणत

स्मितहास्य केले आणि म्हणाला, *"माझीच चूक होती. मी नको उचलायला हवा होता तो  बॉक्स."* दोघं समोरासमोर आले आणि एकमेकांची गळाभेट घेतली. ताण कमी झाला आणि सर्वांना हायसं वाटलं.

सक्षमने सांगायला सुरुवात केली. तो म्हणाला, *"आम्ही बाहेर पडलो आणि आपल्या घरच्या दोन घर दूर असलेल्या घराजवळ गेलो. तिथे हा बॉक्स ठेवला होता. मी खाली वाकून बॉक्स बघत होतो तेव्हा अनि त्या घरच्या खिडकीतून डोकावला आणि काही क्षण मध्ये बघून काहीतरी भयंकर बघितल्यासारखं बघून जोरात पळत सुटला. पळत असताना तो रस्त्यावर खाली पडला आणि त्याला लागलं. त्याच्या मागे मी धावत आलो. आता तरी सांग अनि तू असं काय पहिलंस की असा जिवाच्या आकांताने पळत आलास?"*

*"तुम्हाला ऐकायचंच आहे ना, तर ऐका मग, मी त्या घरात जाण्याआधी खिडकीतून पहिलं. ते या घरासारखंच घर होतं. मी हॉलच्या खिडकीतून बघितलं. मी एक टेबल बघितला, त्यावर वाईन ग्लास आणि कॅन्डल्स होत्या. तिथं आठ जणांचा डिनर सेट रेडी केलेला होता. आणि मी तेच बघितलं जे आता बघतोय...."* असं म्हणून अनि डोक्याला हात लावून डायनिंग टेबलच्या एका खुर्चीवर बसला.

*"एक, एक मिनिट. आता जे बघतोय तेच बघितलं म्हणजे? म्हणजे तिथं आपण होतो? आपण सर्व? जसेच्या तसे?"* शौनकने विचारलं.

अनिने मान हलवून होकार दिला. सर्वजण गंभीर झाले.

*"काय बरळतोयस अनि. तू हेच घर किचनच्या खिडकीतून बघितलं असशील. तिथं तू आणि सक्षम होता का?"* सारंगने अनिला विचारलं.

*"मी तेच सांगतोय तुम्हाला. मी हे घर ओलांडून दोन घरं पुढे गेलो आणि हॉलच्या खिडकीतून बघितलं. हॉल आणि किचनची खिडकी न समजण्याइतका दूधखुळा नाहीये मी. मला माहितीये तुम्ही मला वेड्यात काढाल म्हणून मी तुम्हाला संगत नव्हतो."* अनि जोरात ओरडला. सर्वजण शांत झाले. काही वेळ असाच गेला.

सक्षमने आणलेला बॉक्स डायनिंग टेबलवर ठेवलेला होता. तो लॉक होता. शौनकने आर्याकडे पिन मागितली. तिने लगेच केसांतली पिन काढून दिली. शौनक पिन वापरुन बॉक्सचं लॉक उघडायला जाणार तोच अनिने त्याला तसं करण्यास मनाई केली. पण शेवटी सर्वांच्या हट्टापुढे नमत त्याने परवानगी दिली. शौनकने पिन लावली आणि लॉक उघडलं गेलं. हंसीकाने शौनकच्या खांद्यावर हात ठेवला आणि त्याला

सावकाशपणे बॉक्स उघडायला सांगितला. त्याने बॉक्स उघडला. सर्वांच्या नजारा त्या बॉक्सवर होत्या. सर्वांचं कुतूहल जागृत झालं होतं. बॉक्समध्ये एक 'रूबिक्स क्युब' होता. सोबत एक एन्व्हलप सुद्धा होते. एकामागून एक करत सर्वांनी रूबिक्स क्युब पाहिला आणि बाजूला ठेऊन दिला. आता एन्व्हलप ओपन करण्याची वेळ होती. शौनकने एन्व्हलप उघडलं. त्यात त्या सर्व आठ जणांचे फोटो होते.....

सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. त्यांचे फोटो त्या बॉक्स मध्ये काय करत होते? त्यात हंसीका आणि शौनकचा फोटो आधी एकच असावा असं दिसत होतं. म्हणजे एका फोटोचे दोन तुकडे केले होते. एका तुकड्यात शौनक होता आणि दुसऱ्या तुकड्यात हंसीका... या सगळ्यात कहर म्हणजे सारंगचा फोटो लहान साईझचा होता आणि त्यावर तारीख होती, **'२९ जून २०६१...'** म्हणजे तो फोटो आजच काढलेला होता. सारंगने तो फोटो पहिला, त्यात त्याची हेयर स्टाइल, कपडे सर्वकाही आजच्या लुकशी अगदी तंतोतंत मिळतं जुळतं होतं. इतकंचं काय तो ज्या ठिकाणी उभा होता ते ठिकाण सर्वांच्या नजरेसमोर होतं. त्याच्या मागे एक निसर्गचित्र होतं. जे आता या क्षणाला त्यांच्या समोरच्या भिंतीवर लावलेलं होतं. तो भांबावलेल्या नजरेने त्या फोटोकडे पाहू लागला. सर्वजण भेदरलेल्या नजरेने एकमेकांकडे पाहू लागले.

*“सारंग, तुझा हा फोटो आज काढलाय हे मात्र नक्की आहे. अँड मेन थिंग इज दॅट यू आर लूकिंग अॅट द कॅमेरा पर्पजफुली,”* आर्या म्हणाली.

*“हो, ते तर आहे. पण मी आणि रचना सर्वांत शेवटी आलो. आमच्या आधी तुम्ही सर्वजण आला होतात आणि आपण लगेच पार्टीला सुरुवात केली. माझाच काय मी आल्यापासुन इथं कुणीच कुणाचाच फोटो काढला नाहीये. त्या फोटोत जे शर्ट आहे ते मी आज सायंकाळी इथं येण्याच्या आधी घेतलंय.”* सारंग प्रश्नार्थक मुद्रेने म्हणाला.

त्याच्या ह्या प्रश्नाचं कुणाकडेही उत्तर नव्हतं परत सर्वजण शांत बसले. हंसीकाने सर्व फोटो हातात घेतले आणि नीट बघितलं. नंतर तिने फोटोंची मागची बाजू बघितली त्यावर **लाल** रंगाच्या मार्करने काही अंक लिहिले होते. तिने सर्वांना ते दाखवलं आणि आर्याकडे एक नोटबुक आणि **लाल** रंगाचा मार्कर मागितला. हंसीका एक निष्णात न्यूमरोलॉजिस्ट होती आणि तिचं कसब वापरुन तिला आता हे कोडं सोडावायचं होतं. आधी अंक आणि त्याखाली नाव असं एकामागून एक ती लिहीत गेली. सर्वांना त्यांच्या बर्थ डेट, पासपोर्ट नंबर आणि अजून बरेच क्लू विचारून झाले. तिने आतापर्यन्तचा तिचा

सगळा अनुभव पणाला लावला पण त्या अंकांचं कोडं मात्र सुटत नव्हतं.

ती त्या गोष्टीवर विचार करत होती तोवर इकडे रचना आणि आर्या मिळून अनिची जखम स्वच्छ करत होत्या. जखम स्वच्छ झाल्यावर बॅडेज लावायचं होतं. तिथं कॉटन, रेग्युलर आणि प्लॅस्टिक बॅडेज होते. रचनाने अनिला कोणतं बॅडेज लावू असं विचारल्यावर अनि म्हणाला, ***"रेग्युलर."*** जखमेला बॅडेज लावून झाल्यावर अनि, रचना आणि आर्या डायनिंग टेबलकडे गेले आणि सर्वजण मिळून फोटोमागे लिहीलेल्या नंबर्सचा विचार करू लागले.

सारंग एकाएकी उठला आणि किचनकडे जाऊ लागला. तेव्हा सक्षमने त्याला विचारलं, *"काय झालं?"*

*"काय सुरू आहे मला काहीच समजत नाहीये. आय नीड वाईन."* असं म्हणत तो किचनमध्ये गेला. त्याच्यामागोमाग सक्षम, आर्या, रचना आणि अनि हे सर्वजण गेले.

हॉलमध्ये असलेल्या डायनिंग टेबलवर आता फक्त हंसीका आणि शौनक होते. हंसीका एकटकपणे त्या नंबर्सकडे बघत होती. ती अचानक शौनकचा चेहरा त्या फोटोंकडे वळवत म्हणाली, बघ हे माझं हँडरायटींग आहे. असं वाटतंय की हे

मीच लिहिलंय. तिने फोटोवर लिहिलेले नंबर्स आणि नोटबूकमध्ये लिहिलेले नंबर्स आजूबाजूला ठेवले. शौनकचा त्याचा डोळयांवर विश्वास बसत नव्हता. कारण ती दोघं ठिकाणची अक्षर अगदी शंभर टक्के सारखी होती.

*"काहीच समजत नाहीये. काय सुरू आहे? आय एम लूसिंग माय माइंड."* हंसीका शौनकच्या डोळयात पाहत म्हणाली आणि तिने शौनकच्या खांद्यावर डोकं टेकवलं. शौनक तिच्या डोक्यावरुन हात फिरवू लागला.

तिकडे किचनमध्ये उर्वरित लोकं वाईनचे ग्लास रिकामे करत होते. काही वेळापूर्वी आनंद साजरा करण्यासाठी ते वाईन घेत होते आणि आता तणावाला आधार म्हणून...

अनिच्या ग्लास मधली वाईन संपली. त्याची अजून वाईन घेणायची इच्छा होती. पण काहीतरी आठवल्यासारखा तो हॉलमध्ये आला आणि हंसीकाच्या समोरील खुर्चीवर बसला. हंसीकाच्या समोर असलेल्या नोटबूक मधून त्याने शेवटचं पान फाडलं आणि काळ्या मर्करने काहीतरी लिहू लागला. तो इतक्या घाईत हॉलमध्ये का आला हे बघण्यासाठी सर्वजण त्याच्या  मागोमाग आले. तो काहीतरी लिहितोय असं बघून आर्या म्हणाली, *"अनि, तू काय करतोयस हे?"*

आपली नजर कागदावरच स्थिर करत अनि म्हणाला, *"मला तिथं जायला हवं. ज्या अर्थी तिथं लाइट आहे, त्याअर्थी तिथे फोनला नेटवर्क असेल किंवा इंटरनेट कनेक्शन तरी असेल. मी त्यांच्या साठी एक नोट लिहितोय आणि ही नोट मी त्या घराच्या दारावर चिकटवून येणार आहे. मी त्यांना त्यांचा फोन वापरु देण्याची विनंती करतोय. जेणेकरून कुठल्याही परिस्थितीत मी माझ्या भावशी कॉन्टॅक्ट करू शकेल. त्यांनी जर तशी असमर्थता दर्शवली तर मी ही नोट चिकटवून परत येईल. दॅट्स इट."*

*"यू शुड नोट गो देअर. जर तुझ्या म्हणण्याप्रमाणे तू तिथे आपल्यालाच पहिलं आहे, तर आपल्यासोबत १९८६ च्या घटनेची पुंनरावृत्ती होऊ शकते. तू या कोड्यात फसू नकोस.*

*प्लीज. तुझं तिथं परत जाणं हे आपल्याला संकटात टाकू शकतं.”* हंसीका अनिच्या हातातला मार्कर ओढत म्हणाली.

*“देअर वी गो. मी तेच म्हणतोय. आपल्याला या सर्कलमध्ये फसायचं नाहीये. आताच काय तो सोक्षमोक्ष लाऊन टाकू.”* असं म्हणत अनिने हंसीकाच्या हातातला मार्कर खेचला आणि नोट लिहायला सुरुवात केली.

रचनाचं लक्ष खिडकीकडे गेलं आणि तो जोरात ओरडली, *“ओह शिट !!! देअर इज समवन आऊट देअर...”*

सर्वांचं लक्ष खिडकीकडे गेलं. त्यांनी पहिलं तेव्हा एक माणूस दरवाज्याजवळ आला आणि लगेच परत फिरून निघून गेला. सगळे विचारात पडले. तो मनुष्य नक्की कोण होता त्याचा विचार करू लागले. तेवढ्यात शौनक हतात हॉकी स्टिक घेऊन दाराजवळ गेला. हंसीका आणि सक्षमने त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला. पण तरीही तो गेलाच. त्याने हळूच दार उघडले. बाहेर डोकावून बघितलं. समोर कुणीच नव्हतं. तो दरवाजा बंद करणार तेवढ्यात त्याला दरवाज्यावर एक कागद चिकटवलेला आढळला.

*“काय आहे ते?”* सारंगने विचारलं.

शौनक त्या कागदावरचा मजकूर मोठयाने वाचू लागला. तो मजकूर काही असा होता, -

***“हॅलो, आम्हाला पाच मिनिटांसाठी तुमचा फोन हवा आहे. एक अर्जंट कॉल करायचा होता. धन्यवाद...”***

*“काय म्हणतोस?”* अनि जोरात किंचाळला. ***“हॅलो, आम्हाला पाच मिनिटांसाठी तुमचा फोन हवा आहे. एक अर्जंट कॉल करायचा होता. धन्यवाद...*** *सेम अगदी सेम लिहिलंय मी दाखव तो कागद.”* असं म्हणत अनिने शौनकच्या हातातून कागद हिसकवून घेतला. तो त्याच्या जागेवर जाऊन बसला आणि तो लिहीत असलेल्या नोटच्या बाजूला दारावर सापडलेला कागद ठेवला आणि ते बघून त्यालाच काय सर्वांना फक्त भोवळ येणं बाकी राहिलं होतं. कारण त्या कागदावरचा आणि अनिने लिहीलेल्या कागदावरचा मजकूर सारखाच होता. एका अक्षराचा देखील फरक नव्हता. इतकंच काय तर कागद, काळ्या रंगाचा मार्कर, त्यावरील अक्षर हे सर्व अगदी शंभर टक्के सारखं होतं. सर्वांची बोलती बंद झाली होती. अनि त्या दोघं कागदांकडे डोक्याला हात लावून बघत बसला होता.

आर्याने दोघं नोट्स बघितल्या. अनिने आता पाच मिंनिटांपूर्वी तिच्यासमोर नोट लिहिली होती. त्यामुळे ती जुनी असण्याची शक्यता नव्हती. तिने दुसरी नोट बघितली. तिच्यावरील शाईचा वास घेतला आणि असं सांगितलं की या कागदावरचा मजकूर फक्त पाच मिंनिटांपूर्वी लिहिला गेलाय.

*“कसं शक्य आहे आर्या? आपण सर्वांनी बघितलं बाहेरून कुणीतरी हा कागद आपल्या घराच्या दाराला लावून गेलं आणि तू म्हणतेस की पाच मिंनिटांपूर्वी लिहिलं म्हणे.”* सक्षम म्हणाला.

*“तोच प्रश्न आहे सक्षम, सगळं काही सारखं आहे.”* रचना म्हणाली.

*“ते घर आपल्या घरापेक्षा काही वेळ पुढे आहे. तिथला अनि आला होता आणि त्याने दारावर नोट चिकटवली, जशी आपला अनि त्यांच्या दारावर जाऊन चिकटवणार होता.”* हंसीका शांतपणे म्हणाली.

*“म्हणजे, तुला म्हणायचंय तरी काय हंसीका? मघाशी अनिने जे बघितलं ते खरं आहे? तिथं आपले डुप्लीकेट्स आहेत हे मान्य आहे तुला?”* सारंग थोड्या मोठ्या आवाजात म्हणाला.

*“होय, मला मान्य आहे. हिंदू शस्त्रांनुसार असं मानलं जातं की आपण ज्या पृथ्वीवर राहतो तशा अनंत पृथ्वी अस्तीत्वात आहेत आणि अशा जर अनंत पृथ्वी अस्तीत्वात असतील तर शक्य आहे ती तिथे आपण असू. तिथला आणि इथला वेळ मागे किंवा पुढे असू शकतो फक्त.”* हंसीका खुर्चीवर बसत म्हणाली.

*“तुझ्याजवळ काही पुरावा आहे का?”* रचना हंसीकाला चिडवण्याच्या उद्देशाने बोलली.

*“माझ्याजवळ पुरावा आहे. पण आता तो माझ्या घरी आहे. ते काही जुने आणि अतिशय दुर्मिळ ग्रंथ आहेत. त्यात या बाबींचा सविस्तर उल्लेख केलेला आहे आणि शेकडो वर्षांपूर्वी लिहून ठेवलेल्या त्या ग्रंथांवर माझा विश्वास आहे.”* हंसीका ठामपणे म्हणाली.

रचना हंसीकाला चिडवण्याच्या उद्देशाने बोलली हे अनिच्या लक्षात आलं. तो म्हणाला, *“ही वेळ भांडण्याची नाहीये. आपल्याला शांततेत या समस्येवर उपाय शोधायचा आहे. त्यामुळे प्लीज....”*

त्याचं बोलणं पूर्ण होतं न होतं तोच शौनक म्हणाला, *“असं तर नाही ना की कुणी मुद्दामहून आपली मजा घेतंय? कुणीतरी आपल्या सर्वांच्या ओळखीचं?”*

*“का नाही, असू शकतं.”* सक्षम म्हणाला.

*“नाही तसं काहीही नाही. हा काहीतरी विचित्र प्रकार आहे. त्या बॉक्समध्ये आपले फोटो आहेत. तिथपर्यंत ठीक आहे. पण सारंगचा फोटो, त्याच्यावर तर आजची दिनांक आहे आणि या सर्वांत कळस म्हणजे ती दारावर चिकटवलेली*

*नोट..... ती नोट आणि मी लिहिलेली नोट या अक्षरशः एकच आहेत. त्यामुळे प्लीज तुम्हाला माहिती नसेल तर हंसीका जे काही सांगतेय ते निदान ऐका तरी.''* अनिने त्याचं मत स्पष्टपणे व्यक्त केलं.

सर्वजण हंसीका समोर बसले आणि हंसीका बोलायला लागली, *''श्री योग वाशिष्ठ ऋषींचे या विषयावरील बोल काहीसे असे आहेत. – या असीम चेतनेच्या अनिवार्य स्वरूपामुळे अनंत ब्रह्मांड पुन्हा पुन्हा उद्भवत असतात आणि लय पावत असतात. हे सर्व अनंत काळापासून अविरतपणे सुरू आहे. नाभीकमलामधून असंख्य ब्रम्हदेव उत्पन्न झालेले आहेत. त्यामुळे असंख्य ब्रह्मांड, असंख्य सूर्यमाला अस्तीत्वात आहेत. एकवेळी सूर्याच्या किरणांना मोजणं सोपं जाईल परंतू आता या क्षणी अस्तीत्वात असलेल्या ब्राहमंडची संख्या सांगणं केवळ अशक्य आहे. मी या गोष्टीचा अभ्यास करण्याचे ठरवले आणि समाधी अवस्थेत गेलो, तिथे मी असंख्य ब्रह्मांड बघितली. त्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नव्हता. तरीही सर्व व्यवहार सुरळीत सुरू होते. थोड्याफार वेळेच्या फरकाने काही गोष्टी तशाच किंवा निराळ्या पद्धतीने होत होत्या.''*

एवढं बोलून हंसीका थांबली. सर्वजण उत्सुकतेने तिच्याकडे बघत होते. जणू काही तिचं म्हणणं त्यांना पटलं

होतं. तिने परत बोलायला सुरुवात केली, *“याशिवाय अजून काही महत्वाच्या गोष्टी आहेत, भागवत महापुरणात श्री विष्णुंचे तीन प्रकार संगितले आहेत – माही, गर्भोदकाय आणि क्षिरोदकाय....”*

*“यापैकी गर्भोदकाय विष्णु म्हणजे माही विष्णूचा विस्तार. आणि क्षिरोदकाय विष्णु म्हणजे गर्भोदकाय विष्णूचा विस्तार... पहिले म्हणजे माही विष्णु भौतिक विश्वाचा विस्तार करतात. गर्भोदकाय विष्णु सर्व विश्वांमध्ये विविधता निर्माण करतात आणी क्षिरोदकाय विष्णु त्या प्रत्येक विश्वामध्ये सर्वव्यापी म्हणून ओळखले जातात. चराचरात त्यांचे अस्तित्व असते. माही विष्णु अनंत गर्भोदकाय विष्णू निर्माण करतात आणि गर्भोदकाय विष्णू अनंत क्षिरोदकाय विष्णू. हे प्रत्येक विष्णू नाभीकमलातून अनंत ब्रह्मा निर्माण करतात आणि हेच अनंत ब्रह्मा अनंत ब्रह्मांड निर्माण करतात. एका ब्रह्मांडात आपल्यासारख्या किती दीर्घिका आणि त्या दीर्घिकांमध्ये किती आकाशगंगा आहेत हे कुणीच सांगू शकत नाही. म्हणूनच अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांचा जयजयकार करताना म्हणतात -* ***अनंतकोटी ब्रह्मांडनायक*** *.....!!!”*

सर्वजण सुन्न होऊन हंसीकाचं बोलणं ऐकत होते. तिने सर्वांच्या चेहऱ्याकडे बघितलं. त्यांची अजून ऐकण्याची उत्सुकता चेहऱ्यावर खूप मोठ्या प्रमाणात दिसत होती. हंसीका म्हणाली, *"मला माहिती असलेल्या पैकी हे शेवटचं, काकभुशुंडी यांनी अकरा वेळा रामायण आणि सोळा वेळा महाभारत वेगवेगळ्या काळात ऐकलं आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे सर्व रामायण आणि महाभारत कथांचा शेवट एकमेकांपेक्षा पुर्णपणे वेगळा होता."*

तिचं हे बोलणं ऐकताच आर्या आणि सारंग डोक्याला हात लावून बसले. कुणाला काहीच कळत नव्हतं. अनिने हंसीकाला विचारलं, *"आता यावर काय उपाय? हे आपल्यासोबत का घडतंय? याची तुला काही कल्पना आहे का?"*

हंसीका म्हणाली, *"नाही. पण मी अंदाज लावू शकते. आज आपल्या आकाशगंगेतले सर्व ग्रह एका सरळ रेषेत आहेत आणि त्यात भर म्हणजे धूमकेतू गेला. त्यामुळे शक्यता आहे की अवकाशात असं काहीतरी झालं असेल ज्याने मी आता वर्णन केलेली ब्रह्मांड एकमेकांच्या जवळ आली असतील आणि त्यात जायचा मार्ग म्हणजे धूमकेतू असेल?"*

तिचं हे बोलणं ऐकून मात्र सर्वजण एकदम चिंतेत पडले. तोच एकाएकी सारंग उठला आणि म्हणाला, *"ते काहीही असो, मी बाहेर जातोय आणि या गोष्टीचा सोक्षमोक्ष लावून परत येतो. तुम्ही इथंच थांबा."*

*"नको सारंग, प्लीज."* रचना त्याला तिच्याकडे ओढत म्हणाली.

*"चला निघूया."* सारंग रचनाचा हात त्याच्या हातातून सोडवत म्हणाला. तो कुणाचही काहीही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता.

*"तू येणार असशील तर मी पण येते."* रचना त्याचा बाहू पकडत म्हणाली.

*"एकदा विचार करा. काहीही होऊ शकतं."* हंसीकाने सूचना दिली.

शौनक उठून उभा राहिला आणि सारंगसोबत जाण्यासाठी तयार झाला. त्याला बघून हंसीका आणि रचनासुद्धा बाहेर निघण्याची तयारी करू लागल्या. या चौघांना असं बाहेर जाताना बघून आर्या म्हणाली, *"प्लीज दोन पुरुष तरी थांबा घरात."*

सक्षमने हात वर करून तो घरातच थांबत असल्याची खूण केली आणि अनिने तिला अंगठा दाखवून तोसुद्धा घरात थांबत असल्याचं सांगितलं.

*"चार **निळ्या** ग्लोस्टिक्स आणि टॉर्च घ्या आणि जर कुणाशी कॉन्टॅक्ट झाला तर त्यांच्याकडे फोन मागा. माझ्या भावाची मदत घेणं आपल्या सर्वांना खूप गरजेचं आहे. काहीही झालं तरी त्याच्याशी कॉन्टॅक्ट झाला पाहिजे. नाहीतर काहीही विचित्रपणा होऊ शकतो."* अनि पोटतिडकीने बोलत होता.

*"हो, आम्हाला कुणी भेटलं तर नक्की आम्ही फोन मागू. तू चिंता करू नकोस."* शौनक अनिला म्हणाला.

*"हॉकी स्टिक्स घेऊन जा."* आर्या म्हणाली.

*"नको, काळजी करू नका. आम्ही फक्त पंधरा मिनिटांत येतो. तुम्ही सावध रहा,"* असं म्हणत सारंगने दार उघडलं.

ते चौघं बाहेर आले. बाहेर खूप काळोख होता. रस्त्यावर कुणीही नव्हतं. अगदी चिटपाखरूसुद्धा नव्हतं. रात्रीचे बारा वाजले होते. बारा म्हणजे काही विशेष गोष्ट नव्हती. पण का? काय माहीत? विचित्र वातावरण होतं एकदम. सारंगच्या मागोमाग सर्वजणं चालू लागले. ते एका काळोखातून गेले

आणि त्यांना समोरच एक बंगला दिसला, त्यावर नाव होतं, **मृगजळ.....!!!**

सारंग त्या बंगल्याच्या दिशेने चालू लागला. तो बांगल्याजवळ जाताच त्याला खिडकीतून काही लोकं दिसले. तो जवळ जाणार इतक्यात त्याला शौनकने बजावले, *"सारंग कुठे चाललास?"*

*"अरे बघितलं नाही का? मृगजळ. हे अनिचं घर आहे. आपण आता इथूनच तर बाहेर पडलो ना? मग हे घर परत इथं कसं काय? चल बघू काय ते,"* सारंग गोंधळून म्हणाला.

*"मूर्खपणा करू नको सारंग. मागे फिर हे अनिचं घर नाहीये."* असं म्हणत रचनाने त्याला बाहेर ओढलं. त्यांची कुजबूज सुरूच होती, तोच त्यांना दिसलं की, त्या घरातील एक व्यकी खिडकीजवळ येत आहे. ते तिथून मागे फिरले आणि परत त्या काळोखाच्या जागेवर आले.

तिथं ते थांबले असताना त्यांना रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला एक दृश्य दिसले आणि त्यांना आरशात बघत असल्याचा भास झाला. कारण त्यांच्यासमोर तेच उभे होते. शौनक, सारंग, रचना आणि हंसीका... शंभर टक्के जसेच्या तशे. काहीही फरक नव्हता. शिवाय ग्लोस्टिकच्या. त्यांच्या समोर उभ्या असलेल्या व्यक्तींच्या हातात **लाल** रंगाची

ग्लोस्टिक होती. त्यांचे कपडे, रंग, ऊंची, दिसणं, केशभूषा, चेहऱ्यावरील हावभाव सर्व सर्वकाही अगदी सारखं होतं. काही सेकंद ते आठही जण स्वतःच्या दुसऱ्या रूपाला न्याहाळत होते आणि मग भानावर येताच एकमेकांना आपल्या समोर पाहून त्या आठही जणांची बोबडी वळली आणि ते ज्या दिशेने आले होते त्या दिशेने पळत सुटले. घरात पोहोचेपर्यंत त्यांनी मागे वळून बघितलं नाही की कुणी धाप लागतेय म्हणून थांबलं नाही. ते जिवाच्या आकांताने पळत होते आणि घर जवळ करत होते. धापा टाकत त्यांनी घर जवळ केलं. घरी आले तेव्हा कुणाच्याही तोंडातून शब्द फुटत नव्हता.

त्यांना असं घाबरलेलं बघून आर्याने त्यांना पाणी देण्यासाठी म्हणून बॉटल हातात घेतली. पाणी पिऊन झाल्यावर सर्वांनी त्यांच्यासोबत घडलेला किस्सा सांगितला.

*"तुम्हाला वेड लागलंय,"* आर्या म्हणाली.

*"तर, तुम्ही तुमच्या समोर चार आकृत्या पहिल्या ज्या अगदी तुमच्यासारख्या होत्या."* सक्षम म्हणाला.

*"हो, एक्सेप्ट ग्लोस्टिक्स. त्यांच्याकडे **लाल** होत्या आणि आमच्याकडे **निळ्या**. एवढाच काय तो फरक होता."* हातातल्या ग्लोस्टिक्स दाखवत शौनक म्हणाला.

*“म्हणजे त्यांच्याकडील लाइट गेल्यावर त्यांनी लाल ग्लोस्टिक्सचा बॉक्स ओपन केला असेल.”* हंसीका म्हणाली.

*“तुम्ही त्यांच्याशी काही बोललात का? किंवा ते काही बोलले का तुमच्याशी?”* आर्याने विचारलं.

*“आम्ही इतके घाबरलेले होतो की कुणाशी काहीही न बोलता तिथून पळत सुटलो.”* रचना दरवाज्याकडे बघत म्हणाली.

*“तो एक अतिशय काळोख असलेला भाग होता. इतका की याच्या आधी असा काळोख बघितल्याचं मला आठवत नाही.”* हंसीका म्हणाली.

*“बरोबर आहे तुझं. सक्षम आणि मीसुद्धा जेव्हा पहिल्यांदा बाहेर गेलो होतो तेव्हा आम्हाला सुद्धा असाच अनुभव आला होता. भयंकर काळोख....”* अनि हंसीकाकडे बघत म्हणाला.

*“हे नक्की काय सुरू आहे? हे आपल्याला कळायला हवं. तुमच्याकडे काही पुस्तकं आहे का?”* हंसीका खुर्चीवर बसत म्हणाली.

*“कशाची? माझ्याकडे धार्मिक किंवा सायन्सची पुस्तकं नाहीतयेत. कादंबऱ्या वगैरे भरपूर आहेत. पण त्या आता*

*काही उपयोगी ठरतील असं काही वाटत नाही.''* सक्षम हॉलमध्ये असलेल्या बूकशेल्फ कडे बोट दाखवत म्हणाला.

*''एक मिनिट... माझ्याकडे काहीतरी आहे. जे कदाचित आपली मदत करू शकतं. माझ्या भावाने त्याच्या भारतातल्या विद्यार्थ्यासाठी एक पुस्तक पाठवलं आहे. ते आता माझ्या गाडीत आहे.''* अनि उत्साहात म्हणाला.

*''ग्रेट, व्हेरी गुड. प्लीज लवकर आण काय आहे ते, काहीतरी मार्ग नक्की निघेल.''* असं बोलताना हंसीकाच्या डोळ्यांत एक वेगळीच चमक होती.

अनि गाडीच्या चाव्या घेऊन बाहेर जायला निघतो. आर्या त्याच्यासोबत कुणालातरी जायला सांगते. पण झालेल्या प्रकारामुळे कुणीच तयार होत नाही तेव्हा शौनक हातात हॉकी स्टिक घेऊन जाण्यासाठी निघतो. हंसीका दरवाज्यावर काहीतरी बघते आणि जोरात किंचाळते, तेव्हा सारंग पळतच हॉकी स्टिक घेऊन दरवाज्याजवळ जातो आणि काचेतून बघतो. ते अनि आणि शौनक असतात. दरवाज्यावर शौनक आणि अनि आहेत असं बघितल्यावर हंसीका शांत होते आणि किंचाळल्याबद्दल माफी मागते.

अनिच्या हातात एक छोटासा बॉक्स असतो. अनि त्यातून एक पुस्तक बाहेर काढतो. त्याचं नाव असतं, **ग्रॅव्हीटेशन : ॲन इंट्रोडक्शन टु करंट रिसर्च.**

अनि त्या पुस्तकाची पानं चाळायला लागतो. त्यात त्याला एक कागद सापडतो. तो शांतपणे कागद वाचतो आणि खुर्चीवर काहीतरी विचार करत बसतो. त्याला असं बघून हंसीका त्याच्याजवळ जाते आणि विचारते, *"अनि, काय झालं? काय आहे त्यात?"*

तो खिन्नपणे म्हणतो, *"हे जर खरं असलं तर मात्र आपण पुरते फसलो आहोत कायमचे."*

*"पण काय आहे जरा सविस्तरपणे सांग अनि."* सक्षम वैतागून म्हणतो.

*"ह्या कागदावर माझ्या भावाच्या नोट्स आहेत. ज्या तो लेक्चरसाठी म्हणून काढून ठेवतो. यात त्याने* ***डिकोहेरन्स*** *आणि* ***श्च्रोडिंगर्स कॅट*** *बद्दल माहिती लिहिली आहे. तुम्हाला श्च्रोडिंगर्स कॅट बद्दल काही माहिती आहे का? जाऊ द्या, मीच सांगतो. बेसिकली तो एक थॉट एक्सपरिमेंट आहे. एका बॉक्स मध्ये एक मंजर ठेवलेली असते आणि तिच्या जगण्याची आणि मारण्याची शक्यता ही पन्नास – पन्नास टक्के असते. कारण त्या बॉक्समध्ये रेडियो ॲक्टिव्ह पदार्थ ठेवलेले असतात. या गोष्टीवर रेग्युयलर फिजिक्स असं म्हणतं की बॉक्समधली मंजर एकतर जगेल किंवा मरेल पण क्वंटम फिजिक्सच्या नियमानुसार असं नसतं. मांजराच्या जगण्याची किंवा मरण्याची शक्यता या दोन्ही गोष्टी एकाचवेळी अस्तीत्वात असतात. पण जेव्हा तुम्ही तो बॉक्स ओपन करतात तेव्हा ह्या दोन्ही शक्यता एकाच एव्हेंटमध्ये बदलतात."* एवढं बोलून अनि थांबला आणि त्याने पान उलटलं व मनातच वाचू लागला. त्याचं वाचून झालं त्याने काही वेळ डोळे बंद करून विचार केला आणि समोर असलेल्या सर्वांकडे नजर स्थिर करून म्हणाला,

*"त्याने पुढे लिहिलं आहे की, अशीच अजून एक थेअरी आहे. दोन शक्यता किंवा स्थिती ह्या एकाच वेळी*

*स्वतंत्रपणे अस्तीत्वात असतात, त्या एकमेकांपसून अलिप्त म्हणजेच डि-कोहेरंट आणि वेगळ्या असतात. त्यातली प्रत्येक शक्यता ही अस्तित्वाची एक वेगळी आणि सेप्रेट ब्रांच निर्माण करत असते. म्हणजेच क्वंटम डि-कोहेरंट आपल्याला या वेगवेगळ्या शक्यतांपासून वेगळं ठेवतं. ज्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नसतो. म्हणजेच जर एका बॉक्स मध्ये मंजर जीवंत असेल तर दुसऱ्या बॉक्स मध्ये मंजर मेलेली आढळते. कारण तिच्या जगण्याच्या आणि मारण्याच्या ह्या दोनच शक्यता असतात, त्यामुळे क्वंटम डि-कोहेरंट नुसार त्या मांजरीच्या जगण्याच्या किंवा मारण्याचा त्या ठिकाणच्या रियालीटीवर काहीही फरक पडत नाही. कारण दुसरी रियालिटी अस्तीत्वात आहे हे त्यांना माहितीच नसतं."*

*"ओह माय गॉड. तू काय बोलतोयस? मला काहीच समजत नाहीये."* दोन्ही हातांनी डोकं गच्च धरत सारंग म्हणाला.

*"म्हणजे आपण एका बॉक्समध्ये अडकलो आहोत आणि आपण मांजर आहोत. आपण आता जिवंत किंवा मेलेलो आहोत. बरोबर ना?"* सक्षम म्हणाला.

*"आणि हंसीकाच्या म्हणण्यानुसार आज अवकाशात काहीतरी वेगळी स्थिती आहे. त्यामुळे धूमकेतू पास होईपर्यंत*

*डिकोहेरंट जे आपल्याला सर्व रियालिटीज पासून वेगळं ठेवतं ते काम करणार नाही.''* सारंग म्हणाला.

*''एझॅक्टली, यू आर राइट. दॅट्स व्हाट आय एम ट्राईंग टु टेल यू पीपल्स.''* अनि म्हणाला.

*''पण मग ते दुसऱ्या रियालिटी मधले लोकं म्हणे आपणंच आपल्याशी कॉन्टॅक्ट का करत आहेत? हा बॉक्स, याच्यातले फोटो, त्यामागचे नंबर्स काय दर्शवतात? हे सर्व काय आहे?''* हंसीका म्हणाली.

*''त्या घरातल्या लोकांनी आपल्याला मारण्याआधी आपण त्यांना मारायला हवं. निदान काहीतरी अर्धमेला तरी करायला हवं.''* सक्षम संतापात म्हणाला.

*''मूर्खपणा करू नकोस सारंग. तू असं काहीही करत नाहीयेस.''* शौनक म्हणाला.

*''सगळ्यात आधी जेव्हा लाइट गेली तेव्हा आपल्याला एका घरात प्रकाश दिसला. तेव्हापासून हे सगळं सुरू झालं आणि तो बॉक्स कदाचित आपल्यासाठी नसेल.''* आर्या म्हणाली.

*''असं सुद्धा असू शकतं की दुसऱ्या रियालीटी मध्ये आपण आता असाच संवाद आपल्याशी साधत असू. म्हणजे*

*आपण आता एकमेकांच्या रियालीटीत मिक्स होतोय.''* अनिने सांगितलं.

*''शक्यता आहे.''* हंसीका म्हणाली.

*''म्हणजे त्या हॉलीवूड मूवी स्लायडिंग डोअर्स सारखं. त्यातल्या नायिकेला सब-वे पकडायला काही सेकंद उशीर होतो आणि ती वेगळ्याच जगात पोहोचून जाते.''* रचना म्हणाली.

*''येस, एझॅक्टली. सेम. द सेम थिंग वी आर एक्सपिअरींसिंग नाऊ.''* अनिने सापष्टीकरण दिलं.

*''असं असेल तर आपण फक्त बसून काय करतोय.''* सक्षम म्हणाला.

*''एक मिनिट....., सक्षम आणि मी जेव्हा बाहेर गेलो होतो तेव्हा सक्षमने हा बॉक्स आणला होता. हे सर्व तिथूनच सुरू झालं. म्हणजे आपण जर हा बॉक्स जिथून आणला तिथं ठेवला तर सर्व पाहिल्यासारखं होईल.''* अनिने बॉक्स उचलत म्हटलं.

*''शांत बस अनि. आपण असं काहीही करणार नाही. माझा त्या घरातल्या लोकांवर मुळीच विश्वास नाहीये. त्यामुळे बॉक्स इथेच राहील.''* सक्षम म्हणाला.

*“तू असा विचित्रपणा का करतोयस?”* अनि म्हणाला.

*“आपल्याला त्या घरातल्या लोकांशी काहीही भांडण किंवा मारामारी करायची नाहीये. ते कदाचित आपल्यासारखेच माणसं असू शकतात. ते जर सनकी किंवा क्रूर असते तर त्यांच्या समोर त्यांच्या हुबेहूब आकृत्या बघून पाळले नसते.”* सारंगने अंदाज व्यक्त केला.

*“मला ते काहीही माहिती नाही. मी त्यांना मारणार. मला हे माझं आयुष्य जसं आहे तसं आवडतंय.”* सक्षम त्याच्याच धुंदीत आणि आवेशात बोलत होता.

*“ठीक आहे. तू जर असंच करत असशील तर तिथे जाऊन सगळ्यात आधी कुणाला मारशील?”* हंसीकाने सक्षमजवळ जात विचारले.

*“तुलाच मारशील. कारण तूला माहितीये की तुझ्याएवढी ताकद फक्त तुझ्यातच आहे. कारण कॉलेजला असतानापासून तुझी जिम आणि बॉडी बिल्डिंग सुरू आहे. त्यामुळे आपल्या सर्वांत तुला तूच तुल्यबळ आहेस. बरोबर. मग यात जिंकेल कोण? तुलाच तू मारल्यावर कोण जिंकेल? सांग ना मला. तू जेव्हा खिडकीतून बघितलं होतंस तेव्हा तिथे तुला तू दिसला होता का?”* हंसीका सक्षमल समजावणीच्या सूरात म्हणाली.

*“नाही, मी तिथं मला बघितलं नाही.”* सक्षम वैतागून म्हणाला.

*“चल ठीक आहे, पण मी जर वाईन पित असलो तर, एका सेकंदासाठी विचार करा. सर्वकाही संपलंय. तो सारंग वाईन पिऊन मला, तुला आणि सगळ्यांना मारण्याआधी काहीतरी करावं लागेल. मी जास्त वेळ वाट नाही बघू शकत. कारण मी इथं जो विचार करतोय तिथला मीसुद्धा असाच विचार करत असेल.”* सक्षम डोक्याला हात लावत म्हणाला.

*“ओह गॉड, तू त्या घरात कुणाकुणाला बघितलं होतंस?”* रचना म्हणाली.

*“मी त्या घरात शौनक, हंसीका, आर्या, रचना, नीलिमा आणि सारंग आणि मला बघितलं होतं.”* सक्षम म्हणाला.

*“म्हणजे तिथं तिथं अनि नव्हता?”* रचना अनिकडे बोट दाखवत म्हणाली.

*“नाही.”* सक्षम उच्चारला.

*“आता इथे नीलिमा नाहीये. ती झोपलीये. म्हणजे त्या घरात अनि झोपला असेल आणि जर तिथे अनि झोपला असेल तर आता आपलं जे संभाषण सुरू आहे ते तिथं होत नसेल.*

*कारण अनिचा भाऊ तिथं प्रोफेसर असल्यामुळे आपल्याला हे माहिती आहे."* रचना डोळे मोठे करत म्हणाली.

*"वेट, वेट, वेट, आपण जर त्या घरातल्या अनिच्या गाडीतून ते पुस्तक काढून घेतलं तर."* सक्षम म्हणाला.

*"ग्रेट, जर तशी शक्यता असेल तर आपण गाडीतून पुस्तक काढून घेऊ."* आर्या म्हणाली.

*"अनि, गाडीच्या चव्या दे."* सक्षम अतिउत्साहात म्हणाला.

*"नो, नेव्हर. आपण तसं काहीच करू नये असं मला वाटतं. आपण या प्रकारची सुद्धा रिस्क नको घेऊयात. काहीही झालं तरी आपण शांतपणे इथंच बसून राहू. म्हणजे जे आयुष्य आधी सुरू होतं तेच आता आणि पुढेसुद्धा सुरू असेल. तू माझ्या गाडीच्या चव्या घेत नाहीयेस."* अनिने दरडवले.

सक्षमने अनिचं बोलणं ऐकून घेतलं आणि तो काही वेळ शांतपणे उभा राहिला. केव्हापासून सुरू असलेल्या या उच्चकोटीच्या संभाषणाला ब्रेक लागला आणि शांतता पसरली. ही शांतता भयाण आणि असह्य होती आणि रात्र तर वैऱ्याचीच होती. शब्दशः वौऱ्याची. सक्षमने घड्याळाकडे बघितलं, रात्रीचा एक वाजला होता. तो मागे वळला आणि

बेडरूमकडे जाऊ लागला. आर्या त्याला कुठे चाललास? असं विचारणारच होती. पण तिला आठवलं की सक्षम नीलिमाला उठवायला जात असेल. त्यामुळे ती शांतच बसली.

*“असं असू शकतं की ते आपले डार्क व्हर्जन असू शकतात. त्या असुरमध्ये दाखवल्यासारखं... आपण इथे चांगले आहोत काय खात्री आहे की ते चांगलेच असतील?”* रचनाने प्रश्न उपस्थित केला.

*"वेल, ते जर आपण असू तर ती चांगली गोष्ट नाही का? तो मला आपल्यापर्यंत पोहोचण्याचा एक रस्ता वाटतो. आपण नेहमी म्हणत असतो की आपण आपल्या स्वतःशी बोलायला हवं. आपण स्वतःला आपल्यात शोधायला हवं आणि इथेतर आपल्याला एक आयती संधी चालून आली आहे, जिच्यात आपण आपल्या स्वतःला खरोखरच फिजिकली, मेंटली पाहू शकतो आणि जाणून घेऊ शकतो. देवा..... काय हे?"* हंसीका उद्विग्नतेने म्हणाली.

सक्षमने निलीमाला उठवलं आणि हॉलमध्ये घेऊन आला. तिला डायनिंग टेबलच्या एका खुर्चीवर बसवत म्हणाला, *"एंजॉय यॉर पार्टी नीलिमा..."*

ती थॅंक्स म्हणत बसली आणि सर्वांच्या चिंताग्रस्त चेहऱ्याकडे बघू लागली. तिला त्यांच्या चेहऱ्यावर आधीसारखा उत्साह दिसत नव्हता. तोच तिचं लक्ष वाईन कडे गेलं आणि तीच हात सहजच बॉटल कडे वळला. तोच तिचं लक्ष बाजूलाच पाडलेल्या बॉक्स, फोटो, मार्कर आणि पुस्तकाकडे गेलं. तिने प्रश्नार्थक नजरेने एकामागून एक सर्वांचे चेहरे बघितले पण कुणाच्याच चेहऱ्यावर तिला समाधानकारक भाव दिसला नाही. शेवटी तिने न राहवून विचारलं, *"मला कुणी*

*सांगेल का तुमचे सर्वांचे चेहरे का पडलेत आणि हे फोटो का जमा केलेत इथे? काही प्रॉब्लेम झालाय का?''*

*''बघ तसं बघायला गेलं तर काहीच झालेलं नाहीये आणि बघायला गेलं तर भरपूर काही झालंय. मी समजावते तुला.''* असं म्हणत आर्या नीलिमा जवळ बसली आणि तिला शांतपणे घडलेल्या घटना क्रमाने सांगू लागली. तिला अनि, सारंग, रचना आणि हंसीका मदत करू लागले.

ते सर्वजण निलीमाला घडलेला प्रकार सांगत आहेत असं बघून सक्षमने शौनकला एका बाजूला ओढले आणि हॉलच्या एका कोपऱ्यात घेऊन गेला. त्यांच्यात खल्याच्या आवाजात काहीतरी कुजबूज सुरू झाली.

*''अनिच्या कार मधून ते पुस्तक त्यांना मिळू नये यासाठी माझ्याकडे एक कल्पना आहे.''* सक्षम कुजबुजला.

*''तुला म्हणायचंय तरी काय? पटकन सांग.''* शौनक चोरटी नजर चहूकडे फिरवत म्हणाला.

*''मी त्या घरी जातो आणि मला स्वतःला ब्लॅकमेल करतो. मी तिथल्या सक्षमसाठी एक नोट सोडून जातो. ज्यामुळे आपण त्यांना कारमधून पुस्तक न काढण्यासाठी दबाव आणू शकू.''* सक्षम एका दमात बोलून गेला.

*“तुला नक्की काय सांगायचं आहे? ब्लॅकमेलिंग नोट म्हणजे? स्पष्टपणे सांग.”* शौनकच्या डोक्यात अजून प्रकाश पडला नव्हता.

*“काहीतरी आहे जे या घरात फक्त मलाचं माहिती आहे. मी ते रहस्य उलगडायला जातोय.”* सक्षम नीलिमाकडे बघत म्हणाला.

*“तू कशाबद्दल बोलतो आहेस?”* शौनकने सक्षमचे खांदे हलवत विचारले.

*“नीलिमा बद्दलची गोष्ट. आम्ही अकरवीत कॉलेजला कॉलेजला असतानाची गोष्ट.”* सक्षम भुवया उंचावत म्हणाला.

*“नाही, नाही सक्षम ही गोष्ट एक रहस्यच राहू दे. प्लीज. ऐक माझं. असं काहीही करू नकोस. हवं असल्यास मी अनिला समजवतो गाडीतून पुस्तक काढण्याबद्दल.”* शौनक अचानक चिंताग्रस्त होऊन बोलला.

*“नाही, तू काळजी करू नकोस. कारण ही नोट माझ्यासाठी लिहिलेली असणार आहे. त्यामुळे ती नोट वाचून तिथला मी ब्लॅकमेल होईल आणि कुणाला काहीही समजणार नाही. ट्रस्ट ऑन मी. धिस इज ॲन ग्रेट आयडिया.”*

*“नो सक्षम, सक्षम नोऽ.....”* शौनकने सक्षमला अडवण्याचा शेवटचा प्रयत्न केला पण तो सफल झाला नाही.

सक्षम हॉलच्या दुसऱ्या बाजूला मार्कर आणि कागद घेऊन गेला. शौनकने डोक्याला हात मारून घेतला. सक्षम ऐकत नसल्याचं पाहून शौनक डायनिंग टेबलवर असलेल्या घोळक्यात समाविष्ट झाला आणि जणू काही झालंच नाही अशा आविर्भावात नीलिमाला घडलेल्या घटना समजावण्यात मदत करू लागला. नीलिमाने शांतपाने सर्वकाही ऐकलं आणि एकटकपणे त्या बॉक्सकडे बघू लागली.

*“तुला आता बरं वाटतंय का?”* रचनाने विचारलं.

*“हो, कदाचित त्या ड्रॉप्समुळे झालं असेल.”* नीलिमा जांभई देत म्हणाली.

*“ड्रॉप्स, कोणते ड्रॉप्स?”* रचनाने विचारलं.

*“तेच जे आर्याने माझ्या वाईनमध्ये टाकले होते.”* नीलिमा संथपणे उच्चारली.

*“मला माफ करा, मी इथे जर काही चुकीचं बोलत असेल तर आणि मी जर काही तुम्हाला आश्चर्य वाटेल असं अयोग्य बोलणार असेल तर.....*

*तू आमच्या अन्नात काही मिसळले होते का?"* हंसीकाने स्पष्टपणे शंका उपस्थित केली.

*"येऽऽस, दॅट्स एक्सप्लेन अ लॉट. म्हणजे हे सर्व आपल्या मनाचे खेळ आहेत तर."* अनिने वादात उडी टाकली.

*"आर यू क्रेझी?"* आर्या थोड्या चढया आवाजात उच्चारली.

*"मी फक्त विचारलं आर्या,"* हंसीका शांतपणे म्हणाली.

*"तिने मला थोडं केटमाइन टाकायला लावलं आणि मी तिच्या वाईनमध्ये काही ड्रॉप्स टाकले. बस्स इतकंच. थोडक्यात मी तुमच्या अन्नात ड्रग्स मिसळले असं तुम्हाला म्हणायचं आहे का?"* आर्याचा आवाज अजून वरच्या पातळीवर गेला होता.

*"न, नाही तसं नाही. पण म्हणजे..."* हंसीका काहीतरी बोलण्याच्या प्रयत्नात असतानाच आर्या ओरडली,

*"वन सेकंद, मी दाखवते तुम्हाला. इतकं करूनही वरून तुम्ही म्हणतात की मी ड्रग्स मिसळले. चला माझ्यासोबत किचनमध्ये."* असं जोररत ओरडत आर्या सर्वांना किचनमध्ये घेऊन आली आणि तिने फ्रिजर मधून एक बाटली काढली. तीचा फक्त पाऊण टक्के भाग भरला होता.

*“बघ, हे थोडंस मी निलीमाला तिच्या सांगण्यावरून दिलं अँड आय ऑलरेडी टोल्ड यू. धिस इज जस्ट अ हाय ग्रेड फार्मा…”*

*“पण काहीही झालं तरी ते एक ड्रग आहे आणि माझ्या माहितीनुसार ते सर्वांत घातक ड्रग्सपैकी एक आहे. ते जे थोडसं नीलिमाला दिलेलं आहे ते आपल्या सर्वांच भान हरपवण्यासाठी पुरेसं आहे.”* अनिने शंका उपस्थित केली.

*“नाही, तुझी पूर्ण शुद्ध हरपून जाण्यासाठी तुला ती संपूर्ण बाटली एकाच वेळी प्यावी लागेल.”* आर्याने स्पष्टीकरण दिले.

*“ते ठीक आहे. पण हे घेतल्याने भान हरपते हे तर खरं आहे ना?”* हंसीका म्हणाली.

*“हो, पण इतक्या प्रचंड प्रमाणात शुद्ध हरपण्यासाठी तुला एकाच वेळी सर्व बॉटल घ्यावी लागेल आणि आपल्या सर्वांना भ्रम झालाय असं जर तू म्हणत असशील तर ते पुर्णपणे चुकीचं आहे.”* आर्याने परत तिची बाजू मांडली.

*“आर्या, आमचा तुझ्यावर विश्वास आहे. यू डोन्ट वरी.”* हंसीकाने थोडा विचार करून आर्याला समर्थन दर्शवले.

*“ओह थॅंक्स, हंसीका.”* आर्या हंसीकाच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाली.

*“सॉरी आर्या. पण मला जे वाटलं ते बोललो. रियली व्हेरी सॉरी. पण जरा कल्पना कर, हा जर खरंच भ्रम असता तर किती चांगले झाले असते. कधीकधी नशेत असणंसुद्धा चांगलं असतं.”* अनिने आर्याची माफी मागितली.

*“या, दॅट्स सो.”* आर्याने झालेल्या विषयाला तिलांजली देण्याच्या उद्देशाने म्हटले.

किचनच्या खिडकीत असलेलं छोटंसं बोन्सायचं रोप हातात घेत नीलिमा आर्याला म्हणाली, *“वॉव, धिस इज क्यूट.”*

आर्याने थॅंक्स म्हटलं आणि हातात असलेल्या केटामाईनच्या बॉटल मधून एक इंजेक्शन भरलं. तेच इंजेक्शन तिच्या वाईन ग्लासमध्ये खाली केलं आणि बघता बघता तो ग्लास रिकामा केला कारण त्या घरातले वाईन ग्लास फुटले नव्हते.

हे सर्व बघून हंसीकाला आश्चर्याचा धक्का बसला. कारण जेव्हा ती आली होती, तेव्हा थेट किचनमध्ये आली होती आणि तिने तिचा फुटलेला मोबाइल दाखवला होता. त्यानंतर

लगेचच नीलिमाने किचनच्या खिडकीत असलेलं बोन्सायचं रोप हातात घेऊन आता जे बोलली तेच बोलली होती. पण निलीमच्या लक्षात हे नव्हतं की आपण हे रोपटं काही तासांपूर्वी पहिलं आहे ते. तिच्या चेहऱ्यावर तसले काही हावभाव नव्हते. जणू ती पहिल्यांदाच बघत होती ते रोपटं. मुख्य म्हणजे त्या घरातले वाईनचे ग्लास जसेच्या तसे होते. जे धूमकेतू पास होत असताना फुटले होते. हे बघून मात्र हंसीकाची बोबडी वळली. तीला गरगरायला झालं. ती किचनच्या एका भिंतीला टेकून उभी राहिली. तिला समजून चुकलं की आपण आता दुसऱ्या रियालिटीमध्ये पोहोचलो आहोत.

दुसऱ्या रियालिटीमध्ये पोहोचलेली फक्त हंसीकाच नव्हती. तिच्यासोबत सारंग, शौनक आणि रचनासुद्धा होते. कारण जेव्हा ते **निळ्या** ग्लोस्टिक्स घेऊन बाहेर गेले होते तेव्हा सरांगला अनिचं घर दिसलं होतं आणि तिथून बाहेर आल्यावर लाल ग्लोस्टिक्स असलेले तेच त्यांना रस्त्याच्या पलीकडे दिसले होते. हे जेव्हा जिवाच्या आकांताने पळत आले तेव्हा परत एकदा त्या भयाण काळोखातून पास झाले होते आणि जेव्हा ते घरी आले तेव्हा हे घर दुसऱ्या रियालिटी मधलं होतं.

शौनक, आर्या, नीलिमा, हंसीका आणि रचना हे किचनमध्ये होते. सारंग ब्लॅकमेलिंग नोट पाठवायला म्हणून दुसऱ्या घरात गेला होता. सर्वांना असं गुंतलेलं बघून अनि आणि सक्षम हळूच हॉलमध्ये येतात. अनि किचन आणि हॉलच्या मध्ये असलेला पडदा हळूच ओढून घेतो. दोघं मिळून डायनिंग टेबलवर असलेले ग्लोस्टिक्सचे बॉक्स बघतात आणि एकदम हळू आवाजात कुजबुजू लागतात.

*"कोणता बॉक्स ओपन आहे?"* सक्षम

*"निळा. लाल बॉक्स अजून उघडलासुद्धा नाहीये."* अनि दबक्या आवाजात म्हणाला. त्यांनी हातात असलेल्या

लाल ग्लोस्टिक्स खिशात ठेवल्या आणि दोन निळ्या ग्लोस्टिक्स हातात घेतल्या.

*“आता काय करायचं?”* सक्षम घाईत म्हणाला.

*“म्हणजे काय? शक्य तितक्या लवकर निघायला हवं.”* अनि म्हणाला.

*“चल, लवकर कर. तू पुस्तक घे आणि मी बॉक्स घेतो.”* सक्षम अनिला घाई करत म्हणाला. अनिने पुस्तक हातात घेतले. सक्षमने सर्व फोटो आणि रुबिक्स क्युब एका बॉक्स मध्ये ठेवण्यासाठी म्हणून ते सामान गोळा केले आणि इतक्यातच हॉलचा दरवाजा उघडतो आणि सारंग आत आला. त्याला बघून दोघांची भंबेरी उडते.

सक्षम त्याला घाबरा होऊन विचारतो, *“तू कुठे गेला होतास?”*

सारंग थोडा गुंगीत सल्यासारखा वाटत होता. तो सक्षमच्या प्रश्नाचं उत्तर न देता हॉलच्या एका बाजूला असलेल्या वाईनशेल्फ कडे वळला आणि म्हणाला, *“आय नीड ड्रिंक.”*

तो शेल्फमधून वाईन बॉटल काढणार तितक्यात तिला शॉनका आडवा होतो आणि म्हणतो, *“तू कुठे गेला होतास?”*

*“अरे मी त्या घरात गेलो होतो. मी तुला सांगितलं नव्हतं का?”* सारंग डोळे चोळत म्हणाला.

*“मग काय झालं तिथं?”* शौनक भितियुक्त उत्सुकतेत उच्चारला.

*“मी दरवाज्याखालून ते पत्र टाकलं. मी पुस्तक बघितलं. मी अनिच्या गाडीतून ते पुस्तक काढण्यासाठी त्याच्या गाडीची मागची खिडकी फोडली आणि पुस्तक घेतलं. नाही, नाही, मी तसं नाही केलं. मी फक्त पत्र टाकलं आणि अं... आणि त्यांची रिॲक्शन बघण्यासाठी थांबलो.”* सारंग नशेत काय बडबडत होता हे त्याचे त्यालाच समाजात नव्हते.

*“पण तू फक्त पाच मिनिटांसाठी गेला होतास मित्रा आणि तू तब्बल पाऊण तासाने परत आलायेस.”* शौनक सारंगच्या डोक्यात प्रकाश पडण्याच्या प्रयत्नात म्हणाला.

*“नाही, वेड्यासारखं बडबडू नकोस. बाजूला हो.”* सारंग काहीही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. त्याला वाईन तेवढी हवी होती.

*“सारंग, नको. असं नको करूस.”* शौनक सारंगला आवरण्याचा प्रयत्न करत होता.

त्या दोघंच असं बोलणं सुरू असताना इकडे हॉलच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या डायनिंग टेबलवरचे पुस्तक आणि बॉक्स घेऊन अनि आणि सक्षम थोडासाही आवाज न करता हळूच हॉलच्या दरवाज्यातून बाहेर निसटले. ते दोघं निसटल्याचं कुणाच्याही लक्षात आलं नाही. तेवढ्यात सारंग वाईन बॉटल घेऊन डायनिंग टेबलकडे आला आणि त्याच वेळी किचनमधून हंसीका, रचना, आर्या आणि नीलिमा बाहेर आले.

सारंगच्या हातात वाईन बॉटल बघून रचना म्हणाली, *"सारंग प्लीज आता नको."*

*"व्हाय नॉट नाऊ हनी? व्हाऽऽय नॉऽऽट नाऽऽऊ?"* असं म्हणत त्याने बॉटल ओपन करून ग्लासमध्ये वाईन ओतायला सुरुवातसुद्धा केली.

आर्याने सर्वत्र बघितले. तिला अनि आणि सक्षम दिसले नाहीत. ती म्हणली, *"अनि आणि सक्षम कुठं आहेत?"*

*"ते जाऊ द्या. सर्वांत महत्वाचं, बॉक्स कुठे आहे?"* शौनकने विचारलं.

*"ओह माय गॉड. त्यांनी बॉक्स घेतला वाटतं. पुस्तक कुठे आहे?"* हंसीकाने थोड्या घाबऱ्या आवाजात विचारलं.

*"आपलं काहीही न करण्याचं ठरलं असताना ते बॉक्स परत करायला का गेले?"* रचना म्हणाली.

*"ते म्हणाले होते, जर बॉक्स परत त्या घरात ठेवला तर सर्व पहिल्यासारखं होईल. तुम्हाला आठवत नाहीये का?"* आर्याने स्पष्टीकरण दिले.

*"ते तसं म्हणाले होते. पण पुस्तकाबाबत आपण काहीच बोललो नव्हतो. त्यांनी पुस्तक का घेतलं?"* हंसीकाने परत मूळ मुद्द्याला हात घातला.

"एक मिनिट. सगळ्यात आधी अनि आणि सक्षम बाहेर गेले. नंतर परत आले तेव्हा म्हणाले की आम्ही काहीतरी पहिलं आणि थोडं विचित्र वागू लागले. बरोबर ना?" शौनक म्हणाला.

*"नाही, तुम्हीसुद्धा बाहेर गेला होतात, त्याबद्दल बोला काहीतरी."* आर्या मध्येच बोलली.

*"मी त्यांना शोधून येतो."* शौनक म्हणाला.

*"नाही, मी तुला कुठेही जाऊ देणार नाहीये."* हंसीका जोरात ओरडली आणि दरवाज्यासमोर जाऊन उभो राहिली. तिचा असा अवतार बघून शौनक शांत झाला आणि त्याने बाहेर जाण्याचा विचार सोडून दिला.

*“काय सुरू आहे हे? काहीतरी करा नाहीतर मला हार्ट अटॅक येईल.”* दोन्ही हातांनी डोकं गच्च धरत आर्या म्हणाली.

*“आपल्याला हेसुद्धा माहिती नाही की बॉक्स घेऊन गेलेले अनि आणि सक्षम याच घराचे आहेत का? त्यांनी काहीच क्लू सोडले नाहीत.”* हंसीका तावातावाने म्हणाली.

*“एक मिनिट, जर त्यांच्याकडे क्लू असू शकतात तर आपल्याकडे नक्कीच असतील. आपण सर्वांचे फोटो एकत्र करू म्हणजे आपल्यासाठी ती एक खूण म्हणून कामात येईल.”* आर्या म्हणाली.

“सारंग प्लीज सांग, तुझ्याकडे आपले फोटोज आहेत का? कारण त्या बॉक्स मधले फोटो हे आपल्या मागच्या पार्टीचे होते आणि ते तूच काढले होते. ती वाईन बाजूला ठेव आणि प्लीज एकदा तरी बघ.” हंसीका पोटतिडकीने म्हणाली.

*“मला अजून एक वाईन बॉटल हवी,”* असं म्हणा सारंग उठला आणि शेल्फकडे गेला. हंसीका हताश होऊन सारंगच्या खुर्चीवर विचार करत बसली. तिकडे आर्या आणि नीलिमा किचनमध्ये वाईन ग्लास स्वच्छ करत होत्या. **जे फुटलेले नव्हते.**

सारंग परत आला तेव्हा त्याच्या एका हातात एक नवीन वाईन बॉटल आणि दुसऱ्या हातात एक पाऊच होतं. त्याने ते पाऊच हंसीका समोर ठेवला आणि तिच्या बाजूच्या खुर्चीवर बसून वाईन ग्लास मध्ये ओतू लागला. हंसीकाने सारंगकडे बघितलं, त्याने वाईन घेतेस का? असं खुणेनेच विचारलं. हंसीकाने नकारर्थी मान डोलवत पाऊच उघडलं. त्यात त्यांचे मागच्या वर्षीच्या पार्टीचे फोटो होते. मागच्या वर्षी सरांग आला नसल्याने त्याला हंसीकाने हे पाऊच गिफ्ट म्हणून दिले होते. आता तेच गिफ्ट एका वेगळया आणि विचित्र कामासाठी वापरत येणार होते. त्यात सारंगचा फोटो नव्हता. ती एकामागून एक फोटो बघू लागली. मागच्या वर्षी केलेल्या पार्टीच्या आठवणींमध्ये हरवून जाऊ लागली. काही वेळ ती तशीच त्या फोटोंकडे बघत बसली. मग एक उसासा देत ती सर्वांचा एकेक फोटो निवडू लागली. तिचा आणि शौनकचा असा सेपरेट फोटो नव्हता. त्यामुळे त्यांचा एक फोटो तिने कापून टाकण्याचा विचार केला.

तोपर्यंत इकडे किचन आणि बेडरूमच्या पॅसेजमध्ये रचना आणि शौनक यांच्या रोमांटिक गप्पा सुरू होत्या. त्या गप्पांची थोडीफार कुजबूज हंसीका आणि सारंगला ऐकू येत होती. सारंग थोडाफार नशेत असल्याने त्याकडे दुर्लक्ष करत होता आणि हंसीका मात्र फोटो आणि कात्री हातात तशीच

ठेऊन ती कुजबूज ऐकण्याचा प्रयत्न करत होती. ती कुजबूज तिला ऐकू येत नसली तरी काही अशी होती,

*"हाय शौनक, कशा सुरू आहेत गोष्टी?"* रचना शौनकच्या जवळ जात म्हणाली.

*"आयुष्य फार बदलून गेलंय आणि मी भूतकाळातील गोष्टींमध्ये फार जात नाही. वर्तमान आणि भविष्याच्या विचार करण्यात इतका वेळ जातो की इच्छा असूनही मागे वळून बघता येत नाही."* शौनक तिला थोडं मागे सारत म्हणाला.

*“तुझं बोलणं तसंच आहे. अगदी तसंच. कॉलेजमधल्या दिवसांतल. काहीच बदल झाला नाही तुझ्यात.”* रचना परत शौनकच्या जवळ जात म्हणाली.

*“अच्छा, काय करणार आता?”* शौनक निर्विकारपणे म्हणाला.

शौनक आणि रचनाचं हे बोलणं किचनच्या एका कोपऱ्यातून आर्या ऐकत होती. रचना शौनकला मिठी मारण्याचा प्रयत्न करणार तोच अचानक आर्या किचन मधून हॉलमध्ये जाण्यासाठी निघाली आणि तिला बघून शौनक म्हणाला, *“रचना प्लीज, यू आर क्रॉसिंग यॉर लिमिट्स....”*

रचना दूर झाली आणि किचनकडे जाण्यासाठी निघाली. आर्या हॉलमध्ये आली आणि हंसीका समोर बसली. तोपर्यंत आर्याने मैत्रिणीचं कर्तव्य म्हणून हंसीकाला शौनक आणि रचनाच्या गोष्टी सांगितल्या. रचना हॉलमध्ये आली आणि आर्याच्या बाजूला बसली. सर्वांचे फोटो जमा करत असल्याचं तिने बघितलं. हंसीकाच्या हातातल्या फोटो आणि कात्रीकडे तिचं लक्ष गेलं. तिला काहीतरी आठवलं आणि तिने तिच्या पर्समधून शौनकचा एक फोटो काढत हंसीकासमोर धरला आणि म्हणाली, *“हा घे. कशाला कापतेस तो फोटो?”*

*“अगं, त्यात माझासुद्धा सेपरेट फोटो नाहीये.”* असं म्हणत हंसीकाने तो फोटो कापून टाकला आणि रचनाकडे एकटक नजरेने बघू लागली. पण ही काही वादाची वेळ नाहीये हे दोघांना समजत होतं. त्यामुळे दोघं जणी त्या विषयावर काहीच बोलल्या नाहीत.

इकडे सारंगची बडबड चालू होती, *“जर मी इथे हरतोय तर मी तिथेसुद्धा हरत असेल.”* सर्वजण त्याच्या बडबडीकडे दुर्लक्ष करत होते. पण तो एकटाच खरं बोलत होता.

शौनक अजून किचनमध्येच होता. त्याला रचनाशी केलेल्या बोलण्याची लाज वाटत होती. ती चक्क मिठी मारायला निघाली होती त्याला. आर्याने जर हंसीकाला संगितले तर आपली काही खैर नाही असं त्याला राहून राहून वाटत होतं. तो त्यामुळेच हंसीकासमोर यायला धजावत नव्हता. तो येत नाही असं बघून हंसीका उठली आणि किचनमध्ये गेली. किचनमध्ये असलेल्या फ्रीजमधून शौनक काहीतरी काढत होता. त्याला कुणाचीतरी चाहूल लागली आणि त्याने फ्रिजच्या दारावरून बघितलं. ती हंसीका होती. शौनक थोडा घाबरला, ही इथे का आली? असा विचार त्याच्या मनात आला. तो खोटंच हसून म्हणाला, *“हे हंसीका, तू ब्रेड घेशील का?”*

*“थॅंक्स, मला नको ब्रेड. सर्वकाही ठीक आहे ना? की काहीतरी सुरू आहे? मला आर्याने भरपूर काही सांगितले.”* हंसीका एका दमात बोलून गेली.

*“या वेळी आर्याने सांगितलेल्या गोष्टींपेक्षा काही महत्वाच्या गोष्टी आहेत अजून. तू ज्या आर्याबद्दल बोलते आहेस, ती आपल्या विश्वातली नाहीये. हे तुलासुद्धा चांगलं माहितीये. त्यामुळे तिने सांगितलेलं खरं की खोटं यावर वाद घालण्याची माझी इच्छा नाहिये.”* शौनकने थेट मुद्द्याला हात घातला.

*“पण मला काहीतरी कुजबूज ऐकू......”*

हंसीकाचं वाक्य पूर्ण होण्याआधी शौनक हॉलकडे जायला लागला आणि लाईट गेली. सर्वजण परत घाबरले. नाही म्हटलं तरी नक्की काय सुरू आहे हेच समजत नव्हतं. सर्वजण हॉलमध्ये असलेल्या डायनिंग टेबल भोवती जमले आणि कॅन्डल्स लावू लागले. हळूहळू एकामागून एक सर्व कॅन्डल्स पेटवल्या गेल्या आणि सर्वांच्या चेहऱ्यावरील प्रकाश दिसेल इतपत उजेड निर्माण झाला. प्रत्येकाची **निळ्या** रंगाची ग्लोस्टिक सोबत होतीच. सर्वजण एकमेकांकडे निःशब्दपणे बघतच होते. इतक्यात काच फुटल्याचा आवाज आला. सर्वांच्या काळजात धस्स झाले.

*“क... कोण आहे तिकडे?”* शौनक घाबऱ्या आवाजात ओरडला.

*“हा आवाज आपल्यापैकी कुणाच्यातरी गाडीचा काच फोडल्याचा आहे. चला बघूया.”* सारंग शांतपणे हसत बोलला.

*“नाही, बाहेर पडणं मुर्खपणाचं ठरेल.”* हंसीका म्हणाली.

*“मग आपल्या गाडया अशाच फोडू द्यायच्यात का?”* आर्याने प्रश्न उपस्थित केला.

*“बघा, तुम्ही येणार नसाल तर मी जातोय बाहेर.”* सारंग खुर्चीवरून उठत म्हणाला.

*“चला सर्वांनीच जाऊयात. प्रत्येकाने आपापली गाडी चेक करून घ्या. ग्लोस्टिक्स सोबत असू द्या फक्त. जवळ जवळ थांबूयात. काहीही होणार नाही.”* शौनक धीर देत म्हणाला.

शौनकने हळूच दार उघडलं. सर्वजण हळूहळू त्याच्या मागोमाग जाऊ लागले. आर्याने तर हंसीकाच्या दंडाला घट्ट पकडून ठेवलं होतं.

*“काय वाटतं? कुठून आला असेल तो?”* सक्षमने सारंगला विचारलं.

*"नाही, मला नाही माहिती. बावळटा सारखं काहीही विचारू नकोस. शांत रहा थोडावेळ."* सारंगने प्रत्युत्तर दिलं.

रस्त्यावरील स्ट्रीट लाईटच्या पिवळ्या प्रकाशात सर्वजण घोळक्याने चालले होते. निळ्या ग्लोस्टिक्स हातात असल्यामुळे त्यांचे चेहरे त्या निळ्या प्रकाशात अजून तणावात दिसत होते. आजूबाजूला नीरव शांतता होती. सर्वांच्या चालण्याचा आवाज मात्र येत होता. जवळच लावलेल्या अनिच्या गाडीजवळ सर्वजण आले. त्याच्या गाडीचा मागचा काच फुटला होता. नव्हे, तो कशाने तरी फोडण्यात आला होता.

*"ओह माय गॉड. व्हॉट द फक? ही काच फोडलीये कुणीतरी... कुणी दिसतंय का ?"* आर्या गाडीकडे बघत किंचाळली.

*"नाही, कुणीच नाहीये. काल्म डाउन आर्या. एव्रिथिंग विल बी फाइन. सर्वांनी आपआपल्या गाड्या बघा प्लीज."* अनिने सूचना केली.

सर्वजण आपआपल्या गाड्यांकडे निघाले. हंसीकाची गाडी थोडी दूर होती. पर्समधून गाडीची चावी काढली आणि रिमोटने गाडी अनलॉक केली. गडद अंधारात गाडीचे मागचे लाइट्स चमकले आणि टिपिकल अनलॉकिंगचा आवाज

झाला. तिने परत काळोख पास केला आणि तिच्या गाडीजवळ आली. गाडी चहूबाजूंनी न्याहाळली. तिच्या गाडीला काहीही झाले नव्हते. तिने सुटकेच्या निःश्वास सोडला आणि ड्रायव्हर सीट उघडलं. गाडीमधला लाइट सुरू झाला आणि तिने मघाशी डेस्कमध्ये ठेवलेली प्लॅटिनम रिंग काढली. तिला न्याहाळत असतानाच तिने गाडी लॉक केली आणि ती रिंग उजव्या अनामिकेत घातली. रिंग बघत असताना तिला शौनकची आठवण झाली आणि सोबत त्याने आज केलेल्या कृत्याचीसुद्धा. खरं तर तिला शौनकचा राग आला होता. पण आता परिस्थितीच अशी होती की कुणीच कुणालाच काहीही बोलू शकत नव्हते. नक्की काय सुरू आहे? हेच समजत नव्हतं. सर्वजण विचित्र वागत होते. ते एकमेकांच्या रियालीटीत मिक्स झाले होते. हंसीकाच्या मनात असे विचार सुरू असतानाच तिला तिच्यासमोर एक आकृती दिसली. तिने समोर बघितले, तो शौनक होता.

त्याने हंसीकाकडे बघत स्मितहास्य केले आणि म्हणाला, *"सर्वकाही ठीक आहे ना?"*

*"हो, ही बघ तू मला दिलेली रिंग."* असं म्हणत हंसीकाने त्याच्यासमोर तिचा हात नेला आणि रिंग दाखवली.

*"मी दिलेली? केव्हा?"* शौनक चकित होत म्हणाला.

हंसीकाला वाटलं तो तिची मजा घेतोय. त्यामुळे तिने दुर्लक्ष केलं आणि त्या रिंगच्या विषयाला तिलांजली दिली. तिने शौनकला मिठी मारली आणि म्हणाली, *"तू ठीक आहेस ना? त्या रचनाबद्दलच्या गोष्टीने? मी विसरले. तू पण विसर."*

*"कोणती गोष्ट?"* शौनक हंसीकाच्या बाहूंना पकडत म्हणाला.

हंसीकाला परत वाटलं शौनक मजा घेतोय. ती गालातल्या गालात हसली आणि काहीच बोलली नाही. मग मिठीत असतानाच हंसीका म्हणाली, *"तुला काय वाटतं? कुणी फोडली असेल अनिच्या गाडीची काच?"*

*"काय? काय म्हणतेस? अनिच्या गाडीची काच फुटली?"* शौनकने आश्चर्यचकित होऊन विचारलं.

आता मात्र हंसीका घाबरली. तिला आधीपासून वाटत होतं की शौनक तिची मजा घेतोय कारण प्लॅटिनम रिंगची गोष्ट काढली की तो नेहमी म्हणायचा, *"मी ही रिंग तुला दिलेली आहे. त्यामुळे तू तू दिलेली तू दिलेली असं नको म्हणत जाऊस."* तेव्हा रिंग बद्दल शौनक थोडावेळापूर्वी जे काही बोलला ते सहजच बोलला असं हंसीकाला वाटलं आणि रचनाची गोष्ट तीनेच त्याला विसरायला लावली होती. म्हणून तो विसरला असं दर्शविण्यासाठी त्याने कोणती गोष्ट? असं

म्हटलं असं रचनाला वाटलं. पण हंसीकाने जेव्हा अनिच्या गाडीचा विषय काढला तेव्हा मात्र शौनकला त्याबद्दल काहीही माहिती नव्हतं. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सर्वजण आपआपल्या गाड्या बघण्यासाठी सोबत निघाले तेव्हा शौनकनेच दार उघडलं होतं. किंबहुना तोच सर्वांच्या पुढे होता. पण ही गोष्ट आता हंसीका समोर असणाऱ्या शौनकला यत्किंचितही माहिती नव्हती.

तिने घाबरून शौनकची मिठी सोडली आणि त्याच्याकडे एकदम भेदरलेल्या नजरेने बघू लागली. त्याच्या चेहऱ्यावर प्रश्नार्थक भाव तसेच होते. हंसीका केव्हाचं काय बडबडतेय असं त्याला वाटत होतं. हंसीका घाबरत उच्चारली, *"तू... तुझ्याकडे असलेली ग्लोस्टिक दाखव."*

त्याने खिशातून त्याची **हिरव्या** रंगाची ग्लोस्टिक काढली आणि हंसीका समोर धरली. ती ग्लोस्टिक बघून हंसीका खूप घाबरली. तिचे पाय लटलटू लागले. तिच्या तोंडातून शब्द फुटत नव्हते. तिला कळून चुकलं की ती जेव्हा गाडीकडे आली तेव्हा ज्या काळोखातून म्हणजे डार्क झोन मधून आली होती, तो समांतर विश्वात जाण्याचा रस्ता होता आणि जेव्हा जेव्हा त्यांच्यातलं कुणीही म्हणत होतं की ते एका काळोखातून गेले तोच हा समांतर विश्वात जाण्याचा रास्ता होता. म्हणजे ज्यांनी ज्यांनी हा काळोख पार केला होता. ते त्यांचं विश्व म्हणजे रियालिटी सोडून दुसऱ्याच विश्वात आले होते. ज्या डी – कोहेरन्स मुळे ते आणि आपण सर्वजण आपआपल्या विश्वात आहोत त्याचा धूमकेतू मुळे इफेक्ट जाणवत नव्हता आणि नेमकं याच वेळी हे लोकं घराबाहेर निघून आपापलं विश्व सोडून दुसऱ्याच विश्वात जात होते.

हंसीका तिच्या समोर उभ्या असलेल्या शौनककडे घाबरी होत बघत होती. तिने तिच्याकडील **निळ्या** रंगाची ग्लोस्टिक दाखवली आणि हळूच थरथरत्या पायांनी दोन पावलं मागे सरकली. मोठा श्वास घेतला आणि मागे वळून पळत सुटली. ती परत एकदा काळोखातून पास झाली आणि ‘मृगजळ’ नावच्या घरात दाखल झाली. घरात शिरण्याच्या आधी तिने मागे वळून बघितलं पण काळया कभिन्न काळोखाशिवाय तिला काहीच दिसलं नाही.

ती घरात गेली तेव्हासुद्धा लाइट गेलेलीच होती. डायनिंग टेबलवर कॅन्डल्स जळत होत्या. सर्वजण डायनिंग टेबलच्या भोवती उभे होते. अनिच्या गाडीची काच कुणी आणि का फोडली? या विषयावर सर्वांचा परिसंवाद सुरू होता. तिथलं वातावरण बघून हंसीकाला हायसं वाटलं कारण ती परत तिच्या विश्वात आणि तिच्याच घरात आली होती. समोर असलेल्या शौनकला बघताच ती त्याला बिलगली. शौनकल वाटलं की, होतं असलेल्या विचित्र प्रकारांमुळे ती घाबरली असावी. तो तिला थोपटत राहिला. आपण आधीच्याच घरात आलो आहोत का? हे तपासण्यासाठी हंसीकाने तिचा हात शौनक समोर धरला आणि त्याला रिंग दाखवली, त्याने भुवया ऊंचवून स्मितहास्य केलं. हंसीकाला त्यातल्या त्यात बरं वाटलं.

त्यांचा परिसंवाद आणि थोडाफार मधून मधून वाद सुरूच होता. इतक्यात दारावर जोरात टक टक झालं. जवळपास सर्वांच्याच काळजात धस्स झालं. सारंग दरवाज्याकडे जायला वळला. तोच त्याला रचनाने आवरलं. पण त्याने बाहेर जात नसल्याचं सांगितलं आणि दाराजवळ जाऊन पडदा तेवढा ओढला. दाराच्या बाहेर काळोख होता. तिथंच त्याला दोन आकृत्या उभ्या दिसल्या. तीनच्या हातात निळया रंगाच्या ग्लोस्टिक्स होत्या. तो दरवाजा उघडणार इतक्यात आर्यांने त्याला टोकलं पण त्याने निळया ग्लोस्टिक्स बघितल्या असल्याचं सांगितलं आणि दार उघडलं. ते सक्षम आणि अनि होते.

ते दोघं हसतच घरात आले. सक्षमच्या हातात पुस्तक होते. ते त्याने डायनिंग टेबलवर ठेवलं. तिकडे कुणाचंच लक्ष नव्हतं.

मग सर्वांनी मिळून त्यांच्यावर प्रश्नांचा भडिमार सुरू केला आणि संमिश्र आवाजात काही असं ऐकू आलं, *“तुम्ही ठीक आहात ना? तुम्ही कुठे होतात? काय झालं होतं तिकडे? काय झालं प्लीज सांगाल का आम्हाला?”*

*“आम्ही एक फोन कॉल करायला गेलो आणि आम्ही जेव्हा त्या घरच्या खिडकीतून पहिलं तेव्हा, हे सर्वच. मी ते*

*बघत असताना पडलो आणि हे बघा माझ्या डोक्याला लागलं. जे आता माझ्या डोळ्यांसमोर आहे तेच मी बघत होतो आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे….”*

*“एक मिनिट थांबा… तुम्ही आधीही आला होतात आणि हीच गोष्ट आम्हाला सांगितली होती. परत परत तीच गोष्ट आम्हाला का संगत आहात? पण तुम्ही आलात तेव्हा तुमच्या हातात बॉक्स होता ना?”* रचना म्हणाली.

*“वेट…, व्हॉट?”* अनि आश्चर्यचकित होऊन म्हणाला.

*“हो, कारण अनि जेव्हा परत आला होता तेव्हा त्याच्या डोक्यावरच्या जखमेवर बांडेज लावलं होतं.”* आर्या म्हणाली.

*“पण ते बांडेज नव्हतं.”* नीलिमा बांडेज कडे बोट दाखवत म्हणाली.

*“काय म्हणायचं आहे तुला?”* आर्या डोळे मोठे करत म्हणाली.

*“अरे बाबांनो, मी जे बांडेज लावलं होतं ते* ***रेग्युलर*** *होतं आणि आता जे लावलं आहे ते* ***कापडी*** *बांडेज आहे.”* नीलिमाने स्पष्टीकरण दिले.

*"एक मिनिट थांब, इथे सक्षम आणि अनि होते का?"* हंसीकाने विचारले.

*"हो, होते आणि तुम्ही पुस्तक घेऊन गायब झाला होतात."* आर्या टेबलाकडे बोट दाखवत म्हणाली.

*"तुम्ही बॉक्स घेऊन गेला होतात आणि आम्हाला काहीच कल्पना नव्हती तुम्ही कुठे गेलात ते."* रचना त्यांच्याकडे बघत म्हणाली.

*"आम्ही त्या घरात गेलो होतो जिथे सर्वांकडे लाल रंगाच्या ग्लोस्टिक्स होत्या."* सक्षम म्हणाला. त्याने आणि अनिने मिळून एकाच वेळी खिशातल्या **लाल** रंगाच्या ग्लोस्टिक्स काढल्या आणि सर्वांसमोर धरल्या आणि म्हणाला, *"हे बघा. आम्ही ह्या लाल ग्लोस्टिक्स त्या घरातल्या बॉक्स मधून घेतल्या. बघा, तुमचा विश्वास नसेल तर तो डायनिंग टेबलवर ठेवलेला बॉक्स बघा. तो अजून सीलबंद आहे."* सक्षम बंद असलेल्या लाल रंगाच्या ग्लोस्टिकच्या बॉक्सकडे हात दाखवत म्हणाला.

सर्वांनी त्या बॉक्सकडे बघितलं आणि सुटकेचा निःश्वास सोडला.

*“मित्रांनो, जर ते इथून गेले होते तर ते इथेच आलेत. ते बरोबर घरात आलेत.”* शौनक अनि आणि सक्षमला मिठी मारत म्हणाला आणि पुटपुटला, *“वेलकम बॅक गाईज...”*

*“मग तिथला सारंग कसं आहे? काय म्हणतो तो?”* सारंग नशेत बडबडला.

*“तो... तो तुझ्याच चिंतेत आहे. जसा तू इथे आहेस.”* अनिने डोळे मिचकावत म्हटले.

*“अच्छा, म्हणजे ते तुम्ही आहात तर, मेसेज चिकटवून गेलेले.”* हंसीका म्हणाली

*“नाही, मी कोणताच मेसेज वगैरे लिहिला नाही किंवा काही बाहेर घेऊन गेलेलो नाही. आमच्याकडे दोन मेसेजेस होते. एक जो मी लिहिला होता आणि दूसरा दारावर लावलेला.”* अनि म्हणाला.

*“आणि आमच्याकडेसुद्धा. आमच्याकडे सुद्धा दोन मेसेज आहेत. एक अनिने लिहिलेला आणि दूसरा दारावरचा.”* एकसारखा मेसेज असलेले ते एकमेकांचे ड्यूप्लिकेट कागद अनि आणि सक्षमला दाखवत हंसीका म्हणाली.

*“जर ह्या अनिने मेसेज लिहिला नाही; त्या दुसऱ्या अनिने दारावर येऊन चिकटवला नाही तर मग दारावर मेसेज चिकटवून कोण जातयं?”* हंसीकाने प्रश्न उपस्थित केला.

*“क्वांटम डी - कोहेरन्स स्पष्ट करतं की दोन वेगवेगळी आऊटकम्स येऊ शकतात. ज्यांच्या विश्वात एकमेकांशी काहीही संबंध नसतो.”* रचना म्हणाली.

*“म्हणजे एक मेसेज कमीत कमी चार वेळेस लिहिला गेलाय तर....”* शौनकने त्याचं मत मांडलं.

*“म्हणजे एकूण किती अनि आणि सक्षम रस्त्यावर फिरताहेत?”* शौनकचं बोलणं मध्येच तोडत हंसीका जोरात म्हणाली.

*“ओके, आपण काहीही करण्याच्या आधी आपण आपापली घरं ओळखण्यासाठी कोणतातरी उपाय सुचवा.”* रचना म्हणाली.

*“नाही, तसं काहीही करू नका. फक्त घरात शांतपणे बसून रहा.”* हंसीका म्हणाली.

*“नको. तसं नको करायला. इथे उपस्थित असलेले सर्वजण आपल्याच विश्वातले आहोत का हेसुद्धा आपल्याला*

*माहिती नाहीये. त्यामुळे घरात राहणं हे रियालीस्टिक नाही वाटत."* आर्या म्हणाली.

*"आपल्याला काहीतरी असा मार्कर हवा ज्याने आपण ह्या घरवर काहीतरी खूण करू शकू."* शौनक म्हणाला.

*"नाही, आपण जो विचार करतोय तोच आणि तसाच विचार बाकीचे आपण करत असू. आपण जर मार्करने घराला ओळख दिली तर असे असंख्य सारख्या रंगाचे घरं मार्क होतील."* सक्षम म्हणाला.

*"आपल्याला काहीतरी वेगळं आणि युनिक करायला हवं."* अनि म्हणाला.

*"हां... आपण एक करू शकतो. आपण लुडो खेळताना जे फासे वापरतो ते वापरुयात. म्हणजे प्रत्येकाचा फसा वेगळा पडेल आणि सारखा पडला तरी आपण तो कुठेतरी लिहू. आर्या फासे आणतेस प्लीज?"* सक्षम म्हणाला.

*“म्हणजे आपल्याला ते कुठेतरी लिहून ठेवावे लागतील असंच ना? कुठे लिहायचं? आपण एखाद्या कागदावर नावाखाली आपल्याला पडलेला फसा लिहून ते एखाद्या एन्व्होलोपमध्ये ठेवूयात.”* रचना म्हणाली.

*“हो आपण तसंच करुयात. आपण एका बॉक्स मध्ये ठेऊ.”* रचना म्हणाली.

*“सेम, एझॅक्टली.... त्यांनीपण असंच केलं होतं.”* हंसीका हताशपणे फास्यांकडे बघत म्हणाली.

*“म्हणजे ते आपल्यापेक्षा पुढे आहेत तर.”* शौनक म्हणला.

*“होय, त्यांनी बॉक्समध्ये काहीतरी युनिक वस्तु ठेवली होती. आपणसुद्धा तसंच करुयात.”* रचना म्हणाली.

*“जर आपण काहीतरी वेगळं करत असू तर ते सुद्धा काहीतरी वेगळं करत असतील. हा... हा... हा...”* असं म्हणून सारंग जोरजोरात हसायला लागला.

त्याच्याकडे दुर्लक्ष करत हंसीकाने आर्याला बॉक्स आणि फासे आणायला पाठवलं.

*“म्हणजे आपल्याला फोटो लागतील.”* अनि म्हणाला.

*“काय वेडा विचित्रपणा सुरू आहे? मला काहीच समजत नाहीये.”* नीलिमा दोन्ही हातांनी डोकं गच्च धरत म्हणाली.

सर्वजण सारंगने आणलेले फोटो बघत असताना आर्या एक बॉक्स घेऊन आली. हंसीका तिच्याकडे बघतच राहिली. कारण तो अगदी तसाच बॉक्स होता जो अनि आणि सक्षम पाहिल्यावेळी घेऊन गेले होते. हंसीकाला आधीच समजलं होतं की ती दुसऱ्या रियालिटीमध्ये आली आहे आणि आता आर्याने आणलेल्या बॉक्सवरुन तर तीला खात्री पटली होती की ती दुसऱ्या विश्वात आहे. कारण त्या बॉक्सला बघून कुणीही काहीही बोललं नाही. ती शांतच बसली कारण तिला तिथून बाहेर पाडण्यासाठी हा एकाच मार्ग होता.

माझ्याकडे हा असाच बॉक्स आहे. असं म्हणत आर्याने तो बॉक्स डायनिंग टेबलवर ठेवला.

सर्वांनी आपापले फोटो निवडले होते. पण या सर्वांत सारंगचा फोटो मात्र नव्हता. तेव्हा अनि म्हणाला, तू नको काळजी करूस. आपण तुझा फोटो काढूयात. त्याने खिशातून मोबाइल काढला आणि कॅमेरा ऑन केला. हंसीकाला हे सर्व

पाहून जबरदस्त धक्का बसला. कारण अनिने त्याचा फोन खराब झाल्याचं सर्वांना दाखवलं होतं. पण इथेतर त्याचा फोन अगदी सुरळीत सुरू होता. हंसीका अतिशय त्रासिक चेहऱ्याने आणि मनाने घडणारा प्रकार पाहू लागली. विशेष म्हणजे एक गोष्ट नक्की होतिकी जर अनिचा फोन खराब नव्हता आणि त्याला त्याचे काहीही वाटत नव्हते तर तो खचितच दुसऱ्या विश्वातला होता आणि त्याच्यासोबत आलेला सक्षमसुद्धा.

अनि सारंगचे फोटो काढत होता, पण त्यांच्या मनासारखे फोटो काही येत नव्हते. मग इकडे बघ तिकडे बघ. मागे सरक असं सुरू झालं. हंसीका त्या प्रकाराकडे हरलेल्या मनाने बघत होती. तिला एका गोष्टीचं जास्त आश्चर्य वाटत होतं की जर कुणीच अनिच्या खराब झालेल्या फोनबद्दल बोलत नाहीये तर मग सर्वच एका विश्वातले असतील आणि आपण एकटी दुसऱ्या विश्वातील. जे होईल त्याला सामोरं जाण्याची तिने मनाची तयारी केली आणि म्हणाली, चला सारंगचा फोटो प्रिंट झाला असेल तर आपण फासे टकुयात. सर्वांनी होकारर्थक मान दर्शवली आणि फासे टाकायला सुरुवात केली. प्रत्येकाच्या फोटोमागे **निळया** मार्करने तिने फशावर आलेला नंबर लिहायला सुरुवात केली.

*“आर्या?”*

*"सहा."*

*"अनि?"*

*"तीन"*

*"सारंग?"*

*"चार"*

*"शौनक?"*

*"सहा"*

*"नीलिमा?"*

*"दोन"*

*"सक्षम?"*

*"पाच"*

*"रचना?"*

*"तीन"*

*"आणि माझा एक."*

*"ग्रेट, आता आपण मल्टी फॅक्टर औथेंतिकटोर क्वीक कोड वापरूया. थोडक्यात क्वीक कोड. म्हणजे आपण काहीही*

*ऑनलाइन शॉपिंग, बँकिंग किंवा काहीही असं करतो जिथे आपल्याला पासवर्ड लागतो, तेव्हा ते आपल्याला रंडम चित्र निवडायला लावतात. आपण ह्या फोटोंसोबत काहीतरी वस्तु ठेऊयात म्हणजे काहीही झालं तरी ती वस्तु म्हणजे आपली एक ययुनिक आयडेनटिटी राहील. आपण काहीतरी वस्तू, चित्र किंवा सर्वांच्या लक्षात राहील असं काहीतरी त्यात ठेऊया."* सक्षम म्हणाला.

*"अं..... रुबिक्स क्युब."* आर्या म्हणाली.

*"एझॅक्टली, रुबिक्स क्युब नकोच. आपल्याला जो बॉक्स सापडला होता, त्यातसुद्धा रुबिक्स क्युबच होता. हा पेपरवेट घ्या."* हंसीका पेपरवेट बॉक्समध्ये ठेवत म्हणाली.

*"चला, आता आपल्या घराची एक युनिक ओळख झाली. आता पेपरवेट आणि आपल्या फोटोमागे असलेल्या नंबरवरून आपण आपलं घर ओळखू शकतो. चला वाईन घेऊयात."* सारंग म्हणाला.

*"पण मला सांग, आपल्याला आधी मिळालेल्या नंबर्सपेक्षा आताचे नंबर्स वेगळे कसे आहेत?"* नीलिमा किचनकडे जाताना हंसीकाला काम लाऊन गेली.

*"लेट मी चेक,"* असं म्हणत हंसीकाने डायरी उघडली. त्यात जे लिहिलं होतं ते बघून तिला गरगरायला झालं. त्यात आधीच सर्वांची नावं आणि त्यांचे नंबर्स **हिरव्या** मार्करने लिहिले होते. ते अक्षरसुद्धा हंसीकाचेच होते. म्हणजे आता ज्या घरात हंसीका होती ती तिथली नव्हती. कारण आता त्या घरात असलेल्या हंसीकाने म्हणजेच आपल्या हंसीकाने या आधी तिच्या मूळ घरात **लाल** रंगाच्या मार्करने डायरीवर तेच लिहिलं होतं, जे आता तिला **हिरव्या** मार्करने लिहिलेलं दिसत होतं. तीला आता पुर्णपणे कळून चुकलं होतं की ती शंभर टक्के दुसऱ्या विश्वात आलेली आहे. ती खिन्नपणे त्या कागदाकडे बघू लागली.

तिच्यासमोर सारंग बसला होता. त्याने कॅल्कुलेटर काढलं आणि अशा प्रकारे किती विश्व असतील याचा अंदाज घेऊ लागला. तो एकटाच बडबडत होता, सहा गुणिले सहा, म्हणजे आठ जणं आणि तीन ग्लोस्टिक्स आणि आठ लोकं, परत सहा शक्यता, असं काहीतरी करून त्याने समीकरण मांडलं आणि गुणाकार केला. त्यातून आलेलं उत्तर हे हंसीकाला तिच्या विश्वात जाण्यासाठी मदत करणार होतं. म्हणजे धूमकेतू परत जाण्याआधी ती जर तितक्या वेळी त्या काळोखातून पास झाली असती तर कदाचित शक्यता होती की ती तिच्या विश्वात परत जाऊ शकेल. पण ती शक्यता समुद्राच्या

एका थेंबाएवढी होती. कारण सारंगने हो आकडा सांगितला तो मात्र चक्कर आणणारा होता, तो आकडा होता – **पन्नास लाख अडतीस हजार आठशे अठ्ठेचाळीस.....**

म्हणजेच ५,०३८,८४८ एवढे समांतर विश्वं त्यांच्या आजूबाजूला अस्तीत्वात होते आणि त्यापैकी आपलं खरं विश्व शोधणं हंसीकाला आता अशक्यच होतं. त्यामुळे आता जे होईल ते नशिबावर सोडून हंसीका जगायला तयार झाली. पण धूमकेतू जाईपर्यंत आपण प्रयत्न सोडायचे नाहीत असं तिने मनोमन ठरवलं.

आता तिच्या सोबत तिच्या विश्वातलं कोण आहे हे शोधण्यासाठी तिने प्रयत्न चालवले. तिने हिरव्या मार्करने लिहीलेल्या नंबर्सच्या खाली आता त्यांना मिळालेले नंबर्स लाल रंगाच्या मार्करने लिहिले. इतक्यात तिच्या बाजूला नीलिमा येऊन बसली. *"त... तुझ्या फोटोच्या मागे कोणता नंबर लिहिला होता हे तुला आठवतंय का?"*

*"पाच."*

*"पाच? अच्छा, ठीक आहे."*

मग तिने एकामागून एक सर्वांना त्यांच्या फोटोमागील आणि फासे पडल्यावर आलेले नंबर्स विचारले. प्रत्येकाला

खोदून खोदून आणि दोनदा विचारलं. शांत डोक्याने ते नंबर्स लिहून घेतले आणि परत विचारात गढून गेली. बराच वेळ विचार केल्यावर तिने काही नावं आणि नंबर्स भोवती मार्क केलं आणि समोर बसलेल्या सारंगला म्हणाली, *"हे सारंग, मला तुला काहीतरी दखायचे आहे. हे बघ. मला जे नंबर आठवताहेत जे आपल्याला आधीच्या बॉक्स मधून मिळालेले होते ते हे आहेत, हे मी आता तुझ्यासमोर लाल मार्करने लिहिले आहेत आणि मी ही नोटबुक उघडल्यावर हिरव्या मार्करने हे नंबर्स आधीच इथे लिहिले होते. मी आताच सर्वांना त्यांच्या फोटोमागचे नंबर्स विचारले. त्यात मला असं आढळून आलं की आर्या आणि नीलिमा हे ह्याच विश्वातले आहेत. म्हणजे हे त्यांचं ओरिजिनल विश्व आहे. कारण त्या दोघींनी घर सोडलं नव्हतं. पण उरलेले आपण सर्व बाहेरच्या विश्वातले आहोत. म्हणजे इथं असलेली नीलिमा तुझी मैत्रीण नाहीये. तूला माझं म्हणणं कळतंय का? तू माझ्या सोबत आहेस का?"*

तिचं बोलणं ऐकून सारंग जोरात हसायला लागला आणि त्याने काही वेळआधी भरून ठेवलेला वाईन ग्लास एका क्षणात रिकामा केला.

*“अजून ऐक, अनि आणि सक्षम हे तिसऱ्या विश्वातले आहेत. त्याने आताच तुझा फोटो काढला. त्याचा फोन खराब नाहीये. तुला आठवत असेल आपण डिनर सुरू करतानाच त्याच्या फोनच्या स्क्रीनला प्रॉब्लेम झाला होता आणि फोन बंद झाला होता.”* सारंगने हातातला वाईन ग्लास खाली ठेवला आणि गंभीर मुद्रेने हंसीकाकडे बघू लागला.

*“तुला तो काळोख म्हणजे डार्क एरिया आठवतोय का? ज्याच्यातून आपण पास झालो होतो, मला असं जाणवलं की त्या एरियामधून जो कुणीही पास झाला तो वेगळ्याच विश्वात पोहोचला आणि जो त्या काळोखातून पास झाला तो त्याच्या मूळ विश्वात कधीही परत जाऊ शकत नाही आणि मला असं वाटतं की आपण धूमकेतू पास होईपर्यंत आपलं खरं विश्वं शोधण्याचा प्रयत्न करावा कारण धूमकेतू पास झाला तर आपण इथे कायमचे अडकून जाऊ आणि मला इथं आयुष्यभरासाठी अडकायचं नाहीये.”* हे बोलताना हंसीकाच्या डोळ्यात पाणी तरारलं होतं.

*“जर तुझी थेअरी खरी असेल, जर आपण डार्क एरियामधून पास झालो असू आणि आपल्याला आपल्या मूळ ठिकाणी जाणं अशक्य असेल तर आपण इथंच थांबवं असं*

*मला वाटतं. आपण अडकलोय इथं."* वाईन बॉटलकडे एकटक बघत सारंग म्हणाला.

त्याचं असं बोलणं सुरू असताना बॉक्स ठेवायला गेलेला शौनक परत आला आणि म्हणाला, *"मी गेटजवळ बॉक्स ठेऊन आलोय. सर्वजण इथेच थांबा, सर्वकाही ठीक होईल."*

इतक्यात दारावर टक टक झाली. अनि दार उघडायला जाणार तोच शौनक त्याला म्हणाला, *"नो, डोन्ट ओपन इट. हू इज दॅट? स्टे अवे फ्रॉम डोर. ते दुसऱ्या विश्वातले अनि आणि सक्षम असू शकतात, फोन मागायला आलेले किंवा फक्त अनि असू शकतो. मेसेज चिकटवयाला आलेला."*

अनि दाराजवळ उभा राहिला. त्याने बघितलं, दरवाज्याच्या खालून एक कागद घरात सरकवण्यात आला होता. त्याने तो कागद हातात घेतला आणि मोठयाने वाचायला सुरुवात केली, *"सारंग..."*

*"ओह, फक मी."* सारंगने स्वतःच्या हाताने कानशिलात लगावत म्हटले आणि डोक्याला हात लावून जमिनीवर बसला.

अनिने पुढे वाचायला सुरुवात केली, *“सारंग माझ्या मित्रा. हे काय आहे? नीलिमा प्लस बुक इक्वल्स टू लोणावळा क्लब.”*

*“हे काय आहे?”* अनिने विचारलं

*“ही जस्ट एक नोट आहे. ही सारंगची मूर्ख आयडिया होती. तो ही नोट दुसऱ्या घरी ठेऊन येणार होता. म्हणजे त्या घरातील लोकांना अनिच्या गाडीतील पुस्तक घेण्यापासून रोखता आलं असतं.”* शौनक म्हणाला.

*“पण सारंगने ही नोट कुठेही नेली नाही. किंवा लिहिली नाही, मग हे काय आहे?”* अनिने शंका उपस्थित केली.

*“दुसऱ्या विश्वातला कोणतातरी मूर्ख आणि वेडा सारंग बहेर पळत असेल आणि त्याने ही नोट आपल्या दाराखालून सरकवली असेल. बाकी काही नाही.”* सारंगला वाचविण्याच्या हेतूने शौनक म्हणाला.

*“तुला माहितीये हे काय आहे ते. सांग. आपण याबद्दल काही बोललो नव्हतो. बरोबर ना?”* अनि सारंगवर जोरात ओरडला.

*“जाऊ द्या गाइज, सोडा सगळं आपल्याला फक्त ही रात्र काढायची आहे.”* शौनक आवरतं घेत म्हणाला.

*“मग आम्हाला सांगितलं का नाही? हं, नीलिमा? सारंग? बोला काहीतरी....”* अनि सारंग आणि नीलिमाकडे बघत परत जोरात ओरडला.

*“इट्स... इट्स जस्ट नथिंग..”* सारंग घबरत म्हणाला.

*“जर हे काहीच नाही तर मग माझ्या निलीमच्या नाकातून रक्त का येतंय?”* अनिने नीलिमाल सर्वांसमोर खेचत म्हटलं.

*“ओह माय गॉड.”* नाकावर रुमाल लावत नीलिमा म्हणाली.

*“नीलिमा? व्हाट द हेल इज धिस?”* अनिने निलीमचे बहू गदागदा हलवत विचारलं.

*“मी तुला सांगितलं होतं. ही एक मूर्ख कल्पना आहे.”* शौनक हळूच कुजबुजला. पण तरीही अनिला ऐकू गेलंच.

*“काय होती ती कल्पना?”* अनि आता चांगलाच चिडला होता.

*“अकरवीत असताना नीलिमा आणि सारंग लोणावळ्यात.... सारंग स्वतःला ब्लॅकमेल करणार होता. त्यांच्या हाती पुस्तक लागू नये म्हणून.”* शौनक घाबरत म्हणाला.

*“धिस इज बॅड. व्हेरी बॅड.”* रचना म्हणाली.

तिकडे अनि नीलिमावर जोरजोरात ओरडत होता. त्यांचे जोरात भांडण सुरू होते. *“याबद्दल अजून कुणाला माहिती आहे? सांगा मला. कुणाला माहिती आहे. उघडा तोंड. सक्षम, हंसीका, आर्या तुम्हाला माहिती आहे का? लूसर साले, सगळ्यांना माहिती होतं. फक यू ऑल. मला सोडून सगळ्यांना माहिती होतं हे.”*

*“अनि शांत हो. तुला जसं वाटतंय तसं काहीही नाहीये. खरं बघायला गेलं तर तू इथला नाहीयेस.”* सारंग आता तापला होता.

*“तू आता माझ्या डोक्यात जातोयस सारंग.”* अनिने तुच्छतेने म्हणाला.

*“ऐक, आपण दोघं या घरातले नाही आहोत. आपण दुसऱ्याच विश्वातले आहोत. माझं आणि तुझं विश्वसुद्धा वेगळं आहे. हे आपलं घर नाहीये.”* सारंग जोरात म्हणाला.

*“तुला म्हणायचंय तरी काय?”* अनिने विचारले.

*“हे आर्या आणि नीलिमाचं विश्व आहे.”* सारंग दोघांकडे बोट दाखवत म्हणाला.

*“तू माझ्या मैत्रिणीसोबत झोपलास आणि हेच तू मला सांगतोयस.”* अनि आता चांगलाच पेटला होता.

*“तुझा फोन चेक कर. तो फुटला आहे का?”* सारंग म्हणाला.

*“त्याचा काय संबंध आहे? सांग ना, काय संबंध आहे त्याचा?”* अनिचा आवाज अजून जोरात वाढत होता.

*“शांत.... शांत रहा. आम्हाला दाखव फक्त.”* सक्षम अनिला शांत करत म्हणाला.

*“नाही, माझा फोन फुटलेला नाहीये.”* अनिने खिशातून फोन काढला आणि हात उंचावत सर्वांना तो चांगला फोन दाखवला आणि जोरात ओरडला, *“याचा निलीमच्या सारंगशी केलेल्या गुन्ह्याशी काही संबंध आहे का?”*

*“आहे, आज डिनरला बसल्यापासून तुझा फोन फुटलेला होता.”* सक्षम म्हणाला.

*“नाही, हंसीकाचा फोन फुटला होता.”* अनि म्हणाला.

*“एक... एक मिनिट. तो बॉक्स. सर्वांत आधी मिळालेल्या बॉक्समध्ये काय वस्तू होती?”* हंसीकाने विचारलं.

*“स्टेप्लर.... त्याच्यात एक स्टेप्लर होते.”* अनिने सांगितलं.

*“काय? काहीही बरळू नकोस. त्यात ओव्हन ग्लोव्ज होते.”* नीलिमा आनिकडे रागात बघत म्हणाली.

*“आमच्या बॉक्समध्ये रुबिक्स क्युब होता.”* रचना हंसीकाकडे बघत म्हणाली.

*“आणि माझ्या बॉक्स मध्ये नॅपकीन होता. पांढरा शुभ्र नॅपकीन.”* सारंग शांततेत म्हणाला.

*“तुम्ही सर्वजण काय बोलताय याचं तुम्हाला तरी भान आहे का?”* अनिने डोक्याला हात लावत विचारलं.

*“आता ऐक अनि, ती माझी रचना नाहीये. तू पाहत असलेली नीलिमा तुझी नीलिमा नाहीये आणि मी तुझा मित्र सारंग नाही. आपण वेगवेगळ्या विश्वातले आहोत.”* सारंग म्हणाला.

*“हा हा हा, आपण वेगळ्या विश्वातले आहोत. पण मी ज्या विश्वातला आहे तिथे माझा सर्वात जवळचा मित्र माझ्या मैत्रिणीसोबत झोपत नाही.”* अनिने जोरात प्रत्युत्तर दिले.

*“अनि, तुला समजत नाहीये का, मी काय बोलतोय ते? हे सर्व आजा रात्री सुरू झालं आहे आणि जर असंख्य विश्व*

*अस्तीत्वात असतील तर मी प्रत्येक विश्वात तुझ्या मैत्रिणीसोबत झोपलो असेल.''* तावातावात असं बोलून सारंगने अनिकडे पाठ केली.

प्रत्येक क्षणाला वाढत जाणाऱ्या अनिच्या रागाने सीमा ओलांडली आणि तो सारंगवर धावून गेला. सर्व शक्तिनिशी त्याने सारंगला त्याच्याकडे फिरवाला आणि तोंडावर एक जोरदार गुद्दा लगावला. अचानक झालेल्या हल्ल्याने सारंग जमिनीवर कोसळला. अनि त्याच्या पोटावर बसून अजून जोरात मारू लागला. सारंग जोरात आरोळ्या मारू लागला. शौनक, सक्षम आणि रचनाने मिळून अनिला आवरण्याचा प्रयत्न केला. पण तो कुणाकडूनच आवरला जात नव्हता. शेवटी हंसीका आणि आर्याने सारंगला खेचलं आणि तिकडे शौनक आणि सक्षमने मिळून अनिला ओढलं. ते त्याला कसेबसे किचनमध्ये घेऊन गेले. तरीही तो सारंगवर धावून येण्याचा प्रयत्न करत होताच. शौनक आणि सक्षमने त्याला सर्व शक्तिनिशी आवरलं. अनिने लगावलेल्या जोरदार गुद्द्यांमुळे सारंगच्या नाकातून रक्त वहात होते. आर्याने ते रक्त पुसले आणि त्याला खुर्चीवर बसवले. हंसीकाने तिच्या हातात पाण्याचा ग्लास दिला.

पाण्याचा भरलेला तो ग्लास हातात घेत सारंग खिन्नपणे हसतच हंसीकाला म्हणाला, *“तुला माहितीये का? मी माझ्यासाठी काही चॉइस बनवल्या होत्या. ज्यांच्यासोबत मी आता इथे अडकलोय. बघ, आता मी... मी ह्या चॉइस सोबत इथे अडकलोय. मी त्या मेलेल्या मांजरासारखा आहे. बरोबर ना? ही संपूर्ण रात्र आपण चिंता करतोय. आता मी इथे ह्या विश्वात अडकलोय आणि माझ्यासोबत तूसुद्धा. हे दुसऱ्या विश्वातले आपलेच लोकं बघ कसं वागताय? आपलं एक डार्क व्हर्जन असतं असं आपण म्हणतो आणि हे बघ....”*

त्याचं बोलणं सुरू असतानाच त्या दोघांना किचनमधून जोरजोरात आवाज यायला लागले. अनि निलीमाला मारत होता बहुतेक. तिच्या रडण्याचा आणि किंचाळण्याचा जोरात आवाज येत होता आणि अनिचा जोरजोरात आणि परत परत तू मला का सांगितलं नाहीस? असा आवाज येत होता.

सारंग, आर्या आणि हंसीका निःशब्द होऊन एकमेकांकडे बघत होते. तेवढ्यात अचानक दरवाजा उघडण्याचा जोरात आवाज झाला आणि बाहेरून एक सारंग आत आला. हुबेहूब आपल्या सारंग सारखा. त्याच्या गळ्यात हिरव्या रंगाची ग्लोस्टिक अडकवली होती. कुणाला काही

कळण्याच्या आत त्याने सारंगला खुर्चीवरून ओढलं आणि बेदम मारहाण करायला सुरुवात केली. हंसीका आणि आर्याला तर काहीच कळत नव्हतं. पण धीर एकवतून हंसीका जोरात ओरडली, *"पटकन या. घरात कुणीतरी घुसलंय."*

गळयात हिरवी ग्लोस्टिक असलेला सारंग जेव्हा सारंगला मारत होता, तेव्हा मारता मारता अचानक त्याचे लक्ष मार खात असलेल्या सारंगच्या चेहऱ्याकडे गेलं. त्याने त्याच्याकडे चमकून बघितलं. सारंगलाच सारंग मारत होता. मारत असलेला सारंग थांबला आणि परत जायला मागे वळला. तोपर्यंत हंसीकाचा आरडाओरडा ऐकून सर्वजण हॉलमध्ये आले होते. त्यांनी जमिनीवर बेशुद्ध झालेला सारंग आणि दरवाज्यात घाईत खाली पडलेली हिरवा रंगाची ग्लोस्टिक उचलत असलेला सारंग बघितला. हिरवी ग्लोस्टिक उचलून सारंग आल्यापावली पळून गेला. सर्वजण त्या प्रकरकडे बघतच राहिले. इकडे सारंगला बेशुद्ध पडलेला बघून रचनाने टाहो फोडला. त्याला अशा रक्तबंबाळ आणि बेशुद्धवस्थेत बघून ती धाय मोकलून रडू लागली.

शौनक परिस्थितिचं भान ओळखून तिला आवरायला गेला. पण ती जोरजोरात रडत होती. अनि आणि नीलिमा तर सारंगला हातच लावू शकत नव्हते. सक्षम सर्वतोपरी त्याला

शुद्धीवर आणण्याचे प्रयत्न करत होता. सारंगचा रक्तस्त्राव बंद व्हावा म्हणून आर्या औषध वगैरे आणायला बेडरूममध्ये गेली होती. रचना शांत बसत नाही हे बघून नीलिमा तिला शांत करण्यासाठी तिच्याजवळ गेली तर रचना तिच्या अंगावर धावून गेली आणि रडतच जोरात ओरडली, *"ब्लडी बीच, तुझ्यामुळे झालं हे सगळं. मी तुला सोडणार नाही."*

तिचा असा अवतार बघून अनिने निलीमाला आवरायला सुरवात केली आणि शौनकने रचनाला. सर्वजण जोरजोरात भांडत होते. कुणीच कुणाचं ऐकून घेण्याच्या परिस्थितीत नव्हतं. एकमेकांना घाणेरड्या शिव्या देणं सुरू होतं. आर्या आणि सक्षम सर्वांना शांत बसा म्हणून सांगायला गेले तर अनि आणि रचना त्यांच्यावरच उलटले. परत एका मोठ्या भांडणाला सुरुवात झाली. यज्ञकुंडात तूपाची आहुती टाकल्यावर अग्नि ज्याप्रमाणे भडकतो, त्याचप्रमाणे अतिशय जोरात भांडणाला सुरुवात झाली. कुणीही कुणालाही मारत होतं. बेशुद्ध पाडलेल्या सारंगकडे कुणाचंही लक्ष नव्हतं. इकडे रचनाने केलेल्या हल्ल्यामुळे निलीमाच्या नाकातून परत रक्त यायला सुरुवात झाली होती. पण सर्वजण भांडण आणि मारामारीत व्यस्त असल्यामुळे त्यांना कशाचीही पर्वा नव्हती. थोडक्यात काय तर तिथे यादवी मजली होती. आपापसांत लढत होते ते आणि आपापसांत लढून त्यांनाच संपवणार होते.

विषण्ण आणि रिकाम्या मनाने हंसीका ते दृश्य बघत होती. ते सर्वजण तिचेच होते आणि तिचे नव्हतेसुद्धा.....

तिने मनाशी काहीतरी निर्णय घेतला आणि दरवाज्याकडे जाऊ लागली. तिला आसं जाताना बघून शौनकने तिला आरोळ्या मारल्या, *"हे हंसीका, कुठे चाललीस तू? हंसीका... हंसीका..."*

हंसीकाने मागे वळून बघितले नाही. तिला जणू ऐकूच आले नव्हते. तिने शांतपणे दार उघडले आणि बाहेर पाऊल टाकले. परत एकदा तिने घरात वळून बघितलं. तिला काही क्षणांपूर्वी आरोळ्या मारणारा शौनक परत भंडायला लागला होता. सर्वजण एकमेकांचे हाडवैरी असल्यासारखे भांडत होते. हंसीकाने सर्वांकडे एकवार नजर फिरवली आणि दरवाजा बंद करून बाहेर पडली. दरवाजा बंद करताना तिचं लक्ष गेलं तर तिथे एक कगद चिकटवला होता. त्यावर काही असे लिहिले होते,

***हॅलो, आम्हाला पाच मिनिटांसाठी तुमचा फोन हवा आहे. एक अर्जंट कॉल करायचा होता. धन्यवाद...***

हंसीकाने तो कागद काढला आणि घरात सरकवून दिला.

हंसीका गेटच्या बाहेर आली. बाहेर नेहमीसारखा काळोख होता. विचित्र आणि भयाण शंतत पसरलेली होती. काही स्ट्रीट लाईट्स सुरू होते. त्यांचा पिवळा प्रकाश पडला होता. चालताना हंसीकाच्या पावलांचा टप टप तेवढा आवाज शंतता भंग करत होता. हंसीका निघाली तर होती खरी पण पुढे काय वाढून ठेवले आहे? हे तिलासुद्धा माहिती नव्हते. ती आता तिच्या मूळ विश्वात जाऊ शकणार नाही, हे तिलासुद्धा ठाऊक होते. थंडी बऱ्यापैकी जाणवू लागली होती. घरातून निघताना ती तिचा कोट आणि मफलर घ्यायला विसरली होती. पण काहीही फरक पडणार नव्हता. कारण इथून पुढे ती कुठल्याही विश्वात गेली तरी तिचा पोशाख तोच असणार होता. त्यामुळे तशी चिंता तिला नव्हती.

रस्त्यावर समोर एक काळोखी जागा होती, त्या जागेतून ती पुढे गेली. तिथे तिला ‘मृगजळ’ नावाचं एक घर दिसलं. ती गेटमधून घरात जाणार तोच तिला खाली एक बॉक्स ठेवलेला दिसला. तो तिने उघडून पहिला. त्यात एक टेडी बिअर आणि एक पाकीट होते. तिने ते सर्व तसेच ठेऊन दिले. चेहऱ्यावरची नाराजी अजून वाढली. ती परत रस्त्याला लागली. काळोखतून पुढे गेली. एका घरच्या खिडकीतून डोकावून पहिलं, तिथे हंसीका डोक्याला हात लावून बसली होती. तिच्या नाकातून

रक्त येत होतं. असं दृश्य बघून ती मागे वळली आणि पुढच्या घरचा रास्ता धरला.

त्या घराच्या खिडकीतून डोकावून बघितले तर तिथे सर्वजण जोरात भांडत होते आणि ती एका कोपऱ्यात उभं राहून शांतपणे सर्वांची गंमत बघत होती. तिने परत पुढच्या घराकडे मोर्चा वळवला. तिथे तिने पहिले की दोन सारंग एकमेकांच्या बाजूला खुर्चीवर बांधून ठेवले आहेत. पैकी एकच्या गळयात लाल आणि दुसऱ्याच्या गळयात हिरवी ग्लोस्टिक आहे. ते दोघं सारंग एकमेकांकडे बघत होते. त्यांच्या तोंडात कापडाचे बोळे कोंबले असल्याने ते एकमेकांकडे फक्त बघत होते. हंसीका हे दृश्य बघून पटकन तिथून निघाली आणि मार्गाला लागली.

पुढच्या घरातील खिडकीतून तिला दिसलं की, घरात आनंदात पार्टी सुरू आहे. शौनक आणि रचना एकमेकांच्या बाजूला बसून हास्याविनोद करताहेत आणि एकमेकांना वाईन शेअर करताहेत. ते दृश्य बघून तिला खूप दुःख झाले आणि तिच्या डोळयांतून आसवे गळू लागली. पण तरीही ती ते दृश्य बघतच होती. पण जेव्हा तिने बघितले की रचना आणि शौनकने वाईन ग्लास खाली ठेऊन सोबत डान्स करायला सुरुवात केली तेव्हा मात्र तिला संताप अनावर झाला. ती अश्रु पुसत जोरात पळत तिथून निघाली.

पुढे अजून काही घरं फिरल्यावर तिला असंच काहीतरी विचित्र आणि वेगळं दिसू लागलं. कुठे नीलिमा आणि आर्या मिळून केटमाइनचं इंजेक्शन घेत होत्या, कुठं सारंग संतापात वाईनच्या बॉटल फोडत होता, कुठं शौनक आणि अनि भांडत होते तर कुठं तीन सारंग एकमेकांना मारत होते. ती हताश होऊन एकेक विश्व फिरत होती.

हंसीका तिच्या मनासारखं विश्व शोधात होती. जिथे शौनक तिच्यावर निर्व्याज प्रेम करत असेल, ते आठही जणं अगदी जीवश्च कंठश्च मित्र असतील. अशा विश्वाच्या शोधत ती होती. तसे विश्व कदाचित अस्तीत्वात असेलही. पण सुमारे पन्नास लाख अडतीस हजार आठशे अडतीस विश्वात तिचं मूळ आणि तिला हवं असलेलं विश्व सपडणं म्हणजे केवळ अशक्यप्राय गोष्ट होती. आता देवावर भरोसा ठेऊन ती एकेक विश्व बघत चालली होती. देवावर म्हणजे अनंत विश्वंच्या उत्पत्ति, स्थिति आणि लायचे एकमात्र कारण असलेल्या देवाच्या मनात जसं असेल तसं होऊ देत असं तिने तिच्या मनाला समजवलं होतं.

असाच विचार करत असताना तिचं लक्ष आकाशाकडे गेलं. तिकडे पश्चिम क्षितिजाकडून एक प्रकाश येत होता. तो हळूहळू पूर्व क्षितिजाकडे जाणार होता, हाच तो हॅलेचा धूमकेतू होता. आता त्याची परत जाण्याची वेळ होती आणि महत्वाचं म्हणजे आता ज्या विश्वात जो कुणी असेल तो आयुष्यभरासाठी तिथेच अडकून राहणार होता. कारण यानंतर परत हॅलेचा धूमकेतू तब्बल ७५ वर्षांनी फेरी मारणार होता. म्हणजे इसवी सन २१३६ मध्ये. तोपर्यंत या आठ जणांपैकी कुणीही जीवंत असण्याची शक्यता अगदीच नगण्य होती. हंसीका शुष्क आणि निर्विकार डोळयांनी त्या हॅलेचा धूमकेतूकडे बघत होती.

हंसीकाने हॅलेचा धूमकेतू बघितला आणि जोरात धावायला सुरूवात केली. ती एकामागून एक विश्व पार करू लागली. प्रत्येक विश्वातील ‘मृगजळ’मध्ये जाऊन ती खिडकीतून डोकावून बघत होती. आता धूमकेतू मध्यावर आला होता. फक्त काही मिनिटांत तो नजरेआड होणार होता. त्यामुळे हंसीकाने अजून जोरात पाळायला सुरुवात केली. पण सर्वठिकाणी तिच्या मनासारखं विश्व दिसलं नाही. शेवटी हॅलेचा धूमकेतू नजरेआड होण्याला काही सेकंद बाकी असताना ती एका विश्वात पोहोचली. त्या घरच्या खिडकीतून तिने डोकावून पहिले तर तिला असे दिसले की सर्वजण अगदी आनंदात आहेत. सर्वांच्या एकदम छान हसत खेळत गप्पगोष्टी सुरू

आहेत. मुख्य म्हणजे शौनक आणि हंसीका एकमेकांशी अतिशय प्रेमाने बोलत आहेत. काही वेळानंतर त्यांनी सोबत डान्स करायला सुरुवात केली. ते बघत असताना हंसीकाला फार बरं वाटलं. तिने मागे वळून बघितलं, हॅलेचा धूमकेतू आता एखाद्या ठिपक्यासारखा दिसत होता. म्हणजे हंसीका आता कायमस्वरूपी त्याच विश्वात अडकली होती. तिला हे विश्व आवडलं होतं. कारण इथला शौनक तिच्यावर प्रेम करत होता. तिला तिच्या मूळ विश्वातल्या सर्वांची आठवण झाली. ते कुठे आणि कोणत्या विश्वात कशा अवस्थेत असतील? याबद्दल तिला खूप वाईट वाटलं. शेवटी जे झालं त्यावर काहीही उपाय नाही हे तिला चांगलच कळून होतं.

हंसीकाने विचार केला, इथे आधीच एक हंसीका आहे. तिला इथून घालवल्याशिवाय आपल्याला इथे प्रवेश मिळणार नाही. काय करावं? असा विचार ती करू लागली. तोच तिला एक कल्पना सुचली. तिने रस्त्याच्या बाजूला पडलेला एक दगड घेतला आणि समोरच पार्क केलेल्या गाडीच्या काचेवर फेकून मारला. ती अनिची गाडी होती. त्या घरातील सर्वजण कशाचा आवाज झाला? म्हणून बाहेर आले. हंसीका एका भिंतीच्या आडोश्याने बघू लागली. सर्वजण बाहेर निघण्याच्या तयारीत असतानाच ती पटकन किचनच्या खिडकीतून आत घुसली आणि तिने फ्रिजर मधून केटमाईनची बॉटल आणि

बाजूलाच असलेलं इंजेक्शन घेतलं आणि परत भिंतीच्या आडोश्याला येऊन उभी राहिली. तोपर्यंत शौनकने हळूच दार उघडलं. सर्वजण हळूहळू त्याच्या मागोमाग जाऊ लागले. आर्याने तर हंसीकाच्या दंडाला घट्ट पकडून ठेवलं होतं. हंसीका त्यांचं बोलणं ऐकत होती. ते शंभर टक्के तसंच होतं जसं आधी तिने अनुभवलं होतं.

*"काय वाटतं? कुठून आला असेल तो?"*

*"नाही, मला नाही माहिती. बावळटा सारखं काहीही विचारू नकोस. शांत रहा थोडावेळ."*

रस्त्यावरील स्ट्रीट लाईटच्या पिवळ्या प्रकाशात सर्वजण घोळक्याने चालले होते. आजूबाजूला नीरव शांतता होती. सर्वांच्या चालण्याचा आवाज मात्र येत होता. जवळच लावलेल्या अनिच्या गाडीजवळ सर्वजण आले. त्याच्या गाडीचा मागचा काच फुटला होता. नव्हे, तो कशाने तरी फोडण्यात आला होता.

*"ओह माय गॉड. व्हॉट द फक? ही काच फोडलीये कुणीतरी... कुणी दिसतंय का ?*

*नाही, कुणीच नाहीये. काल्म डाउन आर्या. एव्रिथिंग विल बी फाइन. सर्वांनी आपआपल्या गाड्या बघा प्लीज."*

सर्वजण आपआपल्या गाड्यांकडे निघाले. हंसीकाची गाडी थोडी दूर होती. पर्समधून गाडीची चावी काढली आणि रिमोटने गाडी अनलॉक केली. गडद अंधारात गाडीचे मागचे लाइट्स चमकले आणि टिपिकल अनलॉकिंगचा आवाज झाला. तिने परत काळोख पास केला आणि तिच्या गाडीजवळ आली. गाडी चहूबाजूंनी न्याहाळली. तिच्या गाडीला काहीही झाले नव्हते. तिने सुटकेच्या निःश्वास सोडला आणि ड्रायव्हर सीट उघडलं. गाडीमधला लाइट सुरू झाला आणि तिने मघाशी डेस्कमध्ये ठेवलेली प्लॅटिनम रिंग काढली. तिला न्याहाळत असतानाच भिंतीच्या आडोश्याला लपलेली हंसीका आली आणि प्लॅटिनम रिंग न्याहाळत असलेल्या हंसीकाच्या दंडात केटमाइनने भरलेले संपूर्ण इंजेक्शन खुपसले.

अचानक झालेल्या हाय लेव्हल ड्रग्जच्या माऱ्यामुळे हंसीका काही क्षणातच बेशुद्ध झाली. हंसीकाने तिला कसेतरी ऊचलले आणि गाडीच्या मागच्या डिक्कीत टाकले. तिला तिथे टाकण्याआधी तिचं मफलर आणि कोट काढून स्वतः परिधान केलं. काही प्रूफ राहिलेत का? हे बघण्यासाठी गाडीभोवती परत एकदा बघितलं. कुठेही काहीही नव्हतं. तिने मागे वळून बघितलं, सर्वजण आपआपल्या गाड्या बघून परत घरात जात होते. शिवाय जाताना अनिच्या गाडीची काच फोडणाऱ्याला शिव्या देत होते.

हंसीका त्यांच्या मागोमाग किचनच्या दाराने घरात घुसली. तिला त्या दाराने आलेलं बघून आर्या म्हणाली, *"तू या दाराने का आलीस?"*

*"ह्या इथून मला हॅलेचा धूमकेतू दिसला. तो बघा अजून थोडासा दिसतोय."* असं बघत तिने बाहेर बोट दाखवलं.

सर्वजण उत्सुकतेने दारात उभे राहिले. हॅलेच्या धूमकेतूने हंसीकाचं विश्वच बदलून टाकल्याने तो धूमकेतू वगैरे बघण्यात तीला काही स्वैरास्य नव्हते. ती सगळ्यात मागे थांबली. सर्वजण तो ठिपका पाहत होते. इतक्यात लाईट गेली. सर्वत्र काळोख पसरला. सर्वात जास्त भीती हंसीकाला वाटली, कारण आता काही तासांपूर्वी घडलेल्या भयंकर घटनेची पुनरावृत्ती होते की काय? असं तिला वाटू लागलं. पण काही सेकंदातच लाईट आली आणि तिचा जीव भांड्यात पडला. तिचं लक्ष बाजूला गेलं तर तिकडे वॉशरूमच्या इथे कुणीतरी सरपटत चालले होते. तिने बघितलं, ती हंसीका होती. तिच्या काळजात धस्स झालं. त्या विश्वातली खरी हंसीका होती ती. घाईघाईत हंसीका गाडी लॉक करण्याचं विसरून गेली होती. सर्वजण अजून हॅलेचा धूमकेतू बघण्यात व्यस्त होते. हंसीका पळतच तिकडे गेली.

तिथं केटमाइनच्या हाय डोसमुळे असह्य नशेत असणारी हंसीका तोंडावर पाणी मारण्याचा प्रयत्न करत होती. हंसीका वॉशरूममध्ये घुसली आणि दार लॉक करून घेतले. आता एकाच वॉशरूम मध्ये दोन हंसीका होत्या. हंसीकाने गुडघ्यावर उभे राहून बेसिनच्या नळातील पाणी तोंडावर मारण्याचा प्रयत्न करत असलेल्या हंसीकाच्या डोक्यात कमोडचे सिंक सर्व शक्तिनिशी मारले. हंसीका बेशुद्ध होऊन खाली पडली. परत दोन तीन वेळ ती सिंक मारून हंसीका शांत झाली. तिला वॉशरूमच्या खिडकीबाहेर टाकले आणि टिश्यू पेपरने रक्ताचे सर्व डाग पुसले.

झालेल्या सर्व प्रकारामुळे तिला खूप ताण आला होता. तिने शांतपणे सर्व प्रकार विसरून जायचे ठरवले. सर्वकाही मिटवले आहे ना, याची खात्री करून तिने एकदा खिडकीबाहेर बघितले. तिथे एक हंसीका शांतपणे पडली होती. तिला बघून हंसीकाला वाईट वाटले. पण हंसीकाला जगायचे असेल तर हंसीकाचे मारणे आवश्यक होते. तिने व्यवस्थित खिडकी बंद केली आणि बाहेर आली.

सर्वजण हॉलमध्ये गप्पा मारत होते. त्यांना बघून हंसीकाने स्मितहास्य केले. तिचे पाय अचानक लटलटू लागले.

तिला भोवळ आली आणि काही कळायच्या आत ती खाली कोसळली.....

सकाळी हंसीका उठली तेव्हा हॉलमध्ये असलेल्या सोफ्यावर होती. हॉलमध्ये कुणीही नव्हते. तिने भिंतीवर टांगलेल्या घड्याळाकडे बघितले. साडे आठ वाजले होते. तिला दुसरी हंसीका आठवली, शिवाय तिला भोवळ आल्यानंतर काय झाले हे आठवत नव्हते. कुणाला काही कळले तर नाही ना? अशी शंका तिला आली. ती घाबरली आणि घराबाहेर जाऊ लागली. ती सोफ्यावरून उठली तोच किचनमधून आर्या बाहेर येत होती. हंसीकाला उठलेलं बघून आर्या स्मितहास्य करत म्हणाली, *"आता बरं वाटतंय का? काल चक्क बेशुद्धच झालीस. नंतर काही वेळाने मी इथली नाही, देवा काय हे? माझी माणसं का तोडलीस? असं काहीसं बडबडत होतीस. आता बरंय ना?"*

हंसीकाने काहीही न बोलतच फक्त होकारार्थी मान हलवली.

*"बरं, तू फ्रेश हो. मी कॉफी बनवते."* असं म्हणून आर्या परत किचनमध्ये गेली.

हंसीका घाबरतच घराबाहेर आली आणि किचनच्या बाहेर बघितलं. तिथं हंसीका नव्हती. ती अजून घाबरली.

कावरीबावरी होऊन इकडे तिकडे बघू लागली. तोच तिला शौनक दिसला. तो पार्किंगमध्ये उभा होता. त्याने हात हलवून हंसीकाला बोलावले. त्याचा हसरा आणि नेहमीसारखा आनंदी चेहरा बघून हंसीकाला हायसे वाटले. त्याला, आर्याला आणि इतर कुणालाही काहीही माहिती नाही याची तिला खात्री पटली. तिने स्मितहास्य केले आणि त्याच्याजवळ पार्किंगमध्ये गेली. जवळ जाताच शौनकने हंसीकाच्या डोक्यावरुन हात फिरवला आणि म्हणाला, *"आर यू फिलिंग बेटर नाऊ?"*

*"येस, बट आय नीड सम रेस्ट."* असं म्हणत असतानाच शौनकचा फोन वाजला. त्याने बघितलं, तो हंसीकाचा फोन होता. त्याला आश्चर्य वाटले. कारण हंसीका त्याच्यासमोरच उभी होती. त्याने फोन कट न करताच हंसीकाला विचारले, *"तू मला कॉल का करतेयस?"*

हे ऐकून सकाळच्या थंडीत हंसीकाला दरून घाम फुटला. तिला कळून चुकले की त्या विश्वातली हंसीका जीवंत आहे आहे आणि तीच शौनकला कॉल करतेय. परत एकदा काही कळायच्या आत हंसीका बेशुद्ध होऊन धडकन खाली कोसळली.

# उपसंहार

हा संसार अनंत आहे आणि प्रत्येक आणूत माझे अस्तित्व आहे, हे भगवान श्री कृष्णांनी अर्जुनाला सांगितलं आहे. अनंत ब्रह्मांडात एकाच वेळी उत्पत्ति, स्थिति आणि लय करण्याचा माझा रोजचा दिनक्रम असतो. असं देखील भगवान विष्णुंनी म्हटलं आहे. त्याच धर्तीवर ही कहाणी... कुणाचाही काहीही दोष नसताना केवळ नशीब म्हणून नशीब न मानणाऱ्या लोकांसोबत नशिबाने किंवा काळाने खेळलेला हा खेळ... या खेळाचा निकाल मात्र नियंत्याच्या हातात.

भाषण, लेख व नाटकादी साहित्यकृती यांच्या अखेरीस असलेला समारोपाचा मजकूर म्हणजे उपसंहार. नीतिपर कथेचे तात्पर्यवजा सार, नाटकाच्या शेवटी येणारे भरतवाक्य व तत्सदृश भाषण अशा विविध प्रकारांत उपसंहार आढळतो. तर ह्या उपसंहारची गरज होती आणि आहे.

नमस्कार, आपण कादंबरीच्या शेवटच्या भागापर्यंत येऊन पोहोचलात. त्याबद्दल धन्यवाद..! कादंबरी वाचताना बऱ्याच वेळा अर्धवट सोडून जाण्याचा विचार मनात आला असेल, काय सुरू आहे? ते नक्की समजत नसेल, पण आपण शेवटपर्यन्त ही कंटाळवाणी वगैरे कादंबरी वाचली त्याबद्दल खरंच धन्यवाद...

तरीही बऱ्याच अनुत्तरित प्रश्नांनी डोक्यात काहूर माजले असेल. त्याच प्रश्नांची उत्तरं देण्यासाठी हा “उपसंहार.”

जन्मापासून ते मृत्यूपर्यंत आपण एकाच विश्वात राहत असतो. पण ह्या आठ जणांच्या आयुष्यात असं काही अकल्पित घडलं की त्यांचं आयुष्य आणि विश्वचं बदलून गेलं. शब्दशः बदलून गेलं. त्यात कुणाचीही काहीही चुक नव्हती. मग असं झालं कशामुळे? हा गहन प्रश्न आहे. हे ग्रहस्थितीमुळे झाले असेल की धूमकेतूमुळे हे खरंच कोड्यात टाकणारं आहे. याचा दोष कुणाला द्यावा?

काय होणार आहे? याची सर्वांत जास्त माहिती असलेल्या हंसीकाच्या नशिबी असं जगणं यावं ही खरंच वाईट गोष्ट. बिचारी हंसीका ज्या विश्वात पोहोचली तिथे सर्वकाही सुरळीत होते. तिने तिथल्या मुळ हंसीकाला दोनदा मारण्याचा प्रयत्न केला. पण दुर्दैवाने देवाचा नियम असा आहे की एका विश्वात तो एकच जण जीवंत राहू शकतो जो मुळ त्या विश्वातला आहे. त्यामुळे दुसऱ्या विश्वातल्या मुळ हंसीकाचे मारणे जवळपास अशक्य होते.

सर्वांत आधी सारंग आणि रचना ‘मृगजळ’मध्ये येतात तेव्हा सुमारे साडेदहा वाजलेले असतात. तेव्हा खरतर धूमकेतूच्या पृथ्वीवरून पास होण्याचे वेध लागलेले असतात.

म्हणजेच डी-कोहेरन्सचे काम करणे बंद झालेले असते. सारंग आणि रचना "डार्क झोन" पास करून आलेले असतात. याचा अर्थ ते दुयऱ्या रियालीटी मधून आलेले असतात. म्हणूनच जेवताना रचना सक्षमला म्हणाली की तू जीममध्ये पडला होतास ना? कारण तिच्या विश्वात (रियालीटीत) सक्षम जीममध्ये पडलेला असतो आणि या रियालीटीमध्ये रचना टेनिस कोर्टवर पडलेली असते आणि त्या रियालीटीत ती कधी टेनिस कोर्टवर कधी गेलीच नसेल. सारंग आणि रचना हे दुसऱ्या रियालीटीमधून आलेले असल्याचे कुणालाच माहिती नव्हते कारण हंसीकाने धूमकेतू आणि त्याच्या परिणामांची गोष्ट कुणालाही संगीतलेली नसते.

नंतर सक्षम आणि अनि जेव्हा दुसऱ्या घरात (लाईट असलेल्या घरात) जातात तेव्हा त्यांना तिथे पडलेला बॉक्स दिसतो. ज्यात सर्वांचे फोटो आणि रुबिक्स क्युब असतो. खरंतर ते घर आपल्या रियालीटीपेक्षा भरपूर वेळाने पुढे असते. कारण असाच बॉक्स आणि युनिक इयडेंटिडी ठेवण्याचा प्रकार पुढे हे सर्व करतात हे आपल्याला कादंबरी वाचताना कळते. म्हणजे काही वेळाच्या अंतराने सर्वच गोष्टी सर्वच रियालीटीमध्ये सारख्याच घडत असतात.

थोड्या वेळाने अनि जेव्हा नोट लिहायला सुरुवात करतो तेव्हा तशीच नोट दूसऱ्या रियालीटीतला अनि दारावर चिकटवून जातो. हा अनि अजून एका वेगळ्या विश्वातला असतो.

काही वेळाने जेव्हा शौनक, हंसीका, सारंग आणि रचना जेव्हा ह्या प्रकरणाचा छडा लावायला म्हणून बाहेर पडतात तेव्हा ते "मृगजळ" नावाचं घर बघतात. तेव्हा खरं म्हणजे ते डार्क झोन पास करून आलेले असतात आणि ते दुसऱ्या रियालीटीतलं मृगजळ असतं. नंतर जेव्हा ते माघारी फिरतात तेव्हा त्यांच्यासमोर तेच चार जाणं उभे असतात. अपवाद फक्त लाल ग्लोस्टिक्सचा असतो आणि इथेच चूक होते. भयंकर मोठी चूक.

जेव्हा ते घरात येतात तेव्हा ते त्यांचे घर नसतेच मुळी. कारण हेच की ते दोनदा डार्क झोन मधून पास झालेले असतात. नशिबाने त्या घरातील शौनक, सारंग, हंसीका आणि रचना हेसुद्धा घडणाऱ्या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी बाहेर पडलेले असतात. त्यामुळे घरातल्या सर्वांना वाटते की घरात आलेले चौघं हे आपल्याच घरातले आहेत.

नंतर जेव्हा पुस्तकाचा विषय निघतो तेव्हा नक्की काय सुरू आहे हे सर्वांना समजते किंवा तशी कल्पना तरी येते. पण

तो पर्यन्त सर्वजण एकमेकांच्या रियालीटीत मिक्स झालेले असतात आणि रचना व सारंग हे तर पहिल्यापासूनच दुयऱ्या रियालीटीतले असतात.

पुढे जेव्हा नीलिमा झोपलेली असते तेव्हा तिला उठवण्यात येतं कारण शक्यता असते की एखाद्या रियालीटीत अनि झोपलेला असेल. आणि इथे झोपलेल्या व्यक्तिला म्हणजे नीलिमाला उठवलं तर ज्या रियालीटीत अनि झोपला असेल त्या रियालीटीत अनिला उठवण्यात येईल आणि जेणेकरून तो सर्वांना झालेल्या प्रकाराबद्दल आणि पुस्तकाबद्दल सांगेल. थोडक्यात काय तर नक्की काय प्रकार सुरू आहे? हे सर्व रियालीटीतल्या लोकांना समजावण्याचा केविलवाणा प्रयत्न ते करत होते.

नीलिमाच्या झोपण्याचं कारण म्हणजे तिने ‘केटमाइन’चे सेवन केलेले असते. त्यामुळे हंसीका असा निष्कर्ष काढते की आर्याने वाईनमध्ये केटमाइन टाकलेले असेल तर शक्यता आहे की सर्वजणांवर त्याचा परिणाम झालेला असेल आणि म्हणून सर्वजण असे विचित्र वागताहेत. पण आर्या सर्वांना सांगते की तिने नीलिमाला केटमाइन तिच्या सांगण्यानुसार दिले होते. त्यामुळे ती शक्यता सुद्धा नष्ट होते आणि सर्वांना कळून चुकते की घडणारा प्रकार हा खरा आहे.

इथे किचनमध्ये असताना सर्वप्रथम हंसीकाच्या लक्षात येते की ती दुसऱ्या रियालीटीत पोहोचली आणि कारण असतं ते बोन्सायचं रोपटं आणि आर्या आणि नीलिमाची त्यावरील रिएक्शन.

हे सर्व घडत असताना तिकडे अनि आणि सक्षम पुस्तक आणि फोटो असलेला बॉक्स घेण्यासाठी घरात येतात. ते दुसऱ्या रियालीटीमधून आलेले असतात. त्यांचा येण्याचा उद्देश असतो की फोटो असलेला बॉक्स आणि पुस्तक हे काढून घेतले तर सर्वकाही सुरळीत होईल. त्यमुळे ते पटकन त्या वस्तु घेऊन निघतात.

त्यात सारंगचा दूसरा प्रयत्न असतो की घडणारा प्रकार कुणालाही कळू नये यासाठी अनिच्या भावाचं पुस्तक कुणाच्याही हातात पडू नये. म्हणजे जे काही सर्व सुरळीतपणे सुरू आहे ते तसेच सुरू राहील आणि कुणालाही काहीही कळणार नाही. त्यसाठी तो दुसऱ्या विश्वातल्या स्वतःला ब्लॅकमेल करण्यासाठी नोट लिहितो आणि कथेच्या शेवटी एक पत्र दाराखालून येतं, ते पत्र दुसऱ्या विश्वातल्या सारंगनेच सरकवलेलं असतं.

काही वेळाने जेव्हा गाडीची काच फुटल्याचा आवाज होतो तेव्हा सर्वजण बाहेर जातात. ती काच दुसऱ्या

रियालीटीतल्या सारंगने फोडलेली असते. (कारण तो स्वतःसाठी बनवलेली नोट द्यायला गेलेला असतो.) तिथे हंसीकाला हिरवी ग्लोस्टिक असलेला शौनक भेटतो आणि ती नंतर घाबरून ज्या घरात जाते तेव्हा ती परत एकदा दुयऱ्या रियालीटीतल्या घरात जाऊन पोहोचते. तिथे परत फोटो जमवून काहीतरी युनिक इडेंटिडी बनविण्याची तयारी सुरू होते.


तिथल्या घरात अनि आणि सक्षम नसतात. ते दुसऱ्या घरात (लाईट असणाऱ्या) गेलेले असतात. म्हणजे ती रियालीटी हंसीका असलेल्या रियालीटीपेक्षा बराच वेळ मागे असते.


परत एकदा मोठा गोंधळ उडतो. परत सर्वजण फोटोसाठी बॉक्स तयार करतात. नंतर सारंगसाठीची नोट सारंगला मिळते आणि सारंगची भांडेफोड होते. मग मारामारी सुरू होते आणि हंसीका तो सर्व प्रकार खिन्न मनाने बघत असते. घरातून निघताना तिला दारावर चिकटवलेली नोट आढळते. तीच नोट... म्हणजे सर्वदूर न समजण्याइतका प्रचंड गोंधळ माजलेला असतो. हंसीका ते घर सोडते आणि पुढील कथा सर्वश्रुत आहे.....


धन्यवाद...!!!

हे प्रत्येक पुस्तक वाचायलाच हवं.

फ़क्त क्लिक करा. पुस्तकच हजर होईल.






**ई साहित्य प्रतिष्ठानचं चौदावं वर्ष.**

**शुभम पाटील यांचं ई साहित्यवर हे सहावं पुस्तक.**

शुभम जळगाव जिल्ह्यातल्या धरणगांवचे एक विद्यार्थी आहेत. त्यांच्यावर सरस्वती प्रसन्न आहे हे त्यांचं पुस्तक वाचताना जाणवेलच. एखादा सामान्य विषयही ते असा लिहीतात की वाचणाऱ्यासमोर सर्व काही जिवंत होतं. मग तो वाराणसी असो की वृद्धाश्रम. प्रतिभा आहे म्हणून ते लिहीत सुटत नाहीत. एक एक विषय घेऊन त्याच्या खोलात शिरून लिहितात व पुनर्लेखन करून आपल्या पुस्तकाला जास्तीत जास्त झळाळी आणतात. मेहनत घेतात. 'अभ्यासोनि प्रकटावे' हा त्यांचा मूलमंत्र आहे.

लेखक प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांची पुस्तकं कितीही चांगली असली तरी विकली जात नाहीत. त्यामुळे त्यांना प्रकाशक त्यांची पुस्तकं छापत नाहीत. कधीकधी तर न वाचताच परत करतात. आणि प्रकाशन झालेच नाही तर हे नवीन लेखक प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात अनेक प्रतिभा गर्भातच मारल्या जातात. अगदी "मृत्युंजय"कार शिवाजी सावंत यांचं पुस्तक तीन वर्षं कोणी प्रकाशक वाचूनही पहात नव्हता. या दुष्टचक्रातन अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

आता नेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ५

लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्याची ई साहित्यची इच्छा आहे. नवीन उत्कृष्ट लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनुप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, स्वीटी महाले,

अंबरीश गुरव, अविनाश जामदार, गौरव नायगांवकर, प्रणिता ठाकूर, अनिल पिसे, अनामिका बोरकर, पवन सोनवणे, राजेंद्र शेळके, पुर्वा राउत, धनंजय कलमष्टे, वैभव तांबटकर, बाळासाहेब शिंपी, सुजाता सिद्धा, विलास कोळी, गायत्री रोडे, मनोज कळमकर, काजल दळवी, सचिन बोरसे, कार्तिकी भट, डॉ. प्रितम दरवडे, अमोल गवळी, निकिता पाटील, संजीवनी देशपांडे, अंकिता शिंदे, काजल दळवी असे अनेक तरूण लेखक अभ्यासपुर्वक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

मराठीत हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे, आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?

www.esahity.com

esahity@gmail.com